साप्ताहिक माणूस
१० मार्च ८४/दोन रुपये.

पहिलं अ. भा. दलित नाट्यसंमेलन

# हे सारे माझेच आहे,



# तरी हे माझे का नाही?

'अंतांतर'- माडगूळकरांशी बातचीत

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : तेविसावे

अंक : एकेचाळीसावा

□

१० मार्च १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार

# गडचिरोलीत भयानक दमन !

आदिवासी रैतु कुली संघटनेच्या ( आदिवासी किसान शेतमजूर संघटनेच्या ) पहिल्या अधिवेशनासाठी स्थळ म्हणून ठरवण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातल्या कमलापूर गावाला निव्वळ पोलीसछावणीचं स्वरूप देण्यात आलेलं होतं. त्या भागात एस. आर. पी. च्या फौजा मोठ्या प्रमाणावर पाठवण्यात आलेल्या होत्या व कमलापूर अधिवेशनाकडे जाणारे सर्व रस्ते पोलीसकॅम्पस्‌नी अडवून ठेवण्यात आलेले होते. चंद्रपूर ते कमलापूर मार्गावर जागोजागी पोलीसतळ उभारण्यात आले होते आणि कमलापूर व आजूबाजूच्या गावांमध्ये पोलिसांचे ताफे तळ ठोकून होते. शेकडो जणांना अटक करण्यात आली. सिरोंचा, अहिरी, एटापल्ली या तीनही तालुक्यांत बंदीहुकूम जारी करण्यात आलेला होता. प्रत्येक वाहन व एस. टी. गाड्यांची कसून तपासणी करून कुणीही अधिवेशनाकडे जात आहे असा संशय जरी आला तरी त्यास अटक करण्यात येत होती. स्वागतसमितीचे अध्यक्ष व माजी आमदार अॅड. एकनाथ साळवे व समितीचे इतर पदाधिकारी यांना अटक करण्यात आली. थोडक्यात म्हणजे हे अधिवेशन घडू नये यासाठी ब्रिटिश राजवटीलाही लाजवतील अशा पोलिसी कारवाया करण्यात आल्या !

फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून आदिवासी किसान शेतमजूर संघटनेच्या ( आदिवासी रैतु कुली संघम) २५ व २६ फेब्रुवारीला होऊ घातलेल्या पहिल्या अधिवेशनाची तयारी मोठ्या धुमधडाक्यात सुरू होती. हा सीमाभाग असल्यानं भित्तीपत्रकं, पत्रकं मराठी, हिंदी, तेलगु या तीनही भाषांमधून काढण्यात आलेली होती. महाराष्ट्र पोलिसांनी तथाकथित चकमकीच्या नावाखाली ठार केलेल्या पेद्दी शंकर या शहीदाच्या स्मृतिप्रीत्यर्थ अधिवेशनाच्या ठिकाणाचे नामकरण पेद्दीशंकरनगर असे ठेवण्यात आलेले होते. अॅड. एकनाथ साळवे अध्यक्ष, ब्रह्मपुरीचे अपक्ष आमदार खानोरकर उपाध्यक्ष; श्री. बी. व्ही. शेखर सचिव व श्री. दत्ता पांढरे संघटक असलेली चंद्रपूरच्या सुप्रतिष्ठित ५० नागरिकांची एक स्वागतसमिती या अधिवेशनासाठी या महिन्याच्या सुरुवातीला स्थापन करण्यात आली होती. या अधिवेशनाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. चंद्रशेखर माडखोलकर उपस्थित रहाणार होते.

परंतु अधिवेशनाची तयारी अतिशय शांतपणे चालू असताना अचानक २० फेब्रुवारीला आंध्रप्रदेश रैतु कुली संघमच्या सचिवांना कमलापूर येथे व इतर नऊ जणांना अल्लापल्ली येथे अटक करण्यात आली व चंद्रपूर तुरुंगात पाठवण्यात आलं. या अटक केलेल्यांमध्ये आंध्रच्या घराघरात ज्यांचं नाव पोचलेलं आहे असे प्रख्यात लोकगीतकार व गायक श्री. गद्दर यांचाही समावेश होता. २२ तारखेला मुंबईचे आव्हान नाट्यमंचचे कलापथक अधिवेशनासाठी बल्लारशा येथे कार्यक्रम सादर करत असताना त्यातल्या कलाकारांना अटक करण्यात आली. त्यांना मारपीटही करण्यात आली व चंद्रपूर तुरुंगात टाकण्यात आलं. नंतर अगदी लष्करी थाटाने पोलिसांनी कमलापूर गावावर हल्ला चढवला, अधिवेशनासाठी उभारण्यात आलेले सर्व मंडप तोडून टाकले, कमलापूर गावातील सर्वच्या सर्व पुरुषांना अटक करण्यात आली आणि त्यांच्याबरोबर आंध्रप्रदेश रैतु कुली संघमचे अध्यक्ष श्री. गंजी रामा राव यांनाही अटक केली गेली. नंतर कमलापूर व रेपणपल्लीत पोलीस कॅम्पस् उभारण्यात आले. या सर्व भागाला पोलिसांनी असा वेढा घातला की, हा भाग एखाद्या परदेशी शत्रूच्या कब्जाखाली आहे की काय असेच वाटावे. वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांनी डी. वाय. एस. पी. च्या परवानगीशिवाय या भागात प्रवेश करू नये अशी बंदी त्यांच्यावर घालण्यात आलेली होती. दहशतीचं राज्य तिथे नांदत होतं व

असं ऐकिवात आहे की, पोलीस उघडपणे धमकी देत होते की, इथे दुसरी इंदरवेल्ली घडणार आहे म्हणून ! (आंध्रात चार वर्षांपूर्वी इंदरवेल्ली येथे जालियनवाला—बाग हत्याकांडासारख्याच एका हत्याकांडात पोलिसांनी ६० आदिवासींना गोळ्या घालून ठार मारलं ! ) २३ तारखेला स्वागतसमितीच्या प्रमुख सदस्यांना अटक करण्यात आली.

तीन वर्षांपूर्वी सी. पी. आय. (एम. एल). पीपल्स वॉर या पक्षाचे कार्यकर्ते त्या वेळच्या चंद्रपूर जिल्ह्यातल्या सिरोंचा जंगलातील आदिवासींना संघटित करण्यासाठी आंध्रची सीमा ओलांडून महाराष्ट्रात आले. त्यांनी आपल्या कार्याला नुकती सुरुवात केली होती, तोच २ नोव्हेंबर १९८२ रोजी पेद्दी शंकर या तरुण तेलगु कार्यकर्त्यास पोलिसांनी चकमकीच्या नावाखाली ठार मारलं. असं असूनसुद्धा चळवळ वाढत गेली नि लवकरच सिरोंचा, अहिरी, एटापल्ली तालुक्यांच्या प्रदेशात सुसाटयाने पसरली. जंगलातल्या या नक्षलवादी कार्यकर्त्यांनी (ज्यांना सारे आदिवासी 'अण्णा' म्हणजे मोठा भाऊ मानतात) जंगल अधिकारी व पोलीस यांच्या अत्याचारांविरुद्ध लढा देण्यासाठी आदिवासी रैतु कुली संघममध्ये आदिवासींना संघटित केलं आणि लवकरच तेंडु पानांची बंडलं जमवण्याच्या मजुरीत १५०% म्हणजे ५ रुपयांवरून १२.५० रुपयांपर्यंत वाढ करवून घेतली. त्यामुळे साऱ्या आदिवासींमध्ये नक्षलवादी तरुण कार्यकर्ते प्रिय बनले व आदिवासी रैतु कुली संघटनेच्या झेंड्याखाली एक झाले. याच नव्याने जन्मलेल्या संघटनेचं २५ व २६ फेब्रुवारीला अधिवेशन होणार होतं आणि त्याच अधिवेशनाला पोलिसांनी मिळेल त्या मार्गानं चिरडण्याचं ठरवलं. ह्या अधिवेशनाच्या निमित्तानं महाराष्ट्र पोलिसांनी सिद्ध करून दाखवलंय की, तेही आंध्र व बिहार पोलिसांइतकेच क्रूर व निर्दय आहेत ! पूर्वीपेक्षाही हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या आदिवासींच्या उत्थापनासाठी जे महाराष्ट्रशासन एकही पैसा खर्च करायला तयार नव्हतं तेच महाराष्ट्रशासन लाखावर रुपये खर्च करून पोलिसांचे ताफे त्या भागात पाठवण्याच्या कामी मात्र तत्पर राहिलं, स्थानिक आम्दार, कंत्राटदार आणि जंगल-अधिकारी, बेकायदेशीरपणे जंगलं कापून भरपूर पैसा कमवत असताना जंगलपुत्र आदिवासी मात्र एक वेळच्या अंबिलीच्या जेवणावर जिणं कंठत आहेत आणि तरीही आदिवासींना मूलभूत गरजा भागवणारं रहाणीमान मागण्यासाठी संघर्ष करायची परवानगी नाही. इकडे कंत्राटदार व अधिकाऱ्यांना मात्र चरण्यासाठी मोकळं रान देण्यात येत आहे. अगदी एकत्र जमण्याचा व अधिवेशन घेण्याचा मूलभूत लोकशाही हक्कही आदिवासींना नाकारला जातो आहे. आपण पुन्हा एकदा ब्रिटिश कारकीर्दीत वावरतो आहोत असेच दिसते !

— अनुराधा गांधी

## अ. भा. वि. प. औरंगाबाद

# मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती परिषद

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने औरंगाबाद येथे १२ फेब्रु. १९८४ रोजी आयोजित शिष्यवृत्ती परिषद अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडली. महाराष्ट्रातल्या सर्व जिल्ह्यांतून परिषदेसाठी ६०० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेचे उद्घाटन औरंगाबादचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाच्या अध्यक्षस्थानी अ. भा. वि. प. चे प्रांताध्यक्ष प्रा. अनिरुद्ध देशपांडे हे होते. प्रा. सोनकांबळे आपल्या भाषणात म्हणाले, 'ही शिष्यवृत्ती परिषद समतेच्या चळवळीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. शिष्यवृत्ती व राखीव जागा याबाबत समाजाची मानसिकता तयार करण्याचे काम करण्याची नितांत आवश्यकता आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा चालविण्याची जबाबदारी या परिषदेवर आहे.' दिवसभराच्या सर्व कार्यक्रमांस प्रा. सोनकांबळे उपस्थित होते,

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. अनिरुद्ध देशपांडे म्हणाले, 'ही परिषद सामाजिक समतेच्या हिताशीच जोडलेली आहे; समस्यांचे कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता केवळ प्रश्नांवर लक्ष केन्द्रित करण्याचा विद्यार्थी परिषदेचा दृष्टिकोन आहे. विद्यार्थीवर्गामध्ये [समतेचा संस्कार दृढमूल करण्याचा हा प्रयास आहे.'

उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे संकलन या परिषदेचे सचिव यशवंत कदम यांनी केले.

दिवसभरात झालेल्या सर्व चर्चासत्रांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधींचा सहभाग होता. 'शिष्यवृत्तीची सद्यःस्थिती' या विषयावरील निबंध अरुण करमरकर यांनी मांडला तर डॉ. अशोकराव मोडक यांनी अध्यक्षपद भूषविले. वसतिगृहाच्या समस्या या विषयावरील चर्चासत्रात नागपूरचे श्री. सैंदा रेड्डी यांनी निबंध वाचला व औरंगाबादचे प्रा. मनोहर गरुड हे अध्यक्ष होते. या सत्राचे संकलन वैभव कांबळे या विद्यार्थ्याने केले. तिसऱ्या व शेवटच्या चर्चासत्रात या समस्यांच्या आधारे एक मागणीपत्र तयार केले. या सत्रात यशवंत कदम याने उपाययोजनांचा निबंध वाचला व प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी अध्यक्षपद भूषविले तर याचे संकलन विनोद तावडे यांनी केले.

शिष्यवृत्तीबाबतची समस्या अतिशय जटिल स्वरूपाची आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जी शिष्यवृत्ती मिळते ती अतिशय कमी प्रमाणात तर आहेच; परंतु जी काही शिष्यवृत्ती या स्वरूपात रक्कम मिळते, त्या रकमेचा विनियोग त्याला शैक्षणिक बाबींची पूर्तता करण्यासाठी होत नाही. याचे कारण असे की, या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती म्हणून मिळत असलेली रक्कम पुणे-मुंबई आणि इतर काही शहरांत फर्स्ट टर्म संपताना ॲडव्हान्स स्वरूपात दिली जाते आणि उरलेली जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात दिली जाते. काही हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी शहरे सोडली तर ग्रामीण भागात वर्षाच्या शेवटी म्हणजे एप्रिल, मे-

मध्ये कधी तरी दिली जाते. यावरून येथे हे लक्षात येते की, शिष्यवृत्ती ही विद्यार्थ्याला त्याच्या शैक्षणिक गरजांची पूर्ती करण्यासाठी दिली जाते. शिष्यवृत्तीच्या साहाय्याने संबंधित विद्यार्थ्याने आपल्या शैक्षणिक गरजा भागवाव्यात असे सुचविले जाते; परंतु शिष्यवृत्ती जर अशा प्रकारे मिळत असेल तर त्या शिष्यवृत्तीचा खरोखरच त्या विद्यार्थ्याला उपयोग होतो काय, असे पाहिले असता याचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. शहरांच्या ठिकाणी या बाबतची तीव्रता जास्त जाणवत नाही; परंतु निमशहरी किंवा खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना ही समस्या अधिक जाणवते. काही वेळा याच विद्यार्थ्यांकडे परीक्षेचे फॉर्म भरण्यासाठीही पैसे नसतात आणि शिष्यवृत्ती तर त्याला ह्या काळात मिळत नाही. तसेच काही वेळा शासनाकडून संबंधित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर झालेली असूनही त्या त्या संस्थेकडून विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यास दिरंगाई होत असल्याचे दिसून येते. याबाबत आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट अशी की, मुंबईमध्ये ज्या संस्थेत बहुसंख्य मागासवर्गीय विद्यार्थी मोठ्या संख्येने असतात त्या महाविद्यालयात १९८३–८४ या वर्षाची शिष्यवृत्ती जानेवारी ८४ मध्ये मिळाली. यामध्ये गंमत अशी की, या प्रकारच्या संस्था, ज्यांना या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणे किती आवश्यक आहे याची जाणीव असूनसुद्धा, या प्रकारची दिरंगाई होते. तसेच फॉर्मस भरून घेण्याची व त्याची छाननी करून मान्यता देण्याची प्रक्रिया अतिशय किचकट, अनावश्यक व गुंतागुंतीची आहे. समाजकल्याणखात्यात या विभागासाठी असणारा कर्मचारीवर्ग अत्यंत कमी आहे. आणखीही एक महत्त्वाची अडचण म्हणजे संबंधित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किती मिळते याचा तपशील मिळत नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे काही शहरे सोडली तर ग्रामीण विद्यार्थ्यांना किती शिष्यवृत्ती मंजूर झाली, महाविद्यालयाने फी म्हणून त्यातून किती घेतली आणि संबंधित विद्यार्थ्याला किती मिळाली हे समजणे आवश्यक आहे; परंतु असे होताना दिसत नाही आणि या बाबतीत गंभीर बाब अशी की, या शिष्यवृत्तीमधून काही संस्था आपल्या संस्थेसाठी देणगी म्हणून, काही तत्कालीन स्वरूपाचे कारण काढून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमधून ठराविक रक्कम घेतात असे आढळून येते. ही बाब अतिशय चिंताजनक आहे. गरजू विद्यार्थ्याला मिळणारी शिष्यवृत्ती ही आधीच तुटपुंजी आणि त्यातून जर अशा प्रकारच्या संस्था काही ठराविक रक्कम देणगीच्या स्वरूपात घेत असतील तर यासारखे दुर्दैव ते कोणते ?

## वसतिगृहांची अवस्था

सध्या अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची संख्या आणि त्यात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तर ती संख्या १० हजारांपेक्षा जास्त नाही आणि विद्यार्थ्यांची संख्या पाहिली तर ८० हजार ते १ लाखाच्या दरम्यान आहे. अशा परिस्थितीत वसतिगृहांची संख्या किती अपुरी आहे हे कळते आणि वसतिगृहाच्या बाबतच्या समस्या अगणित आणि विविध स्वरूपाच्या असलेल्या दिसून येतात.

मुंबई येथील वरळीचे वसतिगृह पाहिले असता त्या वसतिगृहाच्या एका बाजूला वेश्याव्यवसाय चालतो तर दुसऱ्या बाजूला दाट अशी कामगारवस्ती आणि यांच्यामध्ये ते वसतिगृह आहे. त्या वसतिगृहाची नियोजित जागा वरळी सी-फेसवर होती; परंतु सरकारच्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार नियोजित जागा सध्या उपलब्ध असतानादेखील तेथे हे वसतिगृह हालविण्यास तयार नाही. तसेच या वसतिगृहाच्या जवळच असणाऱ्या वसतिगृहामध्ये वरच्या मजल्यावर मुली तर खालच्या मजल्यावर मुलं असे एकत्रित वसतिगृह असल्याचे दिसते. यावरून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रश्नाकडे सरकारची उदासीन वृत्तीच कारणीभूत असल्याचे दिसून येते. याबरोबरच विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांना मिळणारे अपुरे आणि निकृष्ट प्रकारचे भोजन, एकाच खोलीत ८/१० मुले एकत्र राहणे या प्रकारच्या कित्येक अडचणी तर आहेतच; पण त्याबरोबर या वसतिगृहांच्या अपुरेपणामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होण्याची वेळ आली आहे. कारण ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृह असण्याची अत्यंत आवश्यकता आहे; परंतु वसतिगृहे ही त्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होत आहेत. सोलापूर येथे असलेल्या वसतिगृहात तर विलक्षण अशा प्रकारची समस्या आहे. तेथे असणाऱ्या विद्यार्थ्यांना जेवणासाठी वसतिगृहापासून ३०० फूट इतक्या अंतरावर थाळ्या घेऊन जावे लागते. त्या वसतिगृहात राहात असलेल्या इंजिनिअरिंग मेट्रिकच्या विद्यार्थ्यांनी सांगितलेली हकिकत अतिशय हृदयद्रावक आहे. ह्या विद्यार्थ्यांचे म्हणणे असे की, इतर याबाबतच्या समस्या सुटायला वेळ लागला तरी चालेल; पण किमान आम्हाला माणुसकीची वागणूक द्या ! माणूस म्हणून जगू द्या. सरकारी वसतिगृहामध्ये या प्रकारची पद्धत आहे, तर खाजगी वसतिगृहात तर सरकारी वसतिगृहापेक्षा एक पाऊल पुढेच आहे. राहुरी येथील एका मागासवर्गीय वसतिगृहाची स्थिती अतिशय चिंताजनक आहे. या वसतिगृहाची स्थिती अशी की, दहा बाय बाराची, मातीच्या भिंती असलेली खोली, खाली जमिनीला असलेली ओल आणि बाजूलाच कुठं तरी आडोसा तयार करून केलेला भटारखाना आणि त्या खोलीतच तेथे असलेल्या विद्यार्थ्यांना अतिशय दाटीवाटीने जेवणासाठी बसावे लागते. जेवण म्हणजे डाळ, मसूर किंवा तत्सम पदार्थांमध्ये त्याला कालवण म्हणण्यासाठी मसाला कालवलेली डाळ किंवा तत्सम पदार्थांचे कालवण असेल तर शोधूनच काढावे लागेल अशी परिस्थिती. तसेच त्याबरोबर खाण्यासाठी काळपट ज्वारीची भाकरी आणि त्याही ठराविक, अशा प्रकारचे जेवण मिळते. अर्ध्या मीटरपेक्षा जास्त अंतरावर असलेल्या नदीवर विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी जावे लागते आणि या जेवणाच्या खोलीच्या बाजूलाच वर वर्णन केल्यापेक्षाही कमी आकाराची खोली आणि त्या खोलीतच विद्यार्थ्यांचे सामान, त्याची अभ्यासाची आणि झोपायची जागा अशी परिस्थिती ! याबाबत तेथील अधीक्षकांचे म्हणणे असे की, सरकार वसतिगृहांना अतिशय कमी प्रमाणात अनुदान देते आणि ते उशिरा मिळत असल्यामुळे आम्हाला विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे जेवण देणे शक्य होत नाही. या प्रकारच्या वसतिगृहात अनेक प्रकारचा भ्रष्टाचार असल्याचे दिसून येते. वसतिगृहांमध्ये नसलेल्या विद्यार्थ्यांच्या नावानेही सरकारकडून अनुदान मिळविले

जाते. हा प्रकार असा की, हजेरीपत्रकावर २५ विद्यार्थी दाखवायचे आणि प्रत्यक्षात मात्र १७/१८ विद्यार्थी त्या ठिकाणी असतात.

यासंबंधी मिळालेली माहिती अशी की, एका माजी मंत्र्याच्या संस्थेची काही वसतिगृहे आहेत. वर्षातून कधी तरी संबंधित वसतिगृहांची तपासणी होते. त्या वेळी त्या संबंधित मंत्र्याच्या संस्थेच्या वसतिगृहात विद्यार्थी होते आणि इतर तीन ठिकाणी वसतिगृहे असूनही त्यामध्ये मुले नव्हती. तपासणीच्या वेळी मात्र वसतिगृहात नसलेल्या विद्यार्थ्यांच्या ऐवजी व त्या एकाच वसतिगृहामधील तीच मुले त्या नसलेल्या ठिकाणच्या वसतिगृहात दाखविण्यात आली. अशा प्रकारचा भ्रष्टाचार दिसून येतो. अशा प्रकारची वसतिगृहे म्हणजे संबंधित व्यक्तींना एक प्रकारची कुरणं उपलब्ध करून देऊन भ्रष्टाचार होण्याला कारणीभूत ठरलेली दिसून येतात.

या तिन्ही सत्रांमधील चर्चेच्या आधारे परिषदेने एक मागणीपत्र संमत केले. यात अनेक मागण्या मांडल्या गेल्या. प्रमुख मागण्या म्हणजे—

(१) मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती ही खर्चावर आधारित व त्यातील वाढ, महागाई निर्देशांकातील वाढीनुसार करावी. सध्याही शिष्यवृत्ती फारच अपुरी म्हणजे रु. ७० ते १२० रुपये दरमहा याप्रमाणे आहे. ती किमान शैक्षणिक वर्षाच्या वर्गानुसार रु. २०० ते ४०० दरमहा असावी.

(२) वसतिगृहांची सध्याची व्यवस्था अत्यंत अपुरी म्हणजे फक्त ३० टक्के विद्यार्थ्यांना सामावून घेणारी आहे त्यामुळे शासकीय वसतिगृहांची संख्या त्वरित वाढवावी. त्यातील किमान सुविधाही कुठे मिळत नाहीत. त्या मिळाव्यात.

(३) नवबुद्ध म्हणून उल्लेख असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नवीन दाखला न द्यावा लागता शिष्यवृत्ती मिळावी.

विद्यार्थिनींच्या वसतिगृहात आठऐवजी पाच टक्के विद्यार्थिनींना सामावून घेण्याची क्षमता आहे. ही वसतिगृहे वाढवली पाहिजेत.

औरंगाबाद येथे झालेल्या यासंबंधीच्या परिषदेच्या माध्यमातून एका दुर्लक्षित आणि अतिशय महत्त्वाच्या अशा प्रश्नाला अ. भा. वि. प. ने वाचा फोडली. किंबहुना या प्रश्नासाठी एक व्यासपीठ निर्माण केले आहे. आज आवश्यकता आहे ती हे प्रश्न सोडविण्याची. एखाद्या प्रश्नावर 'सेमिनार' घेऊन तो प्रश्न तेथेच संपविण्याची आणि पुरोगामित्व सिद्ध करण्याची वि. प. ची परंपरा नाही तर तो प्रश्न सोडविण्यासाठी काय करता येईल याचाही विचार वि. प. ने या परिषदेच्या निमित्ताने केला आहे. या परिषदेचा पाठपुरावा म्हणून येत्या जून महिन्यात महाराष्ट्रात या प्रश्नासंबंधीचे मागणीपत्रावर दहा लाख विद्यार्थ्यांच्या सह्या गोळा केल्या जातील आणि हे निवेदन विधानसभेत जाईल. तसेच जून ते सप्टेंबर या काळात जिल्हानिहाय यासंबंधी मागणीपरिषदा भरवल्या जाऊन या मागणीपत्राचा पाठपुरावा करण्यात येईल. त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व विधायक, संघर्षात्मक मार्गांचा अवलंब करून हे आंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. या परिषदेच्या शेवटी मंडलआयोग-अहवालावर जाहीर सभा झाली. या सभेचे प्रमुख वक्ते डॉ. अशोक मोडक होते तर अध्यक्ष म्हणून श्री. बापूराव जगताप होते. परिषदेने मंडल अहवालाच्या सर्व शिफारशींचे स्वागत केले व अंमलबजावणी करण्याचे आग्रहाने प्रतिपादन केले. मंडल आयोगावर पुण्यात राज्यव्यापी परिषद भरविण्याचीही घोषणा करण्यात आली. या परिषदेच्या निमित्ताने सामाजिक समतेच्या चळवळीला निश्चितच गती प्राप्त होईल. किंबहुना ही परिषद म्हणजे सामाजिक समतेच्या संघर्षातील पुढचे पाऊलच होय. राज्यव्यापी स्तरावर या प्रश्नांसंबंधी प्रथमच एवढ्या व्यापक प्रमाणात या समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला गेला आणि म्हणूनच त्या दृष्टीने औरंगाबादच्या या शिष्यवृत्तीपरिषदेला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

—यशवंत कदम

सचिव, मागासवर्गीय शिष्यवृत्ती परिषद, औरंगाबाद

□

मुक्काम कोल्हापूर

# मराठीवरचा अन्याय

बोरिवलीच्या साहित्यसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी श्री. ना. ग. गोरे यांनी केलेल्या भाषणाचे वृत्तांत सर्वत्र प्रसिद्ध झाले आहेत. मराठी भाषेची दिवसेंदिवस जी पीछेहाट होत आहे त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. कोल्हापूरला या संमेलनाच्या आधी मराठी अन्याय परिषद भरवण्यात आली होती. कोल्हापुरातील मराठीच्या प्राध्यापकांनी आयोजिलेल्या या परिषदेचे प्रमुख पाहुणे श्री. गं. बा. सरदार होते. वरवर पाहता एखाद्याला संशय यावा की, मराठीचे हे 'प्रोफेसर्स' आपल्या स्वार्थासाठी, नोकरीच्या शाश्वतीसाठी तर काही चळवळ उभी करत नाहीत ना? परंतु परिषदेच्या मुख्य संयोजकांपैकी एक प्रा. म. ज. कुलकर्णी यांनी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या लेखात त्याचा स्पष्ट खुलासा केला होता. 'मराठी विषय शिकविणाऱ्या मूठभर प्राध्यापकांना नोकरीची शाश्वती मिळावी यासाठी ही परिषद घेतली जात नाही किंवा चळवळ उभी केलेली नाही. विद्यापीठाच्या वा महाविद्यालयाच्या क्षेत्रात आपल्या विषयाचे वा स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करून राहिलेल्या काही अहंमन्य व्यक्तींना अशी हेटाळणी करण्यात आनंद वाटत असतो. या व्यक्तींची असहिष्णुता इतकी तापदायक असते की, त्यांच्या या उपहासात्मक टीकेला आधी उत्तर देणे आवश्यक वाटते...संघटनेच्या पातळीवर चळवळी करून इतरांबरोबरच मराठीच्या प्राध्यापकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. महाविद्यालये व विद्यापीठपातळीवर मातृभाषेचाच द्वेष–मत्सर करून स्वकीय समाजसंस्कृतीशीच वैरभाव जोपासू पाहणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींविरुद्ध ही चळवळ आहे यात शंका नाही. प्रादेशिक भाषा, संस्कृती, परंपरा, इतिहाससंशोधन याकरिता विद्यापीठाची स्थापना झालेली असतानाही त्याच विद्यापीठात अन्य विषयांच्या अध्ययन-अध्यापनाच्या सोयी–सुविधा अधिक केल्या जाण्यात व हेतुतः मातृभाषेची गळचेपी केली जावी या अन्यायाविरुद्ध संघर्षात्मक भूमिका घेण्याची वेळ यावी ही दुर्दैवाची गोष्ट आहे.'

खरोखरीच ही खेदाची गोष्ट की महाराष्ट्रातल्या बहुतेक उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांत ही परिस्थिती आहे. सक्तीचं मराठी हद्दपार होऊन आता बरीच वर्षं लोटली असणार; परंतु ज्या ठिकाणी मराठीची स्थिती 'बरी' आहे तिथूनही ती हुसकावण्याचे प्रयत्न होतात. या पार्श्वभूमीवर घेण्यात आलेल्या परिषदेत प्रा. गं. बा. सरदारांनी केलेलं भाषण अतिशय चिंतनीय आहे प्रा. सरदारांनी अशा प्रकारच्या परिषदा यापूर्वी पुणे–नाशिकला आयोजित केल्या होत्या व कोल्हापूरच्या परिषदेचं उद्घाटन करताना ते म्हणाले, 'ज्या वेळी विज्ञानशाखेतून मराठी काढलं गेलं त्या वेळी विशेष अशी तीव्रता जाणवली नाही; पण वाणिज्य–शाखेतून ते काढलं गेलं तेव्हा गांभीर्य जाणवलं.' बार्शीच्या संमेलनात या

संदर्भात ठरावही केल्याचा त्यांनी उल्लेख केला. मराठीला राज्यात अग्रक्रम मिळावा, ती राज्यभाषा व्हावी यासाठी मुंबई, पुणे, जळगाव, नाशिक इत्यादी परिषदांत ठराव करण्यात आले. सर्व विद्यापीठांनी या प्रश्नाला चालना द्यावी यासाठी त्यांचं लक्ष वेधण्यात आलं. हा प्रश्न 'सर्व' मराठी भाषिकांचा आहे. याकरता काय केलं पाहिजे हे प्रा. सरदर सांगत होते त्या संदर्भात त्यांनी अतिशय चांगलं विवेचन केलं. ते म्हणाले की, खरी अडचण जरी कार्यवाहीची असली तरी दबावाची पद्धत मला नको वाटते. अतिरेक्यांचा दबाव हा प्रभावी ठरतो अशी स्थिती असली तरी समजूतदार लोकांचा प्रभाव पडायला हवा. त्यांच्या दबावाला मान मिळायला हवा. 'एकदम 'क्रांती'ची भाषा म्हणजे ठीक नव्हे' असंही ते गमतीनं म्हणाले.

प्रामुख्यानं तीन मुद्द्यांना धरून प्रा. सरदारांनी आपलं भाषण केलं. भाषावार प्रांतरचना, इंग्रजीचं वर्चस्व आणि सोप्या मराठीसाठी करायला लागणारे प्रयत्न या घटकांमधून मराठी भाषा आणि तिचा प्रभाव कसा वाढेल याबद्दल ते बोलले. ज्या हेतूनं भाषावार प्रांतरचना केली गेली तो हेतू लक्षात घेतला पाहिजे, निरनिराळ्या विषयाच्या तज्ज्ञांना लोकांशी त्यांच्या भाषेत बोलायला यायला हवं. मराठी शब्द म्हणजे मराठी भाषा नव्हे तर मराठी मन जाणून घेणारी ती भाषा हवी. कल्याणकारी राज्यात निरनिराळ्या खात्यांचा संबंध सामान्य लोकांशी येतो त्या वेळी ही अडचण निर्माण होते की बुद्धिवंतांचा वर्ग एका बाजूला नोकरशाही त्याच बाजूला आणि सामान्य-साधी अडाणी माणसं दुसऱ्या बाजूला. हे होऊ नये. १९८५ साली राज्याचे १००% व्यवहार मराठीत होतील या आश्वासनाचं काय झालं? मंत्रालयातला उच्चशिक्षित अधिकारी वर्ग किंवा विद्यापीठातील नोकरशाही मराठीच्या विकासाच्या आड येते 'मराठी माणसाच्या सांस्कृतिक विकासासाठी त्यानं मराठी वाङ्मय वाचलं पाहिजे. ते वाचन त्याच्या विषयाच्या अभ्यासाच्या आड येत नाही.' असं प्रा. सरदारांनी आवर्जून सांगितलं.

राष्ट्रभाषा हिंदीनं उत्तर-दक्षिण-वाद निर्माण केले आणि त्यातून इंग्रजीचं वर्चस्व सुरू झालं. शिवाय ज्ञानभांडारासाठी इंग्रजीवर अवलंबून राहणं हे अपरिहार्य आहे; पण ते वाघिणीचं दूध आमच्या आत्म्याशी संवाद साधू शकत नाही. मराठीला 'ग्रेस' नाही म्हणणाऱ्यांची कीव करावीशी वाटते. खरं तर यासाठी मराठी माणसानं आधी 'मराठी' बनावं आणि मग जो काही व्यवसाय असेल तो करावा. विशेषत: डॉक्टर-इंजिनियर्सनी तर 'मराठी' बनणं अपरिहार्य. औद्योगिक, न्यायालयीन आणि शैक्षणिक क्षेत्रात मराठीनं इंग्रजीच्या पुढं गेलं पाहिजे. लोकांच्या पैशावर चालणारी ही क्षेत्रं 'आपली' राहिली पाहिजेत, लोकांचीच राहिली पाहिजेत!

अर्थात मराठीचा आग्रह धरताना कोणत्याही भाषेचा द्वेष नसणारच. महाराष्ट्राचा अभिमान एकात्मतेच्या आड येणार नाही; परंतु ज्या वेळी कर्नाटकात कन्नड सक्ती होते तेव्हा तसे चित्र महाराष्ट्रात का उमटू नये? इंग्रजी भाषेचा अतिरेक होतो तेव्हा हळूहळू माणूस 'विचारसुद्धा' इंग्रजीतूनच करतो म्हणून मराठीतून विचार करणे हीच खरी प्रगतीची दिशा; पण मराठी सोपीही हवी. संस्कृतनिष्ठ मराठी म्हणजे विकासातील अडचणच आणि भाषेत शुद्धा-शुद्धता संकल्पना नाही. चूक किंवा बरोबर हेच काय ते खरं. म्हणून मराठी प्रबल करताना याकडं लक्ष द्यायला हवं. वर्तमानपत्रांनी याबाबत जागरूकता दाखवून कार्य करायला हवं.

## तलवारी गंजलेल्या नकोत!

अशा आशयाचं सरदारांचं भाषण तळमळीनं भरलं होतं. शेवटी ते म्हणाले की, आपण जर संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळी केल्या तर मराठीच्या विकासासाठी का नाही प्रयत्न करायचे? चळवळ जर विधायकपणे केली तर यश मिळेल. यासाठी सरकारला खिंडीत गाठायला हवं आणि आता निवडणुका आल्यात तर ही वेळ बरी आहे. लोकांच्या प्रेमाच्या दबावानं हे घडलंच पाहिजे. प्रा. सरदारांच्या मागं मराठी *अन्याय निवारण परिषदा भरवल्याचा* अनुभव असल्यामुळं की काय कोण जाणे; पण त्यांचं भाषण अतिशय सच्चेपणाचं वाटलं. या वेळी जो परिसंवाद भरवण्यात आला होता त्यामध्ये मराठी भाषेवर विद्यापीठात वा अन्यत्र कसा अन्याय होतोय आणि तो टाळण्यासाठी काय करावं यावर कोल्हापुरातले मराठीचे नामवंत प्राध्यापक बोलले. एक दोघांचं तारस्वरातलं बोलणं सोडलं तर साऱ्यांनीच या अन्यायाचं भेदक स्वरूप सांगितलं. याबाबत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. गो. म. पवार यांनी एक अतिशय मार्मिक अनुभव सांगितला. ते म्हणाले की, आमच्याकडे पाहुणा व्याख्याता बोलवण्याचा प्रकार विद्यापीठाने थांबवला आहे. या व अशा अन्यायाच्या संदर्भात आम्ही नेहमी विद्यापीठाच्या सिनेट बैठकांत किंवा कौन्सिलच्या बैठकात आमच्या मागण्या सांगत असतो; परंतु आता अशी स्थिती झाली आहे की, आम्ही अशा ठिकाणी बोलायला उभे राहिलो की बाकीच्या फॅकल्टीजचे लोक कुत्सितपणे हसतात. खरोखरच हा एक गंभीर आणि गमतीदार प्रकार. विद्यापीठाच्या बाकीच्या प्राध्यापकांना 'आपल्या मराठी' बद्दल काय वाटतं याचं हे उत्तर. प्रा. डी. यू. पवार (सामाजिक शास्त्रविभागाचे डीन) यांनी पाठ्यपुस्तकांवर टीका केली. विशिष्ट समुदायाची पुस्तकं असा त्यांनी या पुस्तकांचा उल्लेख केला; परंतु ते पुढे म्हणाले की, उद्या दडपण असं येऊ शकेल की, आमच्या भाषेतून आम्हाला विषय समजावून सांगा-असं मुलं सांगतील. याव्यतिरिक्त आणखीही वक्त्यांनी आपल्या भूमिका प्रभावीपणानं मांडल्या.

परिषदेला मिळालेला प्रतिसाद फारसा निराश करणारा नव्हता; पण उत्साहाचाही नव्हता. मराठीचे बरेचसे प्राध्यापक होते थोडेफार उत्साही व बाकीचे थोडे पत्रकार. ज्या कॉलेजात हा परिसंवाद होता तिथल्या विद्यार्थीवर्गालाही तिथं यावसं वाटलं नाही. प्रा सरदार किंवा प्रा. डी. यू. पवार ज्या 'दडपणाबाबत' बोलले त्या दृष्टीनं हे निराशाजनकच. आहे कुणाला खंत? वाणिज्य शाखेतून मराठीला हाकलल्याबद्दल कोणतीही विद्यार्थीसंघटना आवाज उठवीत नाही हे त्याच उदासीनतेचं लक्षण होय. सरकारला खिंडीत गाठायला हवं; पण त्यासाठी स्वत:च्या तलवारी गंजलेल्या नकोत तर धारेच्या हव्यात!

# गावस्करचा सत्कार

गावस्करला कोल्हापूरच्या महापालिकेनं चांदीची बॅट दिली. त्याचा शिवाजी स्टेडियमवर शानदार सत्कार झाला. पन्नास हजारांवर माणसांनी वेढलेल्या गावस्करनं खुसखुशीत भाषण केलं व प्रेक्षकांना खुश केलं; पण गावस्करची कोल्हापूर-फेरी काही पूर्ण यशस्वी झाली नाही!

त्याचं असं झालं- तो महालक्ष्मीच्या देवळात दर्शनाला गेला तर तिथं एका पुजाऱ्यानं त्याला फोटोला पोज द्यायला सांगितलं तर सुनीलराव चिडले आणि 'मी दर्शनाला आलोय फोटोसाठी नाही!' असं संतापून त्यानं सांगितलं. पुढं पुण्याच्या दै. तरुण भारतनं कोल्हापूरचे नागरिक त्याच्या या वर्तनावर खूप नाराज झाले असं वृत्त दिलं.

गावस्कर काही फारसा चूक नव्हता आणि इथली माणसं त्याच्यावर फार चिडली नाहीत हे आपलं माझं निरीक्षण. असो. मतामतांचा गलबला!

— सुनील धोपेश्वरकर

....'संघर्षाच्या नव्या वाटा' हे आबा करमरकर यांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. आबांबरोबर ग्रामीण विकास प्रयोगात सहभागी झालेले एक तरुण कार्यकर्ते नामदेव माळी यांनी, त्यांना हे पुस्तक कसे वाटले, हे या लेखात सविस्तरपणे लिहिले आहे. नामदेव माळी सध्या ग्रामायनचे एक कार्यकर्ते आहेत व ग्रामायन या संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या पुण्याजवळील शिरूर तालुक्यातील ग्रामीण विकास प्रयोगात त्यांचा प्रमुख वाटा आहे....

□

# कार्यकर्त्यांना उपयुक्त व मार्गदर्शक डायरी

आबांनी बी. ए. एलएल. बी. ची उच्च पदवी मिळविली. अलिबाग कोर्टात व मुंबई हायकोर्टात वकिली केली; परंतु हे चाकोरीबद्ध जीवन आबांना आवडले नाही. त्यांनी गवळ्याचा धंदा गोरेगाव–मुंबईत सुरू केला. त्यासाठी त्यांना वडिलांच्या इच्छेविरुद्ध पाऊल टाकावे लागले. गवळ्याचा–दुधाचा–धंदा करीत असतानाच १९४२–६२ या कालखंडात गोरेगाव–बोरिवली विभागात समाजवादी पक्षात पूर्ण वेळ काम केले. आरेकॉलनीतील गवळ्यांना संघटित करून सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध लढा दिला. १९७२ साली दुधाच्या धंद्यातून निवृत्त होऊन व स्वतःच्या मुलाच्या हाती धंदा सोपवून आबा पालघर तालुक्यात गेले व त्यांनी भूमिपुत्र प्रतिष्ठान व भूमिसेनेच्या वतीने तेथील आदिवासींच्या जमिनी–लागवडीचे प्रयत्न केले. तेथे कार्यकर्त्यांशी मतभेद झाल्यावर आबा १९७६ साली मावळात आले. इंद्रायणी कॉलेजच्या कृषितंत्र केंद्राचे एक वर्षभर काम त्यांनी पाहिले. त्या कॉलेजच्या प्राचार्यांशी मतभेद झाल्यावर भूविकास दलाची स्थापना करून त्यांनी १९७७ ते १९७९ या काळात मावळ तालुक्याच्या विकासाचे, परिवर्तनाचे काम केले. अतिशय चांगले काम उभे रहात असताना कार्यकर्त्यांशी मतभेद झाल्यामुळे आबांना तोही विभाग सोडावा लागला व आपल्या मुंबईच्या धंद्यात परत जावे लागले.

पण ज्या भूसेनेच्या कार्यकर्त्यांशी आबांचे मतभेद होऊन आबांना पालघर–विभाग सोडावा लागला होता, त्याच कार्यकर्त्यांनी पुन्हा आबांना आपल्या भागात नेण्याचा व पुन्हा काम सुरू करण्याचा प्रयत्न अलीकडेच सुरू केला आहे व प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाली आहे. तसेच मावळभागातील ज्या डोंगरीपाड्यावरील काम बंद झाले आहे, तेथील दलित वस्तीतील तरुण पुन्हा आबांना बोलावीत आहेत.

अशा प्रकारे जीवनात अनेक अनुभव घेऊन, कधी यशाच्या शिखरावर पोहोचून तर कधी कामातील अपयश पचवून, असंख्य मतभेदांचे-फाटाफुटीचे अनुभव पाठीशी घेऊन आणि पुन्हा पुन्हा समाजसुधारणेचे, समाजविकासाचे, पुनर्बांधणीचे व्रत व कृती हाती घेऊन, वयाची ६८ वर्षे गाठलेला हा वयोवृद्ध तरुण आपल्या कृतीतून, आपल्या अव्याहत व अखंड धडपडीतून आपले वेगळेपण सिद्ध करीत आहे. आपल्याला धडपडीचा नवा संदेश देत आहे. म्हणून आबांच्या 'संघर्षाच्या नव्या वाटा' या पुस्तकाला वेगळा अर्थ आहे.

आबांच्याबद्दल अनेक गैरसमज पसरले आहेत किंवा पसरविले जात आहेत. आबांचे व कार्यकर्त्यांचे कधीच पटत नाही किंवा त्यांचे कोणाशीच पटत नाही हाही एक आरोप आबांच्यावर केला जातो. त्यालाही उत्तर या पुस्तकात मिळेल. आबा व इंद्रायणी कॉलेजचे प्राचार्य व त्यांच्यातील मतभेद का झाले त्यासंबंधीची पत्रे व चर्चा, तसेच आबा व भूविकासदल–कार्यकर्ते यांच्यातील मतभेदाविषयीच्या चर्चा–यांची टिपणे, पत्रे व चर्चा या पुस्तकात जशाच्या तशा दिल्या आहेत. त्यामुळे मतभेदाची कारणे समजू शकतील, फाटाफुटीची कारणे समजू शकतील व आबांवर होणारी एकतर्फी टीका कमी होण्यास मदत होईल.

ह्या पुस्तकाचा उपयोग समाजातील तळागाळाच्या लोकांचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना, शिकाऊ कार्यकर्त्यांना व्हावा अशी आबांची अपेक्षा आहे. कार्यकर्ते काम करीत असताना असंख्य–बरे–वाईट अनुभव येत असतात. चुका होत असतात. तेव्हा प्रत्येक कार्यकर्त्याने तेच तेच अनुभव पुन्हा पुन्हा घेत बसण्यापेक्षा या पुस्तकापासून बोध घेऊन त्याप्रमाणे कृती करावी असा आबांचा विचार आहे. कारण आबांनी केलेल्या अनेक प्रयोगांचे, स्वतःच्या शिक्षणाचे धडेच या पुस्तकात आहेत.

संघर्षाच्या नव्या वाटा या पुस्तकात आबांनी मावळ तालुक्यात १९७६ ते १९७९ सालापर्यंत केलेल्या कामाच्या संदर्भात आलेल्या विविध अनुभवांचा, घटनांचा, परिस्थितीचा अंतर्भाव केला आहे. या काळात आबांनी नायगाव येथे इंद्रायणी कॉलेज तळेगाव–दाभाडेच्या कृषितंत्रकेंद्राचे काम पाहून कॉलेजच्या ६ विद्यार्थ्यांना शेती व समाजकार्याचे शिक्षण देण्याचे काम केले. इंद्रायणी कॉलेजला मिळालेल्या श्री. दोशी यांच्या जमिनीवर पिकांची प्रात्यक्षिके केली. नंतर नायगावच्या दलितवस्तीवर शेती, समाज व व्यक्तिपरिवर्तनाचे अनेक प्रयोग व प्रयत्न केले. कान्हे गावातील बेस्ट वर्कर्स युनियनच्या जमिनीवर पिकांची प्रात्यक्षिके केली व त्या माध्यमातून कामगार व

शेतकरी, शोषित दलित यांच्यामध्ये संबंध जुळवण्याचा प्रयत्न केला. भूविकासदलाची स्थापना करून पवनमावळातील करंज, कडदे, काले गावातील दलितांचे सामुदायिक शेतीचे प्रयत्न केले. ठिकठिकाणी एक गाव एक पाणवठ्याचे यशस्वी कार्यक्रम केले, दलितांच्या गहाण जमिनी सावकाराकडून सोडविण्याचे प्रयत्न केले, रोजगार हमीची कामे सुरू केली, नवीन कार्यकर्ते तयार करण्याचे काम केले.

## शेतीवर भर का ?

पुस्तक वाचताना आपणाला असे वाटेल की, आबांचा शेती करण्यावर अधिक भर का ? कार्यकर्त्यांनी शेतीचा अनुभव घेतला पाहिजे असे का ? परंतु यामागे आबांचा निश्चित असा विचार आहे. आबा म्हणतात, ‘ग्रामीण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वतः श्रम केले पाहिजेत. त्यांच्या परिवर्तनाच्या कामाचा शेतीउत्पादनाशी संबंध असणे आवश्यक आहे. कारण शेतीव्यवस्था, शेतीउत्पादन, शेतीवाटप, मालक-मजूर संबंध, शेतीमाल आणि त्याची विक्रीव्यवस्था आहे तशीच ठेवून केलेले ग्रामीण विकासाचे काम कमालीचे अपूर्ण आहे. कारण ग्रामीण रहिवाशांचा ८० टक्के तरी संबंध शेतीउत्पादनाशी आहे.’ याबाबत एक दोन उदाहरणे पुढे देत आहे. नायगावच्या डोंगरीपाड्यावरील दलित मंडळींची भाताची लागवड प्रत्येक वर्षी उशीरा होत होती. कारण काय तर घरची आर्थिक परिस्थिती नाजूक, काही माणसे नोकरीवर असूनही असह्य असा कर्जाचा बोजा. अशा परिस्थितीत घरातील स्त्रिया भात-लागवडीच्या हंगामी मजुरीच्या आशेने गावातील शेतकऱ्यांकडे भातलागवडीला जात आणि गावातील सर्व लागवड संपल्यावर आपले भात लावीत. शिवाय शेती म्हटले की, औजारे, भांडवलाचा प्रश्न आलाच. त्यामुळे त्यांची शेती उशीरा लागे, नगण्य उत्पादन येई व शेती तोटयात जाई. आबा व कार्यकर्त्यांनी दलित स्त्री-पुरुषांशी चर्चा केली व सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला का, या वर्षी आपण आपली शेती एकमेकांच्या सहकार्याने लावावयाची. भू–विकास दलाने थोडीशी आर्थिक मदत द्यावयाची; आणि आश्चर्याची गोष्ट, त्या वर्षी त्या दलितांची शेती गावाअगोदर लावून निघाली व उत्पादनात विक्रमी वाढ झाली. या प्रयोगातून दलितांच्या एकजुटीच्या शक्तीचे महत्त्व कळले. शास्त्रीय पद्धतीने शेती केल्यास, शेतीत प्रयोग केल्यास उत्पादनात विक्रमी वाढ होते हे समजले. तसेच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून माणसाच्या वर्तनाबद्दल खूप शिकायला मिळाले. या कामाचा परिणाम व या कामाच्या निमित्ताने अनेक झालेल्या कामांचा व चर्चांचा परिणाम म्हणजे एक वर्षाच्या कामानंतर येथील दलित स्त्री–पुरुष गावच्या सार्वजनिक पाणवठ्यावर आत्मविश्वासाने पाणी भरण्यास गेली. खरूज व अस्वच्छतेच्या सापळ्यातून त्यांनी स्वतःची सुटका करून घेतली.

करंज गावातील दलितांची जमीन, शेतातून उपसा जलसिंचन योजनेचे पाणी जात असतानाही भांडवलाचा अभाव व एकजुटीचा अभाव यामुळे वर्षानुवर्षे पडून होती. ती भूमिविकास दलाच्या सहकार्याने व दलितांच्या सामुदायिक प्रयत्नातून उदयाला आली. गहू, भात, वांगी, भेंडी या पिकांनी बहरून गेली; परंतु त्यांच्यापैकी एकाने, की जे स्वतःला दलित पँथरचे कार्यकर्ते समजत, त्यांचे आर्थिक व राजकीय हितसंबंध दुखावल्यामुळे ही योजना भस्मसात केली. त्यांनी त्यांच्याच बांधवांना दम भरला की, भूविकास दलाचा खर्च आपण देण्याचे कारण नाही. भूविकास दलाचे पैसे बुडवा, त्यांना आपल्या शेतात पाऊल टाकू देऊ नका. या दबावाला मंडळी घाबरली. कारण या माणसाचा दारूचा धंदा होता, त्याच्या हाताशी गुंड होते, त्यांनी दलित बांधवांना अनेक वेळा मारहाणही केली होती आणि काही जमिनी त्यांनी अर्धेलीने केल्या होत्या; परंतु अर्धेलीच दिली नव्हती. शेवटी हा प्रश्न काही समंजस माणसांनी लक्ष घालून सोडविला. यामुळे आबांचे फार शिक्षण झाले असे आबा म्हणतात. त्याचा फायदा कार्यकर्त्यांना होईल असे ते म्हणतात. केवळ दलितांना जमिनी देऊन प्रश्न सुटणार नाही किंवा दलितांच्या गहाण जमिनी सोडवून त्यांचा प्रश्न सुटणार नाही तर दलितांनी एकत्र व्हावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून प्रयत्न करायला हवेत. प्रस्थापितांशी टक्कर देण्याची त्यांची ताकद उभी केली पाहिजे. दलितांच्या प्रयोगाला सवर्ण मंडळींचाही विरोध असतो तोही दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

या पुस्तकातून जागोजागी शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याची व शेती हा धंदा म्हणून करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. यासाठी नायगावच्या डोंगरीपाड्यावरील शेतीचा प्रयोग; करंजचा शेतीप्रयोग, इंद्रायणी कॉलेजचा शेतीप्रयोग हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शक ठरतील. कारण त्यांनी काम करताना जमिनीची केलेली वर्गवारी, त्याचे तुकडे व नंबर, त्याचे क्षेत्रफळ, त्यात घेतलेली पिके, त्यांचा उत्पादनखर्च, उत्पन्न, त्यावर पडलेले रोग व त्यावरचे उपाय याबाबत फार सूक्ष्मपणे टिपणे ठेवली आहेत. या माध्यमातून ते लोकांपर्यंत शास्त्रीय दृष्टिकोन पोहचविण्याचा प्रयत्न करीत होते हे दिसते आणि पुस्तक वाचताना आपणाला संबंध जीवनातच कशा प्रकारची शिस्त, शास्त्रीय विचार अंगिकारला पाहिजे याचे महत्त्व कळत जाते.

आबांच्या या शेतीप्रयोगातून शेतकरी व ग्राहक यांचे संबंध; शेतकरी व सावकार, शेतकरी व बँक, पीक हमी योजना, शेतीमालाचा बाजारभाव अशा अनेक बाबींचे दर्शन होते.

आज जे शेतकरी-आंदोलन उभे राहिले आहे, जोर धरते आहे; याचा विचार करण्यासही आबांचे शेतीउत्पादनाचे कार्य कार्यकर्त्यांना उपयोगी ठरू शकेल.

## कर्जमुक्ती, व्यसनमुक्ती

आबा व कार्यकर्त्यांनी डोंगरीपाडा नायगाव येथील दलित तरुणांशी, स्त्रियांशी चर्चा करून त्यांच्या दुःखाची कारणे काय आहेत ही शोधण्याचा प्रयत्न केला होता. त्यातून कर्जमुक्ती व दारूबंदी हे दोन कार्यक्रम तेथील तरुणांनी हाती घेतले होते. त्यातून असे दिसून आले की, त्यांच्यापैकी अनेकांना कायम स्वरूपाच्या नोकऱ्या असूनही ते फार मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी आहेत. पगार झाला की, सर्व पैसे सावकाराला द्यावयाचे, पाच–पन्नास रुपये घेऊन परत यायचे. येताना दारू पिऊन–झिंगत यायचे व घरी आल्यावर बायकोला मारायचे. दुसऱ्या दिवशी सावकाराकडे जावयाचे, कर्ज घ्यावयाचे व उदरनिर्वाह भागवायचा. कर्जाचे कारण काय तर

व्यसन ! मग हे व्यसन सोडायचे व कर्जमुक्तीकार्यक्रम करायचा ठरले. सावकाराचे पैसे परत न करण्याचा कायदा असूनही लोकांनी पैसे द्यावयाचे मान्य केले. कारण मनात सावकाराची भीती होती. त्याचबरोबर दारू सोडण्याचा निर्णय घेतला. भूविकासदलाने सहकार्य करावयाचे ठरविले. टेंपररी कामावर असणाऱ्यांना सुरुवातीला कर्जमुक्त करावे व त्यांनी भू–विकासदलाकडे पगार जमा करावा व गरजेपुरते पैसे न्यावेत असे ठरले. या प्रयोगातून असे निष्पन्न झाले की, जे शिस्तीने वागले व ज्यांनी पूर्णपणे दारू सोडली त्यांची कर्जातून कायमची सुटका झाली. बायकांचा मार वाचला, पोराबाळांना खायला मिळू लागले. ज्यांनी नियमांचे उल्लंघन केले त्यांची दयनीय अवस्था झाली. १५ तरुणांनी दारू सोडली. निश्चय केला व कार्यकर्त्यांनी या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेतले तर बदल होतो हे सिद्ध झाले. या गोष्टीचा नवीन कार्यकर्त्यांना त्यांच्या कामात उपयोग होईल. याबाबत या पुस्तकातील लिखाण अत्यंत महत्त्वाचे आहे.

मावळभागात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो; पण उन्हाळ्यात प्यायला पाणी नसते आणि गावोगावी असणाऱ्या विहिरींचे पाणी सर्व मंडळी भरतात व दलितांना दूरवरून पाणी आणावे लागते. त्यामुळे दलितांमध्ये खरूज व अस्वच्छता याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आढळून येत होते. या कामी आबा व भूविकासदलाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या अखंड प्रयत्नाचे दर्शन आपणाला या पुस्तकात दिसून येते. एक गाव एक पाणवठ्याचे महत्त्व लक्षात येईल. आबा म्हणतात पाणी नाकारणे म्हणजे मानवी जीवन नाकारणे. या देशात आर्थिक सुधारणा झाली तरी अद्यापही दलितांना सामाजिक न्याय व मानवी जीवन नाकारले जात आहे. त्यासाठी दलितांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची आवश्यकता दिसून येते.

## चर्चा व पत्रव्यवहार

या पुस्तकातील लक्ष वेधून घेणारी बाब म्हणजे कार्यकर्त्यांच्या वारंवार झालेल्या चर्चा, कार्यकर्ते आणि लोक यांच्यात झालेल्या चर्चा. आबांच्याबरोबर नेहमीच ४–५ शिकाऊ कार्यकर्ते असत. त्यांच्याशी आबा वारंवार निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत. एखादा विचार भाषणबाजी न करता साध्या संवादपद्धतीने कसा कार्यकर्त्यांपर्यंत, लोकांपर्यंत पोहचवावा याची सुंदर उदाहरणे या पुस्तकात मिळतील. कर्ज या विषयावर डोंगरीपाड्यावर झालेली चर्चा,माणूस व जनावर यांच्यातील फरक काय या विषयावर डोंगरीपाड्यावरील लोकांशी झालेली चर्चा, लोकशाही, समता, स्वातंत्र्य, मत या विषयांवर आबा व इंद्रायणीचे ६ विद्यार्थी यांच्यामध्ये झालेली चर्चा, सम्यक क्रांतीविषयी आबा, नयना, कुसुम व वसुधा यांची झालेली चर्चा (पान १२४), २ ऑगस्ट ७६ रोजी नायगावातील तरुण मुलांशी झालेली दुधाचा धंदा या विषयीची चर्चा, आबा, नयना यांची सभा कशी हाताळावी याविषयी झालेली चर्चा, करुंजच्या शेतीकार्यक्रमाविषयी करुंजचे दलित, दलित पँथरचे कार्यकर्ते, डॉ. बाबा आढाव, आबा, अन्य कार्यकर्ते यांची झालेली चर्चा अशा अनेक चर्चांचे दर्शन व त्यातून व्यक्ती, समाज, समाजव्यवस्थातील बदल, अंतर्विरोध याचे आपणास आकलन होण्यास फारच मदत होते.

कॉफी, टेबल व धोबीघाट यांची आवश्यकता आबांना फार मोठ्या प्रमाणात वाटत होती. शक्य असेल तेव्हा ते सकाळी कॉफी पिता पिता कार्यकर्त्यांशी झालेल्या व करावयाच्या कामाविषयी चर्चा करीत, त्याशिवाय त्या कामातून निर्माण झालेल्या प्रश्नांसंबंधी चर्चा करीत. आबा आपल्या चर्चांना धोबीघाट म्हणत असत. काम करीत असताना येणारे कटु–गोड अनुभव, कार्यकर्त्यांमधील मतभेद, लोकांमधील भांडणे याविषयी मौन न बाळगता धोबी जसा घाटावर कपडे धुऊन स्वच्छ करतो तशी आपली मने इथे ओकावीत व घाण दूर करावी असा आग्रह आबांचा असल्याचे दिसून येईल व अशा धोबीघाटाची आवश्यकता कार्यकर्त्यांना पटेल.

या पुस्तकातील आबांचा पत्रव्यवहारही फार मोठा आहे. तो आबांच्या कामाचे, भूविकासदलाच्या कामाचे, आबांच्या विचारांचे व आबा या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवितो. आबांचे डॉ. भगवानराव बापट यांना लिहिलेले पत्र व त्यांनी त्यांच्या कामाविषयी केलेली मांडणी व विचार आणि ते तपासून त्यावर प्रतिक्रिया कळविण्याची मागणी तसेच डॉ. भिंगारे पति–पत्नींना लिहिलेले पत्र– त्यात कार्यकर्त्यांच्या सोयीविषयी व्यक्त केलेली कृतज्ञता, शेतकरी व ग्राहक यांच्या संबंधाचे विवेचन, आबा–नयना मतभेदाबद्दलचा पत्रव्यवहार हे आपणाला त्यांच्या कामाबाबत फार सांगून जातात व काम करणारांना काय करावे व काय करू नये याचे दर्शन घडवितात. आबा व कार्यकर्ते का फुटले, त्यांचे नेमके काय बिनसले, आबा–आळतेकर मतभेद, त्याची कारणे, कोण व्यक्ती कशा वागल्या, आबा चूक की कार्यकर्ते चूक याचेही उत्तर आबा या व्यक्तिमत्त्वाबद्दल चिकित्सक असणाऱ्यांना मिळेल.

भूविकासदलाचे कार्यकर्ते व आबा यांच्या मतभेदाविषयीचा व राजीनाम्याविषयीचा पत्रव्यवहार वाचल्यावर एक गोष्ट लक्षात येते की, आबांना ज्या कारणासाठी राजीनामा द्यावा लागला ते कारण अतिशय किरकोळ स्वरूपाचे होते; परंतु कार्यकर्त्यांनी त्याचा बाऊ केला. खरे कारण असे दिसते की, आबा व नयना असे दोन विचारप्रवाह सुरू झाले होते. आबांचा विचार मान्य आहे म्हणून कार्यकर्ते आबांबरोबर काम करीत होते. जेव्हा त्यांना त्यांचे विचार पटत नव्हते, तेव्हा त्यांनी तेथून बाहेर पडून



HIND

स्वतंत्र काम उभे करायला हवे होते. शिवाय ज्या व्यक्ती प्रत्यक्ष कामात नाहीत, अनुभव घेत नाहीत त्यांनी चालत्या कामाबाबत काय भूमिका घ्यावी हे त्यांनी विचाराने ठरवायला हवे होते. याचबरोबर आबा व आळतेकर यांच्यातील पत्रव्यवहारात आबांच्या बाजूनेच अधिक पत्रव्यवहार झाला आहे. आळतेकरांनी पत्र-व्यवहार न करता कृतीतून आबाविरोधी भूमिका घेतली. त्यामुळे त्यांच्या मतभेदाचे कारण समजू शकले नाही. त्यावरून आबांची बाजूच बरोबर आहे असे दिसून येते.

आपण लोकांशी, कार्यकर्त्यांशी संवाद कसा साधावा यावरही आपणाला या पुस्तकातून मार्गदर्शन घडेल. संवाद साधण्याच्या कोणत्याच पद्धतीशी आबा चिकटून राहिले नाहीत. कधी भाषण तर कधी हसत-खेळत संभाषण अशी पद्धत त्यांनी अवलंबिली. त्याचाही कार्यकर्त्यांना उपयोग होईल.

आबांनी या पुस्तकात आपल्या कामाच्या दिशेविषयी लिहिले आहे. आबांच्या मते, ९५ टक्के लोकांच्या जाणिवा वाढविण्याचे काम आपणाला करावयाचे आहे. ग्रामीण भागात पुनर्रचनेचे काम करावयाचे तर लहान शेतकरी, भूमिहीन, आदिवासी, मध्यम शेतकरी यांचे काम करावयास हवे असे आबा म्हणतात. ९५ टक्के लोकांचे जाणिवीकरण करण्यात, शास्त्रीय विचार, स्वावलंबन, स्वतःचा पुरुषार्थ, आत्मविश्वास, भांडवलनिर्मिती यांना महत्त्व द्यायला हवे.


अलिप्तपणे तरी भेदकतेने
घडवलेले बिहारच्या
माणसाचे दर्शन.

**पूर्णिया**

अनिल अवचट

बारा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

राष्ट्रवादी भूमिकेतून
नव्या क्षितिजांचा
घेतलेला शोध.

**बलसागर**

श्री. ग. माजगावकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.


ही सगळी उठाठेव का ? तर 'मानवी जीवन जगणे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय ही मूल्ये जगणे होय' असे आबा म्हणतात. त्यांचा कामाचा केंद्रबिंदू माणूस हा आहे. मानवी जीवनासाठी आवश्यक अशी परिस्थिती निर्माण करणे हे आपल्या कामाचे उद्दिष्ट असले पाहिजे असे आबा म्हणतात.

काम करताना एकाच वेळी आर्थिक, सामाजिक व राजकीय या तिन्ही स्तरांवर काम करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आहे. लोकांच्या राजकीय जाणिवा वाढविण्याच्या कामालाही ते अग्रहक्क देतात.

त्यांनी या पुस्तकात समांतर सरकारची कल्पना मांडली आहे. सामर्थ्य व सत्ता असूनही जे काम सरकार करू शकत नाही ते काम सामाजिक काम करणाऱ्या संस्थांनी केले पाहिजे व आपली शक्ती उभी केली पाहिजे, आपली यंत्रणा उभी केली पाहिजे असे ते मांडतात.


रचना आणि संघर्ष हा वाद उपस्थित न करता एकाच वेळी रचना व संघर्षाचे काम हाती घेतले पाहिजे असे ते म्हणतात. तसेच अन्यायनिवारण व न्यायप्रस्थापना ह्या बाबींवर त्यांनी भर दिला आहे. अन्यायनिवारण ही प्रतिक्रिया आहे, तर न्यायप्रस्थापना ही क्रिया आहे. अन्यायनिवारण्याच्या कामाबरोबरच न्यायप्रस्थापनेचे काम व्हायला पाहिजे. न्यायप्रस्थापनेच्या कामाला व्यक्तीपासून सुरुवात होते. त्यामुळे व्यक्तीला आपल्यामध्ये काही बदल घडवून आणावे लागतात व व्यक्तिबदलाला सुरुवात होते.

स्वयंसंघर्ष व सामुदायिक संघर्ष ही संकल्पनाही आबांनी या पुस्तकात स्पष्ट केली आहे. ते म्हणतात की, सामुदायिक संघर्षात व्यक्ती लोप पावते, ज्या कारणासाठी सामुदायिक संघर्ष आहे ते कारण सफल होते; परंतु व्यक्ती आहेत तशाच रहातात. तेव्हा सामुदायिक संघर्षाबरोबर स्वयंसंघर्षाची आवश्यकता आबांनी व्यक्त केली आहे. हा विचार आताच्या कामगारसंघटनांच्या बाबतीत फार मौलिक असा वाटतो.

अशा प्रकारे या पुस्तकात आबांनी आपल्या विचाराचे असंख्य तुकडे पेरून ठेवले आहेत. आबांची भूमिका विचारवंताची किंवा बुद्धिवंताची नसून काम करता करता आलेल्या अनुभवाची चीर-फाड करणाऱ्या, त्यावर विचार करणाऱ्या, त्यातून नवा विचार घेणाऱ्या, स्वतःचे शिक्षण करणाऱ्या धडपड्या कार्यकर्त्याची आहे.

हे पुस्तक डायरीरूपाने पुढे येत असल्यामुळे एखाद्या कामा-विषयी, चर्चेविषयी, घटनेविषयी आपणाला सुसूत्रता वाटणार नाही; परंतु त्या त्या तुकड्याचा विचार केला, तर आपणाला खूप काही शिकता येईल. घटना जशा घडल्या, व्यक्ती, समाज, समाजव्यवस्था, परिस्थिती जशी वाटली, दिसली त्याचे प्रथम हस्तलिखाण मिळणे खूप अवघड आहे. अशा परिस्थितीत हे पुस्तक तसा ऐवज म्हणून मोलाचे वाटते. डायरी लिहिण्याचे काही दोष किंवा डायरी लिहिण्यावरील काही आक्षेप गृहीत धरूनही हे पुस्तक उपयुक्त वाटते.

☐



# सत्तांतरच्या निमित्ताने

## ' क्रौर्य, संघर्ष, नाट्य हे तुमचे–आमचे शब्द आहेत '

**– माडगूळकर**

मुलाखत : जगदीश गोडबोले, प्रा. राम बापट

**श्री.** व्यंकटेश माडगूळकरांच्या ' सत्तांतर ' कादंबरीला साहित्यअकादमीचं पारितोषिक मिळालं. ' मराठी कादंबरीतील 'सत्तांतर ' असाहि काही समीक्षकांनी कादंबरीचा गौरव केला आणि ते उचितही होतं; पण पुस्तक वाचल्यावर मनाला एक विचित्र हुरहुर लागली. काही तरी अधुरेपण जाणवत राहिलं. निसर्गातील विराट जीवन–चक्राचे, भीषण संघर्ष–नाट्याचे दर्शन कादंबरीच्या पानापानातून, शब्दातून जाणवत होते; पण पुस्तक वाचल्यावर या भीषण सत्ता–संघर्षाचा एक सुन्न करून टाकणारा, जीव हादरवून टाकणारा अनुभव बाकी राहिला नाही. भीषण संघर्ष–नाट्याची एक ललित कादंबरीच मनात उरली. ही कादंबरीची ताकद की मर्यादा ? की या आपल्याच मनाच्या, अपेक्षांच्या मर्यादा ?

वन्य प्राणी–जीवनाचा शास्त्रीय अभ्यास करणारे अनेक आहेत; पण या शास्त्रीय लिखाणाला ललितसाहित्याची डूब देणारे माडगूळकर विरळेच. मग त्यांना कादंबरीत नेमकं काय अभिप्रेत होतं ? आहे ? विषय सुचला कसा ? तयारी कशी केली ? प्रत्यक्ष निरीक्षणं कुठे आणि कशी केली– एक ना दोन हजार प्रश्न. मग माडगूळकरांशीच बोलायचं ठरवलं. मुलाखत–शब्दांकन–निरीक्षण–परीक्षण काहीही म्हणा, 'सत्तांतर' च्या निमित्ताने आणि प्रामुख्याने सत्तांतरविषयी गप्पा मारणं एवढाच उद्देश. मी आणि प्रा. राम बापट.

माडगूळकरांशी बोलणं किंबहुना त्यांचं बोलणं ऐकणं–बघणं हा एक विलक्षण अनुभव असतो. शब्दांना पंख फुटतात. नव–नवीन कल्पना धुमारतात. सगळं रान बघता बघता जागं होतं. ससा नुसता जाळीमध्ये दडत नाही, तर त्याचे कानही हे अस्से मागे दबलेले असतात. वानरं नुसती येत नाहीत तर या फांदीवरून त्या फांदीवर दॉण ऽ दॉण उड्या मारत, खक्खक्याक्खक् धुमाकूळ घालत येतात. मग आपणही या रानाचा कंच भाग होऊन जातो आणि आपण असे रंगलेलो–दंगलेलो असताना माडगूळकर एकदम 'फ्रीझ' होतात! सगळे रान चिडीचिप् होते–

□

**'मी'** काही सत्तांतर किंवा दुसरं एखादं पुस्तक लिहायचं असं अगोदर ठरवून नागझीराच्या अभयारण्यात गेलो नव्हतो; पण तिथल्या जंगलातून भटकताना एक–एक कल्पना, एक–एक प्रकरण उमलून यायला लागलं. भटकून परत आल्या–आल्या मी चित्तमपल्लींना सांगत असे की, हे हे प्रकरण असं–असं होणार. ' नागझीरा ' पुस्तकात 'वाटा' हे स्वतंत्र प्रकरण आहे.त्यातील ' रस्ते हे वाहनासाठी असतात आणि वाटा या पायांसाठी असतात हे जनावरांएवढं कोणाला माहीत असेल असं मला वाटत नाही ' हे वाक्य मला असं तिथेच सुचलं.

सत्तांतरचं पण असंच झालं. मी पहाटे उठून फिरायला जात असे; पण माझ्या अगोदरच वानरांची एखादी टोळी या वाटेवरून गेलेली असायची. त्यांच्या खाणा-खुणा जागोजाग आढळायच्या. एकदा एक गंमत बघायला मिळाली. शाल्मिलीच्या झाडाखाली वानरांची एक टोळी बिया खात बसली होती. दुर्बिणीतून नीट निरखून बघितलं तर मधल्या एका मोठ्या खळ्यासारख्या जागेत एक मोठा हुप्प्या आरामात खात बसला होता आणि बाकी वानरं त्याच्या आजू–बाजूनी जाताना, वावरताना अगदी जपून आदबीने वागत होती. आपल्या घरात आजोबा वा दुसरा एखादा कर्ता पुरुष बसला असताना आपण दबून वागतो अगदी तस्स् ! मला हे खूप ' ह्यूमन ' वाटलं. माझ्या बंगली समोरच्या झाडावर एक माकडीण आपल्या चिमुकल्या पोराला घेऊन यायची. त्या पोराच्या खोड्या, आईचे लटके रागावणे, त्यांचे प्रेम–जिव्हाळाही खूप ' ह्यूमन ' जाणवला. मी बघत गेलो तशा आणखी–आणखी गोष्टी जाणवत गेल्या. तळ्याच्या काठच्या जंगलात वानरं होती; पण नुसती वानरं होती म्हणून भागत नव्हतं तर तळ्याच्या चार कोपऱ्यांत चार टोळ्या होत्या. त्यांच्या त्यांनी आखून घेतलेल्या सीमा–रेषा होत्या. काही वेळा या टोळ्या एकमेकांसमोर येत. गदागदा फांद्या हालवत, दात विचकत एकमेकांना आव्हान–प्रतिआव्हान देत आणि आता अगदी हाणामारी होणार असं वाटत असतानाच निमूटपणे माघारी फिरत. या टोळ्यांच्या सीमारेषेवरील बांधावरही एक टोळी होती. भयंकर फेरोशियस् जवळ फिरकू द्यायची नाही. मग समजत गेलं की सत्तेमध्ये प्रतिस्पर्धी नको म्हणून किंवा एका टोळीमध्ये इन्–ब्रीडिंग होऊ नये या निसर्गप्रेरणेमुळेच हाकून दिलेली ही सगळी पोरं ' ऑल मेल बॅन्ड' या सगळ्या उद्योगातून माझं कुतूहल

प्रचंड वाढत गेलं आणि सत्तांतर हे पुस्तक मनात जन्माला आलं. वाढत गेलं. कारण शेवटी कुतूहल हे सर्व ललितलेखनाचं मूळ असतं. जीवनाविषयी प्रचंड कुतूहल तुमच्या मनात सतत जागृत पाहिजे.

मग तुम्ही लगेच कादंबरी लिहून काढलीत का ?

नाही. लगेच लिहिली नाही. मला कथा–कादंबरी असं काही ठरवून लिहायचं नव्हतं. मी जे बघितलं, मला जं भासलं ते लिहायचं होतं; पण आता लिहायचं म्हटल्यावर या विषयाची जास्तीत जास्त माहिती करून घ्यायला पाहिजे होती. मी काही शास्त्रज्ञ नाही. जॉर्ज शाल्लरचं 'धी इयर ऑफ गोरिला' किंवा गुडालबाईंचे 'इन द शॅडो ऑफ मॅन' अशासारखी काही पुस्तकं वाचली होती; पण आता प्रायमॅटॉलॉजी या विषयावरची पुस्तकं वाचायला पाहिजे होती. मग नेपियरच्या 'हॅन्डबुक ऑफ लिव्हिंग प्रायमेटस्' पासून हार्डीबाईंच्या 'लंगुर्स ऑफ माउंट अबू' पर्यन्त या विषयावरची पुस्तकं पिंजून काढली. या हार्डीबाईंचे पुस्तक म्हणजे पाचशे पानांचा चांगला जाड–जूड प्रबंध आहे. सत्तांतर लिहिताना मला त्याचा खूप उपयोग झाला. नाही तर याच निरीक्षणाला वर्षानुवर्षं लागली असती–

आपल्या अनुभवाला इतक्या अभ्यासपूर्ण व्यासंगाची विशेषत: ललित–लेखनाच्या बाबतीतही जोड देण्याचा तुमचा हा प्रयत्न आम्हाला खूप दुर्मिळ वाटतो–

खरं आहे. ताई–माईच्या गोष्टी टेबलावर बसून लिहिता येतात; पण अशा प्रकारचे लिखाण करायचे म्हणजे अभ्यास आलाच; पण त्यामुळे काही वेळा पंचाईत होते. हे लिखाण 'ओरिजिनल्' नाही म्हणून टीकाकार नाक मुरडतात. आता हार्डीबाईसारखं आणखी किती तरी लिखाण वाचून ललितलेखकाला काही मिळेलच असं नाही आणि मिळालं की, धाडकन् तो कुठल्या कुठे जाऊन पोहोचतो.

मला एकदा एका वाचकाने मार्मिक प्रश्न विचारला होता की तुमच्या लिखाणात पशु–पक्षी–वनस्पती यांचे खूप संदर्भ येतात. या संदर्भांमुळे लेखनाला काय प्राप्त होतं ? तपशील की गुणवत्ता ? माझं उत्तर आहे लेखनाला समग्रता प्राप्त होते. माणूस या निसर्ग-पटलाचा एक घटक आहे आणि त्याचं चित्रण करताना या सर्व निसर्ग–पटलाचं वर्णन येणारच. काही जणांच्या लिखाणात ते कदाचित जास्त असेल. शिवाय माणसा–माणसांतील नाती ललित–साहित्याचा विषय होऊ शकतात मग निसर्ग आणि मानव यामधील नाते ललित–लेखनाचा विषय का होऊ शकणार नाही ?

## धीमे सत्तांतर

माडगूळकर, वन्य–प्राणीजीवनाचा शास्त्रीय अभ्यास अनेकांनी केला आहे. अनेक समाज—शास्त्रज्ञ मनुष्य—प्राण्यांतील या प्राण्याची नाळ शोधत आपल्या या पूर्वजांपर्यंत पोहोचले आहेत. मानवी जीवनातील भीषण सत्ता-संघर्षाचा आरसा त्यांना या पूर्वजांमध्ये सापडला असा त्यांचा दावा आहे. कारण आपापली साम्राज्ये राखण्यासाठी सदैव संघर्ष–सज्ज असलेली; पण काही तरी गमावल्याच्या भीतीने प्रत्यक्ष संघर्षाला हात न घालणारे मुडा वा लालबुड्या आपल्याला मानवी जगात प्रत्यही आढळतात किंवा सत्तास्पर्धेतून तात्पुरते बाद झाल्यामुळे काही तरी मिळवण्यासाठी संघर्ष पणाला लावणारे मोगासारखे हिटलरही सापडतात. सत्तेसाठी केवळ दुसऱ्या टोळीतील वा दुसऱ्याचीच नाही तर आपल्याच पोरा–बाळांना देशोधडीला लावणारे, जीवे मारणारे सत्ताधारीही आपल्याला आढळतात. हे सर्व संदर्भ पुस्तक लिहिताना तुमच्या मनात होते का ?'

–नाही. असे काही संदर्भ वा 'ॲनिमल फार्म' सारखे रूपक माझ्या मनात नव्हते. शिवाय इसाब–नीतीसारखे धूर्त कोल्हा,लबाड लांडगा असे मानवी मूल्यांचे, विचारांचे आरोपणही मला प्राण्यांवर करायचे नव्हते, तर ते जसे आहेत तसेच दाखवायचं होते. म्हणून मी पुस्तकात वानरांना भाषा दिली नाही. कारण वानर बोलला म्हणजे मग मानवी आरोप आलाच. मग हे सगळं लिखाण संवादाशिवाय लिहायचं म्हणजे, मला जरा कठीणच वाटत होतं. मलाच नाही; पण झाड नसलेली वाट चालायला जसं कठीण जातं, तसंच वाचकालाही हे वाचणं कठीण जाईल अशी भीती होती. शिवाय मी नुसता तपशील वा निरीक्षणच सांगत बसत नाही ना, याचांही ताण मनावर होताच.

नाही ! हा तोल तुम्ही फार] सुरेख सांभाळला आहे. एखादा चित्रकार जसं कुचल्याच्या चार फटकाऱ्यांतच सर्व चित्र उभं करतो तसं तुम्ही नेमक्या तपशिलात सर्व वातावरण उभं केलं आहे–

–शिवाय हा अनादिकाळापासून चालत आलेला जीवनसंघर्ष आहे. म्हणून मी भाषाही जाणीवपूर्वक वेगळी वापरली आहे, 'उष्णकाळ' आला असं म्हटलं, मे-महिना सुरू झाला असं म्हटलं नाही.

नेमका हाच विचार [आमच्या मनात आला. पुस्तकाच्या पाना–पानावर तुम्ही जीवन-संघर्ष, टोळी-टोळीतील, एकाच टोळीतील नर–नरांतील, माद्या–माद्यांतील, वानरांना पकडून खाणाऱ्या हिंस्र पशु-पक्ष्यांतील–प्रभावीपणे मांडला आहे; पण सर्व पुस्तक वाचून झाल्यावर क्रौर्याचा जीव सुन्न करून टाकणारा अनुभव येत नाही. अनेक लेखक कलावंत निसर्गाकडे–जंगलाकडे वळतात. तिथं त्यांना आढळतं एक तांडव किंवा जीव कमालीचा सुन्न करणारा अनुभव. लॉरेंझोने 'ऑन ॲग्रेशन' मध्ये त्याचे संपूर्ण तत्त्वज्ञानच मांडून दाखवले आहे. टेनेसी विल्यम्स् वा तेंडुलकरांसारखे लेखकही असं मानतात की मानवी–जीवनातील हे जे क्रौर्य आहे ते अटळ सत्य आहे आणि ते उघडया-नागडया स्वरूपात आहे तसंच मांडलं पाहिजे. एक हादरवून टाकणारा अनुभव ते आपल्याला देतात. समाजशास्त्रज्ञ मनुष्यप्राण्यातील 'प्राण्याचा' आरसा आपल्यापुढे ठेवतात; पण तुमच्या या लिखाणात क्रौर्याचा, भीषणतेचा आघात मनावर होत नाही, तर जीवन–संघर्षाची ललित-कृति जाणवते वा निसर्ग–चक्राच्या लयीतील एका अर्थाने शांत–धीमे सत्तांतर जाणवत रहाते.

मी मघाशी मांडत होतो तो हाच मुद्दा आहे अहो, हे क्रौर्य, भीषण संघर्ष–नाट्य हे तुमचे–आमचे शब्द आहेत. भावना आहेत. मी काळाप्रमाणे सतत वाहत असणारा संघर्ष मांडला तरी त्यात तुम्हाला अभिप्रेत अस-

णारा किंवा पाहिजे होता तो संघर्ष, क्रौर्य नाही. कारण ती भावना निसर्गात नाही. सिंह प्राण्याला फाडून खातो त्यात कसलं आलं क्रौर्य ? निसर्गातील तो एक सहज भाव आहे. गुडाल बाईंने तरस–लांडगे वगैरे प्राण्यांवर नुकतंच एक पुस्तक लिहिलं आहे. त्याचं नाव मोठं समर्पक आहे. ' इनोसंट किलर्स ' निसर्गामध्ये हीच निरागसता आहे आणि माझ्यासारख्यांना हीच निरागसता भावते, जाणवते.

क्रौर्य शोधणं जर मूळ असेल तर निरागसताही शोधणं–

नाही मी निरागसता शोधत नाही. निरागसता जरी माझा शब्द असला तरी निसर्गात तिथे जे आहे त्यातली निरागसता मला जाणवते,

## झिरपलेला तपशील

या दृष्टिकोनातून बघितलं तर तुमच्या एकूण लिखाणातून सलगपणे जाणवणारं, एक निरागस, कसलाही कडवटपणा नसणारं असं जे व्यक्तिमत्त्व आहे त्याचा हा परिणाम असेल कदाचित्; पण तरीही सत्तांतर हे नातं काहीसं फसवं वाटतं किंवा तुम्ही लिहून जाता ' धोक्यामुळे तर दहाजण एकत्र येतात आणि एकत्र राहू लागतात.| एकत्र रहाण्यासाठी धाक लागतोच. बाहेरचा नसला तरी घरातला–' अशा वेळी आपल्या मनात हुकुमशहा-हुकुमशाहीचे संदर्भ येत असतानाच तुम्ही 'मन धाकवितात आणि झोटिंग, हडळी जन्माला येतात ' असं लिहून आम्हाला एकदम धाडकन् खाली आदळता.

इथे सत्तांतर हे टेक ओव्हर या अर्थाने आहे आणि त्याला शास्त्रीयपरिभाषेत टेक-ओव्हर असंच म्हणतात. माझ्या मनात हुकुमशहा, हुकूमशाही वगैरे काही नव्हतं. आता वाचकांनी त्यांच्या संवेदनेनुसार त्यांना काय पाहिजे तो अर्थ घ्यावा आता या पुस्तकापुरता तरी मी भूतकाळ झालो आहे.

आणखी एक प्रश्न थोडासा विचित्र वाटेल पण ' स्त्री-मुक्ती ' च्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे. तुमच्या या पुस्तकात माद्या जेव्हा-जेव्हा ' जुगतात ' – मग ती ' झिप्री ' असो वा ' तरणी ' असो, कशा ना कशा फायद्यासाठी वा स्वार्थासाठी ' जुगतात '; नर मात्र जेव्हा केव्हा भावना होईल तेव्हा–

त्याचं कारण मादी नराएवढी ताकदवान नाही. नरासारखे सुळेही तिला नाहीत. त्यामुळे तिला स्वतःचे, स्वतःच्या पोराचे, गर्भाचे रक्षण करायचे असेल तर असं काही तरी करावं लागतं. निसर्गतःच तिला हे शिक्षण मिळालं आहे. म्हणूनच ' तरणी गाभण असतानाही मोगाशी ' जुगायला ' उत्सुकता दाखवते. शिवाय पुस्तकात मोगा आधीच्या नरापासून झालेल्या सर्व पिल्लांना ठार मारतो असं दाखवलं आहे. मी याबाबत हार्डीबाईंना लिहिलं होतं. त्यांचा निष्कर्ष असा आहे की, प्रत्येक सत्तांतराच्या वेळी हे घडतंच किंवा शक्य होतंच असं नाही.

मुद्दा तो नाही. फक्त मादीच स्वार्थासाठी ' जुगते ' आणि तुम्ही तो संबंध थेट मानवजातीपर्यंत पोहोचवला आहे. उदाहरणार्थ तुमचं ते वाक्य– ' काही मिळवण्यासाठी त्या बदल्यात आपलं शरीर नराच्या हवाली करण्याची ही पद्धत काही मनुष्य-प्राण्यानंच स्वीकारलेली नाही ! '

' हो, माणसं स्वार्थासाठी असं करतात;

पण पुस्तकात फक्त माद्याच स्वार्थापोटी असं करतात असा अर्थ अभिप्रेत होतो आणि त्याचा संबंध मानव-जातीशी.

माझ्या मनात तेव्हा तेवढंच होतं.

तुमच्या भाषेविषयी, तुम्हाला सुचणाऱ्या नेमक्या शब्दांविषयी आम्हाला फार कुतूहल आहे. उदाहरणार्थ मोगा, मुडा, लालबुड्या, झिप्री, उनाडी अशा वानर-वानरींच्या समर्पक नावांपासून ते भीजपाऊस, भीतीने डरंगळायला झालं, मुताची तुरतुरी सोडली असे अनेक शब्दप्रयोग तुम्ही केले आहेत. ते तुम्हाला सुचतात तरी कसे ? वानरांच्या पाणी पिण्याचे वर्णन तर अप्रतिम आहे. तुम्हीच मागे लिहिल्याप्रमाणे तुम्हाला या हालचाली खरोखर 'दिसतात?' अवाज 'ऐकू' येतात ? शब्द खुणावतात ?

हे नक्की कसं घडलं ते नाही सांगता यत; पण नुसतं वानर मुतला वा त्याने लघवी केली म्हणून भागत नाही. त्याने मुताची तुरतुरी सोडली म्हटलं म्हणजे चित्राला आवाजही प्राप्त होतो.

आणि त्या पाणी पिण्याचं तर मी किती तरी वेळा बघितलं आहे. नागझीराच्या तळ्यासमोरच माझी बंगली होती. मी दुर्बिणीतून नीट निरखून बघत असे. वानरं आली कशी, बसली कशी, मागे सतत कोणी राखणीला बसल्याशिवाय पाण्याला तोंड कशी लावत नसत. माझ्याकडे एक स्टॉप-वॉचही होतं. ही पहा डायरीत नोंद आहे– ' ८ मे रोजी १५ वानरांची एक टोळी दुपारी साडेतीनपासून तीन-पंचावन्नपर्यंत पाणी पीत होती. एक वानर तर १ मिनिट काही सेकंद पाणी पीत होता. हे सर्व मी नीट बघतो. अगदी लहानपणापासून ' वनविद्या ' मी रामोशांकडून शिकलो आहे. या सर्व गोष्टी, तपशील आत कुठे तरी झिरपत असावा–

तुमच्या लेखनातून तुमच्यातील चित्रकारही सतत जाणवत रहातो. तुम्ही प्रत्यक्ष रेखाटनही करता. लक्ष्मणचा कावळा आणि तुमचा वानर विलक्षण जिवंत वाटतो. तुम्ही ही रेखाटनं किंवा तुमच्या आवडत्या राल्फ थॉमसनच्या भाषेत सांगायचं तर हे ' एक प्रकारचे लेखन ' कसं करता ? प्रत्यक्ष जागेवरच करता का ?

–राल्फ थॉमसन थोरच माणूस आहे. त्याच्यासारखी रेखाटनं करायला मला अनेक जन्म घ्यावे लागतील. आपल्याकडे प्रत्यक्ष जागेवरच रेखाटन करायला सोयीही नाहीत. मी जागेवर काही वेळा रेखाटनं करतो; पण मुख्यतः चित्र-कोशाची मदत घेतो. मात्र कोशातून मला पाहिजे असलेल्या मोगाची, मुडाची एखादीच लाइन सापडते. मग ती धरून पुढचे चित्र रेखाटतो. काही वेळा तर मनात काही नसताना पाखरांचा थवा उतरावा तशी ही रेखाटनं येतात. ' करुणाष्टक ' मधली ती रेखाटनं अगदी अशीच अचानक अवतरली. आजी पाठमोरीच आली. मास्तर तिरकाच आला.

मागे तुम्ही म्हणाला होतात की, मेंढपाळांच्या खांडाबरोबर एक वर्ष रहावं, भटकावं अशी खूप इच्छा आहे–

इच्छा खूप आहे; पण दरवेळी शक्य होतंच असं नाही. आपल्याकडे तशा सोयी-सवलतीही नाहीत. नुसते दारिद्र्यच नाही, तर कल्पना–दारिद्र्यही; पण विषय मनात पक्का आहे. हे काय सोनमायरचं ह्यासंबंधीचं शास्त्रीय लिखाण मी वाचत आहे.

' सत्तांतर ' अचानक घडलं. तुम्ही तो एक प्रयोग म्हणून केला. मग आता जाणीवपूर्वक अशा आणखी एखाद्या विषयाकडे वळणार आहात का ?

नाही, मुळीच नाही. माझ्या पद्धतीप्रमाणे मी आताच अशा विषयाकडे वळणार नाही. कारण एकदा एका प्रकारात यश मिळालं की कलावंताला स्वतःचाच कित्ता गिरवण्याचा मोह होतो. यातूनच कलावंताचं दारिद्र्य जन्माला येतं. कलावंतानं नेहमी अनोळख्या गोष्टींना सामोरं गेलं पाहिजे. त्याची आव्हानं स्वीकारली पाहिजेत म्हणूनच मी आता आशय आणि अभिव्यक्तिदृष्ट्या वेगळ्याच प्रकाराकडे वळेन. नाही तर कलावंताची ताकद ती कसली ? □

# मातृभूमीबद्दलच्या भावना : लिओनिड ब्रेझनेव

मागील अंकात ब्रेझनेव यांच्या आठवणींचा पहिला भाग दिला होता. या अंकात आठवणींचा पुढचा भाग. १९२० नंतरचा कालखंड ब्रेझनेव यांच्या दृष्टीनं खूप महत्त्वाचा, गुंतागुंतीचा ठरला. या कालात त्यांनी कम्युनिस्ट लीग, कम्युनिस्ट पार्टीमध्ये प्रवेश केला, समाजकार्याची दीक्षा आखून घेतली आणि त्याचबरोबर लष्करी शिक्षणही घेतलं. त्यानंतरच्या आठवणी महायुद्धाच्या छायेतल्या आहेत.

**अनुवादक : डॉ. चं. रा. तळपदे**

## एक : कम्युनिस्ट लीगमध्ये प्रवेश

मातृभूमीबद्दल आपल्या सर्वांच्या मनात सद्भावना असते. अशा तऱ्हेची भावना असणे ही एक उत्तम गोष्ट आहे. आपल्या देशातल्या सौंदर्यपूर्ण स्थानांचा, घटनांचा विचार करून ती भावना वाढीस लागते असे नाही. आपली मुळे या भूमीत खोलवर जावी लागतात. ज्या वेळी तुम्ही मातृभूमीसाठी काही तरी कार्य करता, तिच्यासाठी घाम गाळता, एखाद्या शेतावर धान्य पिकवता, एखाद्या नव्या शहराची स्थापना करता, एखादा नवा रस्ता बांधून पुरा करता किंवा मातृभूमीच्या संरक्षणासाठी खंदक खोदता तेव्हा तुम्हाला आपली मुळे मातृभूमीत खोलवर जायला पाहिजेत या शब्दांचा अर्थ समजतो.

हे मी सांगतोय याचे कारण १९२० नंतर मी माझ्या देशाचा शोध घेऊ लागलो. आगगाडीतून, नद्यांवरच्या बोटीतून, कधी घोड्यावरून रपेट करीत आणि पुष्कळदा पायीच प्रवास करून मी अक्षरशः हजारो किलोमीटरची अंतरे मोजली आहेत. माझ्या वडिलांचा जन्म ज्या प्रदेशात झाला होता, त्या प्रदेशाला भेट देण्यासाठी केलेल्या प्रवासापासून मी माझ्या देशाचा शोध घ्यायला सुरुवात केली. कुर्स्क प्रांतात गेल्यानंतर शेतकऱ्याचे खरेखुरे जीवन मला पाहायला मिळाले व शेती कशी करावी हे मी तेव्हा शिकून घेतले.

माझ्या आयुष्याला अशी कलाटणी कशी काय मिळाली हे मला प्रथमतः सांगितले पाहिजे. यादवी युद्धाने आमच्या जीवनाला खीळ बसल्यानंतर, व्होल्गाकाठच्या प्रदेशात भयंकर दुष्काळ पडला. त्याबरोबर १९२१ – १९२२ या वर्षात दुष्काळ व अवर्षण यांनी युक्रेन प्रांताला ग्रासले. येकतारिनोस्लाव प्रांतात सारे पीक पावसाच्या अभावी कोळपून जळून गेले. कामकऱ्याला दिवसा अर्धा पौंड पाव असे राशन देण्याची पाळी आली आणि तेही राशन नियमित मिळत असे असे नाही; पण जोपर्यंत भट्ट्या पेटलेल्या होत्या, धुरांड्यातून धूर बाहेर पडत होता आणि कारखाना चालू होता तोपर्यंत आम्ही कामावर जात होतो; पण सरतेशेवटी तो काळाकुट्ट दिवस उजाडला आणि ड्निपर लोखंड व पोलादकारखाना बंद करावा लागला!

कारखान्याच्या निरनिराळ्या विभागांत शांतता पसरली आणि कारखान्याचा सारा परिसर उजाड, उध्वस्त वाटायला लागला. मालाच्या ने-आणीसाठी असलेल्या रेल्वेच्या रुळांमध्ये जंगली गवत वाढून, रेल्वेमार्ग दिसेनासा झाला. अवर्षण होते तरी जंगली गवत मात्र मोकाट वाढत होते. अवर्षणाने शेते कोळपून गेली; पण जंगली गवतावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. जवळपासच्या गावांत जाऊन, धान्य मिळवण्याच्या खटपटीला कामकरी लागले. घरातल्या जिनसा विकून, धान्य विकत घ्यायला पाहायचे असे त्यांचे प्रयत्न चालत. काहींनी कारखान्यातल्या लोखंडाच्या पट्ट्या भोवतालच्या प्रदेशातल्या श्रीमंत शेतकऱ्यांना विकून, धान्य विकत घ्यायला पाहिले. श्रीमंत शेतकरी लोखंडी पट्ट्या पडत्या भावात विकत घेऊन, त्यांच्या गाडीच्या चाकांना धावा बनवत किंवा पिपांच्या फळ्या घट्ट करण्यासाठी त्या पट्ट्या वापरत. आमच्या कुटुंबाला अशा तऱ्हेचा उद्योग करता आला नाही. घरातल्या वस्तू विकून धान्य खरीदावे असे वाटत होते; पण विकण्यासारख्या काहीही वस्तू आमच्याजवळ नव्हत्या. आम्ही अशा तऱ्हेच्या वस्तूंचा संग्रह केला नव्हता किंवा अशा तऱ्हेचा संग्रह आम्हाला करता आला नव्हता. कारखाना बंद पडल्याने आम्हा दोघांच्या– माझी व वडिलांची– नोकऱ्या सुटल्या होत्या आणि आम्हालाच कोणी तरी खाऊ घालावे अशी स्थिती झाली होती!

कामेनस्कोयेमध्ये राहाण्यात काहीच अर्थ उरला नव्हता. काम उपलब्ध करून देण्यासाठी एक सरकारी केंद्र गावात उघडण्यात आले; पण कोणतेच नवीन काम उपलब्ध करून देता आले नाही. अन्नधान्यांच्या तुटीपाठोपाठ रोगराईने डोके वर काढले आणि रोज आमच्या आसपासच्या घरांतून कोणी ना कोणी इहलोकचा निरोप घेऊ लागले. शहर ओसाड पडले आणि आम्हालासुद्धा शहर सोडून जाणे भाग पडले. कारखान्याला शेवटचा रामराम ठोकण्यासाठी

मागे वळून बघत राहिल्याचे मला अजूनही आठवते. शहर सोडताना मागे वळून पाहिले तेव्हा कारखान्याच्या छपरावर, घुरांड्यावर आणि मिळेल त्या जागी रॅव्हनपक्ष्यांची घरटी दिसून आली. त्या दृश्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. डोक्यावर कृष्णवर्णी रॅव्हनपक्षी घिरट्या घालत होते आणि जीवन हरपलेल्या कारखान्याची आकाशातून टेहळणी करीत होते.

तेव्हा पोट भरण्यासाठी शेतीकडे वळणे भाग होते. दुसरा इलाजच नव्हता. त्या वेळी अनपेक्षितरीत्या जो प्रवास करावा लागला, तो प्रवास माझ्या तारुण्यामुळे मला फार मजेदार वाटला. तो माझ्या आयुष्यातला पहिला प्रवास होता. शिवाय माझे वडील ज्या गावाहून कामेनस्कोयेला आले, तेथे जाऊन शेतकाम करून पाहावे हा विचार माझ्या मनात किती तरी दिवस घोळत होता. राष्ट्राकरिता शेती किती महत्त्वाची आहे व धान्योत्पादन राष्ट्राला किती आवश्यक आहे हे मला त्याही वेळी कळून चुकले होते. काही काळानंतर डिनपर कारखाना पुन्हा सुरू झाल्यावर माझे आईवडील व लहान भावंडे कामेनस्कोयेला परतली. तेव्हा घरी परतण्याची तीव्र इच्छा असूनही मी शेतावर राहाण्याचा निर्णय घेतला आणि कुर्स्क, वायलोरशिया व उरल्स या प्रांतात शेतकाम करण्यात मी खूप वेळ खर्च केला.

तेव्हापासून मला दोन गोष्टींची ओढ आहे. शेतकऱ्याच्या कामाबद्दल आस्था बाळगायला माझ्या मातापित्यांनी मला लहान वयातच शिकवले. कामेनस्कोयेमधील आणि सभोवतालच्या खेड्यापाड्यांतील वातावरण अशा प्रकारची आस्था वाढीस लागण्यास फार पोषक होते. आमची वसाहत जरा वेगळ्याच प्रकारची होती. कामेनस्कोयेमध्ये कारखान्यात रोज कामावर जाणारे कामकरी राहात होते तरी ते शहर अर्धवट खेडेगावासारखे होते. कारखान्यातले कामकरी खेड्यांतून आले असल्याने व येथे येण्यापूर्वी शेतावर राबत असल्याने त्यांचे अंतःकरण शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांनी भारले होते. आपण कशी शेती करत होतो ते वडील कधीकधी सांगत असत. शेतावर राबूनही पुष्कळदा त्यांच्या पदरी निराशाच पडली; पण आपल्या श्रमाने वाढलेल्या शेताची नांगरणी, लावणी, कापणी व मळणी करण्यात व शेतावर जाण्यात काय आनंद वाटतो व शेत सोडून आल्यावर किती वाईट वाटते हे मला त्यांच्या बोलण्यात दिसून यायचे. आमच्या कुटुंबात अन्नाबद्दल आदरबुद्धी आहे ही काही चुकून अपघाताने घडून आलेली गोष्ट नाही. रोज टेबलापाशी जेवण घ्यायला बसल्यावर आई एक लहानसेच वाक्य बोलून जायची, ते मला चांगलेच आठवते. ती म्हणायची– 'मुलांनो, तुमचे जेवण झाले, आता उरलेले अन्न टिपून संपवायचे. काहीही टाकायचे नाही !' हे वाक्य तिच्या तोंडून व लोकांच्याही तोंडून बाहेर पडायचे, ते अन्न पुरेसे नव्हते किंवा लोक जन्मजात चिक्कू होते म्हणून नाही. मुलांमध्ये काटकसरीचा गुण यावा यासाठी वडीलमाणसे मुद्दाम त्यांना तसे सांगत असत. त्यामुळे मुलांमध्ये अन्नाबद्दल एक तऱ्हेची पवित्र भावना निर्माण होत असे.

आपल्या रोजच्या अन्नाबद्दल अशा प्रकारची भावना निर्माण झाल्याखेरीज मनुष्य खऱ्या अर्थाने उत्तम व नीतिमान नागरिक होणार नाही, असे मला वाटते. सध्या काफे, बेकरी आणि जेवणाच्या जागा यामध्ये अन्न फुकट घालवू नका, त्याचा नाश करू नका अशा अर्थाची छापील पत्रके पाहायला मिळतील. अशा पत्रकांचा काही तरी उपयोग होत असणार; पण अशा तऱ्हेची पत्रके लावण्याची वेळ यावी याचे मला फार दुःख होते. काटकसरीने वागायच्या सवयी लहानपणातच लावायला पाहिजेत आणि हे काम मातापित्यांनी आपापल्या कुटुंबातून पार पाडले पाहिजे.

येथे मला १९१८ सालातली एक आठवण सांगावीशी वाटते. पीपल्स कॉमिसारच्या कौन्सिलचे कार्यकारी मॅनेजर व्ही. डी. बॉच ब्रुअेविच यांनी लेनिनला प्रश्न केला– 'व्लॅडिमीर इलियच–आपला लढा कशासाठी चालला आहे हे एका शब्दात सांगता येईल का ?' क्षणाचाही विलंब न करता, लेनिनने उत्तर दिले, 'अन्नधान्यासाठी!' अन्नधान्यासाठी लढा देणे म्हणजे समाजसत्तावादासाठी लढा देणे होय असे त्यांनी त्या काळात लिहिले आहे.

माझ्या तरुणपणीच्या घटना आठवता, मला वाटते की, साऱ्या देशभर कार्य करीत राहाणे देशाच्या उन्नतीच्या दृष्टीने आवश्यक होते. ते कार्य करीत असता मी खूप शिकलो आणि बऱ्याच गोष्टी मला समजून आल्या. नंतर मी ड्नेप्रोझरझिन्स्कला परतलो व कारखान्यात धातुकामाचा अभियंता म्हणून कामाला लागलो; पण ज्या काळात आम्ही राहात होतो, त्या काळातील घटनांमुळे ग्रामीण घडामोडी मला विचारात घ्याव्याच लागल्या व त्या घडामोडींची छाप माझ्या मनावर राहिली. कारखान्यातील जीवनाचा अनुभव आणि ग्रामीण घडामोडींची छाप या दोन्ही गोष्टी माझ्या मनात एकमेकांत मिसळून गेल्या आणि एकमेकांच्या पूरक बनल्या. ग्रामीण घडामोडींबद्दलचा विचार आणि कारखान्याच्या जीवनाविषयीचा विचार माझ्या मनात एकत्र होऊन त्यांचा एकजीव झाला. कारखान्याचे जीवन व ग्रामीण भागातले जीवन यातून योग्य ते धडे घेण्याचे भाग्य मला लाभले हे माझे सुदैवच होय असे मी मानतो.

पण हे सांगता सांगता, मी बराच वाहात गेलो आहे. अत्यंत खराब काळात ग्रामीण भागातील जीवनाचा अनुभव घेऊन, शेताची नांगरणी, पेरणी व मळणी करून धान्योत्पादन केल्यानंतर आणि भूमातेशी जवळीक जोडल्यानंतर, मी कुर्स्कमधल्या भूमि–विकास सर्वेक्षण शाळेत प्रवेश केला. त्या शाळेची प्रवेशपरीक्षा मी उत्तीर्ण झालो. परीक्षेत चांगले मार्क पडले असावेत असे वाटते. कारण प्रवेशाबरोबर सरकारी शिष्यवृत्तीही मिळाली.

उत्तम प्रकारची साधनसामुग्री आणि खूप दिवस चालत आलेले प्रागतिक प्रघात असलेली ती एक जुनी शाळा होती. (बॉच–ब्रुअेविचनीही याच शाळेचा अभ्यासक्रम पुरा केला होता.) तेथे पुऱ्या केलेल्या चार वर्षांच्या अभ्यासक्रमात आम्हाला गणित, भौतिकीशास्त्र आणि रसायनशास्त्र ही तिन्ही शास्त्रे अभ्यासून त्यात प्राविण्य मिळवावे लागले. शिवाय भूगणित, सर्वसाधारण भूविज्ञान, भूगोल आणि शेतीविषयक संख्याशास्त्र यांचाही विशेष अभ्यास आम्हाला करावा लागला. आम्ही लेनिनची पुस्तके व लेखही वाचले; पण लेनिनचे लेख संकलित केलेली जाडजूड, सध्या मिळतात तशी पुस्तके त्या वेळी नव्हती. लेनिनच्या लेखांच्या लहान लहान पुस्तिका आमच्या हातात आल्या व त्या पुस्तिकांद्वारे लेनिनचे विचार ग्रहण करण्याचा आम्ही प्रयत्न केला. छापखान्यात छापून झाल्याबरोबर आमच्या हाती पडलेल्या पुस्तिकांच्या शाईचा वासही गेला नव्हता,

तेव्हा आम्ही त्या वाचायला घेतल्या होत्या. सोव्हियट राज्यपद्धती आणि सोव्हियट युनियनचे कायदे यांचाही आम्ही अभ्यास केला. यानंतर शिग्री जिल्ह्यात भूविकास–सर्वेक्षणाचे काम करीत असता, भू–विकास–सर्वेक्षकाला या सर्व विषयांचे तात्त्विक व प्रात्यक्षिक ज्ञान असले पाहिले याबद्दल माझी खात्री झाली.

वयाच्या सतराव्या वर्षी मला यंग कम्युनिस्ट लीगमध्ये प्रवेश मिळाला. त्यानंतर सर्व प्रकारच्या सामाजिक म्हणजे समाजहिताच्या कार्यात मी भाग घ्यायला पाहिजे, ते माझे एक कर्तव्य आहे असे मी समजू लागलो. समाजहिताची खूप कामे त्या वेळी चालू होती. 'निरक्षरतेचा नाश करा', 'अनाथांना मदत करा' या घोषवाक्यांच्या अनुरोधाने सुरू केलेल्या सर्व मोहिमांत आम्ही भाग घेतला. अशा प्रकारच्या सामाजिक कार्याबद्दल पैशाची अपेक्षा ठेवायची नाही, बिनपगारी स्वयंसेवक म्हणून काम करायचे या तत्त्वावर सुरू केलेल्या 'लाल सुबोट्निक' पथकात आम्ही काम करत होतो. आम्ही खेडोपाडी सार्वजनिक वाचनालये उघडली, प्रदर्शने भरवली, सभा घेतल्या. आणि शेतमजुरांना काय हक्क आहेत ते त्यांना समजावून सांगितले. या साऱ्या गोष्टी करायला आणि त्या कामात रममाण व्हायला, आम्हाला कसा तरी वेळ मिळाला किंवा आम्ही तो कसा तरी प्राप्त करून घेतला.

## दोन : गुंतागुंतीचा खडतर काळ

आम्हाला एक सत्य शिकावे लागले. वेळेला आकारमान आहे, तशीच व्याप्तीही आहे. हाताशी असलेले तास आणि दिवस काहीही न करता फुकट घालवता येतात आणि मिळालेल्या अवधीत खच्चून काम करता येते आणि असे केले तरच कार्य करता येते.

खेर्सन रस्त्यावरच्या वसतिगृहात आम्ही थंडीने कुडकुडत भुकेले राहात असू आणि हाती येतील ते कपडे अंगावर चढवत असू. गळ्यापर्यंतच्या बटनांचे सॅटिनचे ब्लाउज अंगात घालत असू, कामकऱ्यांच्या तेलकट टोप्या डोक्यावर चढवत असू, क्युबन कोसॅकच्या गोल वाटोळ्या हॅट कधी डोक्यावर चढवत असू, तर कधी बुडोनी कापडी शिरस्त्राणे वापरत असू. नेकटाय वापरणे त्या दिवसांत माहीत नव्हते– वर्ज्य होते. १९२० नंतरच्या काळातल्या तरुण कम्युनिस्टांचे दिवस फार प्रस्फुरक व मनोरंजक अवस्थेत जात होते. देशाच्या गरजा त्या आमच्या गरजा होत्या, इतके आम्ही देशाशी तादात्म्य पावलो होतो, साऱ्या मानवजातीला उज्ज्वल भवितव्य आहे अशी स्वप्ने पाहात होतो, आरडाओरड करत होतो, वादविवाद करत होतो, प्रेमात पडत होतो, मोठ्या उत्सुकतेने ग्रंथवाचन करत होतो आणि आमची स्वतःची काव्येही लिहीत होतो.

आम्ही काव्याचे चोखंदळ समीक्षक आहोत असे आम्हाला कधीच वाटले नाही. काव्यपंक्तींचे त्या क्षणाला काय महत्त्व आहे, त्या काव्यपंक्तींचा राजकीय परिस्थितीवर काय परिणाम होण्यासारखा आहे यात आम्हाला जास्त रस होता. यंग कम्युनिस्ट लीगचे आपले स्वतःचे असे वेगळे कवि होते.

एक दिवस आगगाडीने प्रवास करीत असता, माझ्या डब्यात माझ्याच वयाची व माझ्याचसारखी विद्यार्थीदशेत असणारी एक मुलगी होती. प्रवास करता करता आमच्यात बोलणे सुरू झाले. तिच्याजवळच्या वहीत तिने किती तरी कविता टिपून ठेवल्या होत्या. त्या कवितांमध्ये काही वेगळे वैशिष्ट्य होते. त्यातील एक कविता मी पूर्वी कधी वाचली नव्हती. कवितेचे शीर्षक होते 'व्होरोव्हस्कीच्या मृत्यूसंबंधी' त्या वेळी व्होरोव्हस्की या आमच्या राजदूताचा लॉसेन शहरी खून झाला होता व त्या खुनाने आम्ही सारे क्षुब्ध झालो होतो. त्या मुलीच्या वहीतले काव्य माझ्या मनाला चटका लावून गेले आणि मी ते लगेच तोंडपाठही केले. 'लॉसेनमध्ये असे घडले' या ओळीपासून शेवटच्या कडव्यापर्यंत मी ती कविता तोंडपाठ करून टाकली. त्या कवितेचे शेवटचे कडवे होते–

ॲस्टोरिया हॉटेलमध्ये त्या सकाळी  
आमच्या राजदूतावर खुन्याने झाडली गोळी  
आणि रशियाच्या महान इतिहासग्रंथात  
आणखी एका हुतात्म्याची झाली नोंद.

मायाकोव्स्कींनी कुर्स्क शहराला दिलेली भेट मला चांगली आठवते. कुर्स्कच्या रेल्वेक्लबात त्यांचे काव्यवाचन होणार होते. यंग कम्युनिस्ट लीगचे आम्ही सभासद त्या क्लबात गर्दी करून होतो हे सांगायला नको. प्रेक्षकांमधल्या सुरेखसे छान छान कपडे घातलेल्या लोकांनी त्यांचे स्वागत करण्याऐवजी त्यांची रेवडी उडवायचा प्रयत्न केला. 'तुम्ही स्वतःला सामूहिकवाल्या गटातले समजता,' प्रेक्षकांपैकी कोणी तरी एकजण ओरडला, 'मग तुमच्या काव्यात मी–मी–हा शब्द का येतो ?' तात्काळ मायकोव्स्कींनी उत्तर दिले, 'मग तुमच्या मते झारसुद्धा सामूहिकवाल्या गटातलेच होते का ? पण ते तर लिहायचे– आम्ही– दुसरे निकोलस.' गडबड-गोंधळ झाला व हशा आणि टाळ्या पडल्या. त्याच सभेतली दुसरी एक घटना सांगतो. प्रेक्षकांच्या मागच्या रांगेत एक तरुण जोडपे होते. मायाकोव्स्कीचे काव्य ऐकण्याऐवजी एकमेकांना अगदी खेटून जवळ बसण्यात त्यांना जास्त मजा वाटत असावी. मायाकोव्स्कीने काव्यवाचनाला सुरुवात करताच हे जोडपे बाहेर जायला निघाले. त्यांना पाहाताच त्यांच्याकडे बोटे दाखवून, कविराज आपल्या दणदणीत आवाजात बोलले, 'साथी हो, नजरेत भरणारे हे एक जोडपे पहा !' पुन्हा हशा पिकला आणि टाळ्या पडल्या.

'व्हलॅडिमीर इलियिच लेनिन' या त्यांच्या काव्यातल्या काही पंक्ती मायाकोव्स्कींनी वाचून दाखवल्या. आम्ही अगदी गप्प बसून ते काव्य ऐकले. थोड्याच दिवसांपूर्वी आम्ही लेनिनच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला होता. ते राष्ट्रव्यापी दुःख आमच्यापैकी प्रत्येकाचे व्यक्तिगत दुःख झाले होते.

तोटके  
होते उल्यानॉवचे जीवन  
ते संपेपर्यंत  
त्याचा शेवट होईपर्यंत  
आम्हाला माहीत होता  
त्याच्या जीवनाचा सारा तपशील;  
पण कॉम्रेड लेनिनच्या

दीर्घायुष्याबद्दल
खूप लिहायला पाहिजे
आणि ते नव्याने लिहायला पाहिजे.

हे शब्द आमच्या मनावर खूप मोठा आघात करून गेले. मनातले विचार उघड बोलून दाखवावे अशा तऱ्हेने मायाकोव्स्की आपले काव्य वाचीत; पण त्यांचा दणदणीत आवाज श्रोत्यांच्या शेवटच्या रांगेपर्यंत पोचत असे. त्यांनी आमच्या उच्च संकल्पनांवर खरोखरच नवा प्रकाश टाकला.

पक्ष आणि लेनिन
दोन जुळे भाऊ आहेत ।
इतिहासाच्या पानावर
कोणाचे स्थान उच्च समजायचे ।।
आम्ही जेव्हा लेनिन म्हणतो
तेव्हा आमच्या मनात पक्ष असतो ।
आणि आम्ही जेव्हा पक्ष म्हणतो
तेव्हा आम्हाला म्हणायचे असते लेनिन ।।

त्यांनी सोप्या व स्पष्ट शब्दांत मांडलेले हे विचार आमच्या मनात आणि हृदयात कायमचे घर करून राहिले. ते आमच्या स्मृतीतून कधीच जायचे नाहीत !

'पहिले खनिज खणून काढणाऱ्या कुस्र्कमधल्या कामकऱ्यांना' हे काव्यसुद्धा मायाकोव्स्कींनी वाचून दाखवले. ते काव्य ऐकताना मला आमचा कारखाना आठवला–त्या झोतभट्ट्या, त्या उघड्या भट्ट्या– सारे काही माझ्या डोळ्यांसमोर आले. पुन्हा एकदा मला घरची आठवण झाली, तेथे जावेसे वाटले; पण त्या वेळी १९२७ मध्ये भू–विकास–सर्वेक्षणाचा अभ्यासक्रम पुरा करून मी भू–विकास सर्वेक्षक झालो होतो आणि कुर्स्क प्रांतातल्या एका जिल्ह्यात माझी नेमणूक झाली होती. त्यानंतरचा शेतीचा हंगाम मी ओर्शाजवळ बायलोरशिया प्रांतात काढला. त्यानंतर माझी उरल्स प्रांतात नेमणूक झाली व तेथे मी प्रथमतः मिखेलोव्स्क जिल्ह्यात आणि नंतर बिसर्ट जिल्ह्यात काम केले. उरल्स प्रांतात जाण्याआधी मी विवाह केला आणि तेथे जाताना मी पत्नीला बरोबर घेऊन गेलो. यंग कम्युनिस्ट लीगच्या सभेमध्ये माझी एका मुलीबरोबर ओळख झाली. ओळखीनंतर परिचय वाढत गेला व आम्ही गृहस्थाश्रमात प्रवेश केला. ती माझ्यासारखीच कामगारकुटुंबात वाढली आहे. बेळगोरोडहून कुर्स्कला आपला अभ्यासक्रम पुरा करण्यासाठी ती आली होती. माझ्या पत्नीचे नाव व्हिक्टोरिया पेट्रोवना असून, माझी पत्नी व माझ्या मुलांची माता एवढेच तिचे माझ्या आयुष्यात स्थान राहिले नसून ती माझी एक अत्यंत जवळची व उत्तम प्रकारचा प्रतिसाद देणारी मैत्रीण झाली.

मी उरल्स प्रांतात बराच काळ काढला. तेथल्या शेतांतून मी कित्येक मैलांची पायपीट केली, भरपूर काम केले. तो प्रांत, तेथले लोक आणि तेथले निसर्गवैभव यांनी मला मोहवून टाकले.

तो एक अत्यंत कठीण, गुंतागुंतीचा काळ होता. जीवन कंठण्याचे ठरून गेलेले व प्रचारात असलेले प्रकार नाहीसे होत होते आणि जीवन जगण्याचे नवीन प्रकार नुकतेच कोठे जीव धरत होते. पेरलेल्या धान्याने जमिनीतून आस्तेच डोके वर काढावे तसे हे नवीन प्रकार आस्तेच डोके वर करत होते. ते हुडकून त्यांना प्रोत्साहन द्यावे लागत होते. डिसेंबर १९२७ मध्ये पक्षाचे पंधरावे संमेलन भरले होते. यू. एस. एस. आर. मध्ये म्हणजे सर्व सोव्हिएत राज्यात समाजवादाची कशी वाढ करायची यासाठी त्या संमेलनात एक कार्यक्रम स्वीकारण्यात आला होता. लेनिनचा सहकारविषयक कार्यक्रम अंमलात आणण्याचे ठरवून संमेलनाने सामूहिक शेतीच्या दिशेने पावले टाकायचे ठरवले आणि कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली सोव्हिएत प्रजेने सामाजिक क्षेत्रात खूप मोठे कार्य करून, देशाला समाजवादाच्या विकासाच्या मार्गावर नेऊन ठेवले. १९२७ ते १९३१ या चार वर्षांच्या काळात मी ग्रामीण भागात काम करत होतो, शेतांचे सामूहिक शेतात रूपांतर करत होतो आणि देशाला माहीत झालेल्या महान सामाजिक क्रांतीमध्ये भाग घेत होतो.

जुन्या काळी माझ्या व्यवसायातल्या लोकांना नुसते भू–सर्वेक्षक म्हणत असत. आता ते नाव बदलले आहे व आम्ही खऱ्या अर्थाने भूविकास–सर्वेक्षक झालो आहो. लोक त्या काळात आपली जमीन, पशुधन, शेतावरच्या इमारती आणि शेतीची अवजारे एकत्र करून सामूहिक शेतीनिर्मितीचा प्रयत्न करत होते. शेताच्या सीमा दाखवणारी कुंपणे मोडून, त्या शेतांना एकत्र आणून, ठिकठिकाणी विखुरलेली शेते एकत्र आली आहेत असे दाखवणारे नकाशे काढायचे एवढेच काम आम्हा भूविकास–सर्वेक्षकांकडे नव्हते. हे सर्व काम सामाजिक, वैज्ञानिक, अर्थशास्त्रीय आणि तांत्रिक दृष्टिकोनातून करायचे होते आणि हे करताना आधुनिक शेतीच्या पद्धती वापरता येतील व मानवी परिश्रमाने जे काम होत असे, ते यंत्राकडून करवून घ्यायचे आहे हे ध्यानात ठेवून सामूहिक शेतीचे चित्र डोळ्यांसमोर आणावे लागे.

सामूहिक शेतीची सर्व उपलब्ध जमीन शास्त्रीय व संघटितरीत्या उपयोगात आणायची, हे चित्र डोळ्यांसमोर ठेवून आम्ही सामूहिक शेतीचे नवे नकाशे तयार केले. आमचे नकाशे सामूहिक शेतीने खूप वर्षे वापरले आणि महायुद्धानंतर कृषि–विद्यावेत्त्यांनीही वापरले. ही सामूहिक शेती प्रथमतःच निर्माण करण्याच्या कामात भूविकास-सर्वेक्षणाचा मला जो अनुभव मिळाला, तो मला नंतर कझाखस्तानमध्ये कधीही न नांगरलेल्या कुवार जमिनीतून सामूहिक शेती निर्माण करताना उपयोगी पडला.

त्या काळात शेकडो लोकांच्या दृष्टीने सोव्हिएत–सत्तेचा प्रतिनिधी म्हणून वावरण्याचा मला पहिला–वहिला अनुभव मिळाला. नवीन रस्त्यांची दिशा ठरवण्यावरून, पातळीमापक व सर्वेक्षणदंड कसा ठेवला आहे यावरून आणि कुळाकबरोबर किंवा श्रीमंत शेतकऱ्यांबरोबर झगडा होण्याची वेळ आल्यास, भूविकास–सर्वेक्षक कसा वागतो यावरून शेतकरी कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणाचा अंदाज करीत असत. शेतासंबंधीच्या आमच्या कामावरून सोव्हियट

**'आम्ही जेव्हा पक्ष म्हणतो तेव्हा आम्हाला म्हणायचे असते लेनिन.'**

सत्ता कोणाच्या पाठीशी आणि कोणाच्या विरुद्ध आहे हे अगदी स्पष्ट झाले.

विसर्टमधल्या रेल्वेकामगारांनी शेतकऱ्यांना पहिला ट्रॅक्टर भेट दिला तो प्रसंग मला अजूनही आठवतो. हा कमी शक्तीचा छोटासा फोर्डसन-ट्रॅक्टर होता. रशियाचा पहिला स्पुटनिक अवकाशात उडाल्यानंतर जेवढ्या उत्साहाने रशियन लोकांनी त्याचे स्वागत केले त्याहूनही जास्त उत्साहाने जनतेने त्या ट्रॅक्टरचे स्वागत केले. शेतात नव्याने दिसू लागलेले ते एक यंत्र नव्हते, तर साऱ्या ग्रामीण भागाचे सामाजिक परिवर्तन करणारे ते एक साधन होते. त्यामुळे सामूहिक शेतीचा प्रचार झाला आणि तिच्याबद्दल अनुकूल मत तयार व्हायला मदत झाली. स्थानिक कुळाकनी म्हणजे श्रीमंत शेतकऱ्यांनी आणि त्यांच्या बगलबच्च्यांनी या 'लोखंडी घोड्या'ने नांगरलेल्या शेतात काहीही पिकायचे नाही अशी अफवा पसरवली; पण या ट्रॅक्टरने नांगरलेल्या शेतात धान्याची निपज फार चांगली झाली. तेव्हा कुळाकच्या बगलबच्च्यांनी एके रात्री धान्य साठवलेल्या कोठाराला आग लावली. विसर्टमधल्या सामूहिक शेतकऱ्यांनी मोठ्या धाडसाने आगीत उडी घेऊन, कोठारातले धान्य वाचवले!

या साऱ्या गोष्टी सिनेमातल्या पडद्यावर घडल्या नाहीत किंवा एखाद्या पुस्तकात कल्पक लेखकाने वर्णिलेल्या नाहीत. त्या गोष्टी माझ्या आयुष्यात घडून आलेल्या आहेत. यंग कम्युनिस्ट लीगच्या सभासदांना बरोबर घेऊन, मी कुळाकना त्यांच्या शेतांत भेटलोय आणि गावात भरलेल्या सभांमध्ये त्यांच्याबरोबर वादविवाद केलाय. लाठ्या, काठ्या आणि आकड्या यांचा मार मिळेल अशा धमक्या आम्हाला देण्यात आल्या, भयानकरीत्या तुमचा शेवट करू असे धमकावणारी पत्रे आम्हाला आली आणि आम्ही राहात होतो त्या घरांच्या खिडक्यांतून आमच्यावर दगडफेकही झाली. आमच्या शेजारच्या टचुमन प्रदेशात कुळाकनी एक अतिशय दुष्ट व घृणास्पद गुन्हा केला. मालमत्तेचे सामूहिकीकरण चालू असलेल्या त्या काळात त्या गुन्ह्यामुळे एकच खळबळ उडाली. प्योटर डायकॉव नावाचा ट्रॅक्टर-चालक रात्रीच्या वेळी आपल्या खोलीत विश्रांती घेत असता, त्यांनी त्याच्या ट्रॅक्टरवर व खोलीवर घासलेट ओतून, तो ट्रॅक्टर व ती खोली पेटवून दिली. ट्रॅक्टर पेटल्यावर डायकॉव होरपळून मरण पावला असे सर्वांना वाटले. त्याला आम्ही ओळखतही नव्हतो; पण त्याच्या अशा तऱ्हेच्या अपघाती मृत्यूमुळे तो आमचा एक जवळचा मित्र होता असे आम्हाला वाटू लागले. त्यानंतर कुळाकवर्गाचे आम्ही पक्के द्वेष्टे झालो आणि त्यांच्या विरुद्धचा लढा आम्ही जास्तच प्रखरपणे चालवला.




यानंतर थोड्याच दिवसांत ट्रॅक्टर-चालकाविषयी एक गीत लिहिण्यात आले. आम्हाला ते गीत फार आवडले. सभास्थानी सावधान उभे राहून, सामूहिकीकरणाच्या हुतात्म्याच्या स्मृतीला वंदन करणारे ते गीत आम्ही गात असू.

मार्ग असो कितीही खडतर की दूरचा
तो एकच मार्ग आहे तुझा आणि आमचा
वसवून आम्हाला तुझ्या ट्रॅक्टरवर
पेट्रुशा पुढे जायला तू सुरुवात कर.

भावगीतासारखी रचना असलेल्या या गीताचा शेवट मात्र आम्ही जरा जास्त गंभीरपणे करत होतो. गीतातले शेवटचे कडवे आम्हाला उद्देशून होते.

ते गुरगुरतात, भुंकतात आणि चावा घेतात
आमचे पीक चांगले येईल ही भीती त्यांच्या मनात
घेऊन फायदा अंधाराचा, येऊ पाहातात कुलाक जवळ
पण तरुण कम्युनिस्टांनो—करू नका त्यांना जवळ

प्योटर हायकॉव एक दैवी चमत्कार घडावा असा ट्रॅक्टरला लावलेल्या आगीतून वाचला हे मला यानंतर जवळजवळ तीस वर्षांनी समजले! आगीतून वाचल्यानंतर तो सैन्यात भरती झाला व महायुद्धात त्याने सैनिकाचे कर्तव्य बजावले. थोडक्यात तो काव्याचा व कथांचा खराखुरा नायक होता!

सामाजिक पुनर्रचनेचे काम मोठ्या प्रमाणावर चालू असताना १९२९ हे साल त्या पुनर्रचनेच्या संबंधात एक ऐतिहासिक महत्त्वाचे वर्ष ठरले. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे एक प्रमुख अंग म्हणजे उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर स्थापना. ही स्थापना करायला त्या साली सुरुवात झाली व त्याबरोबर शेतीचे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण सुरू झाले.

थोड्याच दिवसांपूर्वी सोव्हियट युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या स्वेर्डलोवस्क स्थानिक समितीने त्या काळातली काही कागदपत्रे माझ्याकडे पाठवली.

त्या कागदपत्रातला, विसर्ट जिल्ह्याच्या पक्षसमितीच्या ५ डिसेंबर १९२९ रोजी भरलेल्या सभेच्या टिपणातला एक उतारा मी पुढे दिला आहे :

'कॉम्रेड ब्रेझनेव : वसंतऋतूत पीकलावणीचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी आखलेल्या योजनेत खूप अडचणी आहेत. शेतकीची आम्हाला हवी असणारी अवजारे आमच्याजवळ नाहीत म्हणून शेतकीच्या यंत्रसामुग्रीच्या पुरवठ्याकडे तातडीने लक्ष द्यायला पाहिजे. अनेक शेतांत आवर्तनपद्धतीने लावणी करण्याचे ठरवल्यामुळे हिवाळी व उन्हाळी पिकाखालील जमिनीचे क्षेत्रफळ कमी होईल. भूविकास-सर्वेक्षण कार्यामुळे चांगली उत्तम जमीन जनतेतील मध्यम व गरीब वर्गाच्या हातात गेली आहे आणि त्यामुळे शेतात लावणी करायलाच पाहिजे– हे आपण लक्षपूर्वक पाहिले पाहिजे. शेतलावणीच्या बाबतीत, कुलाकवर्ग आपल्या प्रयत्नात खीळ घालण्याचा प्रयत्न करील यात शंका नाही. तेव्हा जनतेच्या गरीब व मध्यमवर्गीयांना आपण ज्या काही सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांचा त्यांनी पूर्णपणे लाभ उठवला पाहिजे. गरीब शेतकऱ्यांचे जे गट आपण तयार केले आहेत, त्यांना योग्य प्रमाणात अर्थसहाय्य मिळतंय का नाही ते आपण पाहायला पाहिजे. या कार्याकरिता आपण कोणतीही योजना कार्यवाहीत आणण्याचे ठरवले नाही ही माझ्या दृष्टीने एक मोठी त्रुटी आहे. ग्राम-सोव्हियटनीही योजनाबद्ध रीतीने काम केलेले नाही. सामूहिकीकरणाचे कार्य घडवून आणण्यासाठी खेडोपाडी पाठवलेले लोक त्यांच्यावर सोपवलेले कार्य पुरे करण्याच्या कामी फार सावकाशीने काम करीत आहेत......'

हा त्या काळातल्या कागदपत्रातील खराखुरा व खुल्लमखुल्ला उतारा तत्कालीन अडचणींची माहिती देईल. ग्रामीण भागातील कार्यासाठी, करता येतील तेवढे सर्व प्रकारचे कष्ट आम्ही करणे जरूर होते. मी माझ्याकडून प्रयत्नांची कसूर केली नाही आणि विसर्ट जिल्हा सोव्हियटच्या कार्यकारी मंडळावर झालेली माझी निवडणूक हा माझ्यावरील लोकांच्या विश्वासाचा पुरावा असे मानले. त्यानंतर जिल्ह्याचे भूविकासकार्य माझ्यावर सोपवण्यात आले आणि जिल्ह्याच्या कार्यकारी समितीचा उपाध्यक्ष म्हणून माझी निवड झाली. १९३१ सालाच्या सुरुवातीस उरल्सा प्रदेशाच्या भूविकास-कार्याचा उपप्रमुख म्हणून माझी स्वेर्डलोवस्क येथे नेमणूक झाली. मी माझ्या पत्नीसह स्वेर्डलोवस्कला गेलो; पण त्यानंतर आमच्या गावातील कारखान्याला परतायचे, फिटर म्हणून नोकरी धरायची आणि त्याबरोबर पुढील शिक्षण चालू ठेवायचे असे मी ठरवले.

## तीन : काही महत्त्वाचे निर्णय

हा सारा प्रकार अशा रीतीने घडून आला. कारखाला बंद पडून, गाव सोडल्यानंतरच्या काळात वर्तमानपत्रांतील बातम्या आणि घरून आलेली पत्रे यावरून आमच्या कारखान्यात कोणत्या घटना घडून आल्या त्या मला समजल्या होत्या. आमचे पुनर्वसन करा अशी कामगारांनी मागणी केली. त्या मागणीकडे सरकारने लक्ष पुरवावे यासाठी कामगारांचे एक प्रतिनिधिमंडळ मॉस्कोला गेले. या मंडळाने उच्चस्तरीय अर्थशास्त्रसमितीचे अध्यक्ष फेलिक्स झर्झिन्स्की यांची भेट घेतली. त्यांनी कामगारप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले, त्यांना सर्व प्रकारची मदत देण्याचे कबूल केले व म्हटल्याप्रमाणे सर्व प्रकारची मदत दिली. कम्युनिस्ट पक्षाच्या चौदाव्या संमेलनप्रसंगी १९२५ मध्ये त्यांनी केलेल्या भाषणातला एक लहानसा उतारा मी येथे देत आहे. वर्तमानपत्रात नंतर प्रसिद्ध झालेल्या भाषणात ते म्हणाले– 'रशियाच्या दक्षिण भागात जे प्रचंड कारखाने चालू होते; त्यातील एकामध्ये दोन कोटी पूड (एक पूड=३६ पौंड=अदाज १६.५ किलो) इतके उत्पादन होत होते. (जवळजवळ सव्वातीन लक्ष टन) या कारखान्याचे नाव ड्निपर कारखाना असे होते. हा कारखाना कालच म्हणजे २८ एप्रिलला दुपारी २ वाजता पुन्हा चालू झाला आहे आणि कारखान्यातील एक झोतभट्टी कार्यवाहीत आणली गेली आहे.'

साहजिकच या बातमीने माझ्या मनात खूप खळबळ उडाली. उरल्स प्रांतात ठिकठिकाणी उद्योगधंद्यांच्या जोडीला शेतातून आणि कुरणातून डोलणाऱ्या पिकांचा व गवताचा सुखद वास यायला सुरुवात झाली आहे हे अनुभवत असतानाच माझ्या गावचा कारखाना नव्याने सुरू झाला आहे आणि त्याच्या उत्पादनक्षमतेत वाढ होत आहे हे समजल्यावर मला गप्प बसवेना. जेथे जाईन तेथे मला कारखान्यांच्या धुराड्यांतून धूर बाहेर पडताना दिसत होता म्हणजे ते सर्व कारखाने चालू होते. बिसर्टमध्ये व त्यापासून जवळच निझ्नी-सर्गीव्हस्क, मिखेलोवस्क आणि रेवदा या ठिकाणी जुने डेमीडॉव कारखाने होते. शिवाय स्वेर्डलोवस्क येथेही कारखाना होताच. त्याच सुमारास उरल्स इंजिनियरिंग वर्क्स नावाचा एक प्रचंड कारखाना उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली होती. 'कारखान्यांचा कारखाना' म्हणजे कारखानाधिराज असे उभारण्यात येणाऱ्या त्या कारखान्याचे वर्णन करण्यात येत होते.

मला जे काही समजून आले ते असे– सामूहिकीकरणाचे कार्य अशा स्थितीला येऊन ठेपले होते की, त्या कार्यातून माघार घेता येणे शक्यच झाले नसते. (१९३१ च्या मध्यापर्यंत देशातील खाजगी शेतीच्या निम्म्याइतक्या शेतीचे सामूहिकीकरण झाले होते.) समाजसत्तावाद अंमलात आणायच्या घडपडीत औद्योगिक आघाडीला महत्त्वाचे स्थान होते. उद्योगधंद्याशिवाय, विजेशिवाय आणि शेतीची अवजारे व ट्रॅक्टर तयार करण्याची केंद्रे उभारल्याखेरीज शेतीचा व्यवसाय मजबूत पायावर उभारता येत नव्हता. देशाला धातूंची गरज होती. दक्षिण रशियातले कारखाने देशाला पाहिजे असलेल्या लोखंडापैकी दोनतृतीयांश लोखंड तयार करीत होते आणि त्या सर्व कारखान्यांत ड्निपर कारखाना खूप मोठा होता. त्या कारखान्याचे फेलिक्स झर्झिन्स्की कारखाना असे नामकरण झाले होते. त्या कारखान्यात जायचे मी ठरवले.

अशा रीतीने मी माझ्या गावी परतलो. कामगाराचे कपडे चढवून दिवसपाळीला जायचे आणि रात्री पुढच्या शिक्षणासाठी तेथल्या विद्यालयात जाऊन अभ्यास करायचा हे मला सुरुवातीला तरी कठीण वाटत होते; पण निश्चय व भरपूर मेहनत घेण्याची शारीरिक क्षमता यांच्या जोरावर मी या दोन्ही गोष्टी केल्या.

१९३१ मध्ये कारखान्यात नोकरीवर असतानाच मी कम्युनिस्ट

पक्षाचा सभासद झालो. ही घटना अगदी काल–परवा झाली इतकी ती मला स्पष्ट आठवते. मी पक्षाचा सभासद होण्याची तारीख २४ ऑक्टोबर. त्याआधी मी परिवीक्षाधीन होतो. त्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबरला माझ्या परिवीक्षाधीन कार्डाच्याऐवजी मला पक्षसभासदत्वाचे कार्ड मिळाले. त्या कार्डावरचा माझा क्रमांक १७१३१८७ होता. पक्षसभासदत्वाचे कार्ड मिळाले म्हणून मला काही वेगळे खास हक्क मिळणार नाहीत, उलट माझ्यावर जास्त जबाबदारी टाकण्यात येईल याची मला पूर्ण कल्पना होती. आम्हा कम्युनिस्टांना पक्षाचे सभासद होण्याऐवजी दुसरा काही तरी वेगळा मार्ग स्वीकाराल का असे विचारले तर आमचे उत्तर अगदी ठामपणे नकारार्थी असेल. जनतेची आणि पक्षाची मनापासून सेवा करायची हाच एक मार्ग आमच्यापुढे आहे अशी आमची भावना आहे.

त्यानंतर माझे कामाचे वेळापत्रक फार विचारपूर्वक बसवावे लागले. कारखान्याचे प्रमुख अभियंते आय. पी. बार्डिन यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या निरनिराळ्या विभागांची पुनर्रचना चालू होती. बार्डिन यानंतर अॅकेडमी ऑफ सायन्सेसचे सभासद झाले. सायन्स अॅकेडमीचे सभासदत्व मिळणे हा शास्त्रज्ञाच्या जीवनातला एक अत्युच्च मान समजला जातो. आमच्या कारखान्यात नवीन यंत्रसामुग्री बसवण्यात आली आणि निरनिराळ्या प्रक्रियांचे यांत्रिकीकरण सुरू झाले. काम करायचे म्हटल्यास, भरपूर काम करायला मिळेल अशी स्थिती होती. मी जात होतो त्या शिक्षणसंस्थेतला कार्यक्रमही मोठा चित्तवेधक होता. त्या दिवसांत आम्हा सर्वांना ज्ञानाची भूक लागली होती. किती ज्ञान मिळवू आणि किती नाही अशी मनस्थिती झाली होती. याशिवाय मी माझ्या विभागाचा पक्षसंघटक आणि ट्रेड युनियन कमिटीचा अध्यक्ष होतो. हे काम करता करता मी शेवटी साऱ्या शिक्षणसंस्थेतील पक्षसमितीचा चिटणीस झालो. अशा रीतीने मला वरच्या पायरीवर चढवताना माझ्या सहकाऱ्यांनी माझ्याबद्दल खूप विश्वास दाखवला. सहकाऱ्यांनी माझ्याबद्दल असा विश्वास दाखवावा याचा मला आनंद वाटला. तसे पाहायला गेल्यास मी स्वभावतःच मनमिळाऊ वृत्तीचा आहे. चार माणसांत राहावे, मिसळावे व एखादे कार्य यशस्वी करण्याचा ध्यास घेऊन धडपड करीत राहावे हा माझा स्वभावधर्मच आहे.

विसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात, आमच्या पक्षातील निरनिराळ्या सभासदांना व त्यातल्या त्यात शास्त्रज्ञांना आणि तंत्रज्ञांना प्रशिक्षण व शिक्षण देऊन त्यांच्या ठायी प्रखर ध्येयवादित्व निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे होते. त्यामुळे १९३३ साली माझ्यावर सोपवलेले काम जास्त जबाबदारीपूर्वक केले पाहिजे असे मला वाटले. माझ्या पुढील शिक्षणाचे तिसरे वर्ष चालू असताना, मला ड्नेप्रोझरझिन्स्क वर्कर्स फॅकल्टीचा प्रमुख नेमले आणि त्यानंतर तेथील लोखंड व पोलाद तंत्रविद्यालयाचा संचालक नेमण्यात आले. माझ्या सहकाऱ्यांकरिता जास्तीत जास्त काम करावे अशा बुद्धीने मी अगदी मन लावून काम केले. त्या काळात मी केलेल्या सूचना आणि दिलेले हुकूम, नमूद केलेली कागदपत्रे अजूनपर्यंत कोणास ठाऊक कशी काय राहिली आहेत ? त्या जुन्या कागदपत्रांवरून आता नजर फिरवली तर हसू येते. त्यातील काही सूचना तर भोळसटपणातून दिल्या गेल्या आहेत असे वाटते; पण त्या दिवसांतल्या आमच्या राजकारणाचा तो एक भाग होता. आमच्या प्रत्येक विद्यार्थ्याची बाजू उचलून धरली पाहिजे असे आम्हाला वाटत होते. कारखान्यातल्या कामगारांनी आमच्या विद्यालयात येऊन पुढील शिक्षण घ्यावे असे त्यांच्या मनावर बिंबवण्याचा आम्ही प्रयत्न करीत होतो, आमच्या ट्रेड युनियनद्वारा त्यांना आर्थिक मदत करीत होतो किंवा त्यांच्या खाण्यापिण्याची सोय करून शिक्षण घ्यायला त्यांना मनःस्वास्थ्य कसे मिळेल हे पाहात होतो. एके दिवशी अॅकडेमिशियन एम्. ए. पावलॉव या सुप्रसिद्ध धातुशास्त्रज्ञाने आमच्या गावास भेट दिली. झोतभट्टीत निरनिराळ्या अभिक्रिया कशा घडून येतात याविषयी त्यांनी एक नवीन उपपत्ती मांडली होती. आमच्या विद्यार्थ्यांसाठी वर्कर्स फॅकल्टीमध्ये व्याख्यान देण्याविषयी मी त्यांचे मन वळवले. त्यांचे व्याख्यान आमच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत लक्षपूर्वक ऐकले हे पाहून मला फार आनंद झाला. आमचे त्या वेळचे विद्यार्थी नंतर उद्योगधंद्यात आणि कारखानदारीत शिरले. ते जुन्या काळच्या विशेषज्ञासारखे विशेषज्ञ झाले एवढेच नाही, तर कम्युनिझमच्या ध्येयवादाला वाहून घेतलेले व नवीन नवीन कार्यक्षेत्रे शोधणारे उत्साही कार्यकर्ते झाले.

तांत्रिक विद्यालयातले काम, पक्षासाठी आणि सार्वजनिक स्वरूपाचे काम यात मी गुंतलो होतो तरी रोजचा अभ्यास चुकत नव्हता. अवश्य त्या रेखाकृती काढून त्या परीक्षणासाठी दिल्या आणि मी परीक्षेस बसलो. परीक्षकांनी मला काहीशा दयार्द्र बुद्धीने वागवावे अशी माझी जरासुद्धा अपेक्षा नव्हती. कामगारवर्गात मी मिळवलेल्या स्थानामुळे, आदर्श विद्यार्थ्याचे चित्र मी माझ्या कामगारबंधूंपुढे उभे करावे असे माझ्याकडून अपेक्षित होते. मी जर चांगल्या तऱ्हेने परीक्षेत उत्तीर्ण झालो नाही, तर इतरांनी मन लावून अभ्यास आणि परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण व्हाव्या अशी अपेक्षा मी करणे योग्य ठरले असते का ? माझ्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ मी आणखी एका जुन्या कागदपत्राचा आधार घेणार आहे. स्टेट क्वालिफिकेशन कमिशनच्या २८ जानेवारी १९३५ च्या टिपणातील हा संक्षिप्त उतारा आहे.

'उष्णता व ऊर्जा विभागाचा पाचव्या वर्षाचा विद्यार्थी एल. आय. ब्रेझनेव याने आपल्या पदवीपरीक्षेसाठी लिहिलेल्या प्रबंधाच्या संबंधात केलेले निवेदन आम्ही ऐकले आहे. त्याच्या प्रबंधाचा विषय होता– 'एफ्. इ. झरझिन्स्की कारखान्यातील झोतभट्टीतून बाहेर पडणाऱ्या वायूचे विजेच्या सहाय्याने शुद्धीकरण करण्याची योजना.' त्याचा प्रबंध व त्याने आता केलेले निवेदन ऐकल्यानंतर अध्यक्षांचे मूल्यमापन : प्रबंधाचा तात्त्विक भाग उत्कृष्ट. सुचवलेली योजना : उत्कृष्ट !

झोतभट्ट्यांतून बाहेर जाणाऱ्या वायूचे शुद्धीकरण करण्याच्या प्रश्नाचे योग्य उत्तर शोधण्यासाठी, प्रश्नाचा अत्यंत विचारपूर्वक केलेला अभ्यास आणि परिशिष्टात दिलेली परिगणना यावरून वायूच्या शुद्धीकरणाची योजना मांडणाऱ्या उमेदवाराला उत्कृष्ट अभियांत्रिकी ज्ञान आहे असे दिसून येते.

आम्ही विचारलेल्या सर्व प्रश्नांना कॉम्रेड ब्रेझनेवने तपशिलात जाऊन योग्य व अचूक उत्तरे दिली. आमच्या मते पदवीपरीक्षेसाठी

लिहिलेला हा प्रबंध व त्यात मांडलेली योजना उत्कृष्ट आहेत. कॉम्रेड एल्. आय. ब्रेझनेवला उष्णता-ऊर्जा-अभियंता ही पदवी द्यावी.

कारखान्याच्या ऊर्जाविभागात मी अधीक्षक म्हणून केलेले कार्य अगदी थोडक्या शब्दात मी सांगणार आहे. मी अधीक्षक झाल्यानंतरच्या वर्षात कारखान्याचे उत्पादन वाढवण्यासाठी आम्हाला खूप परिश्रम करावे लागले, कोणत्या प्रकारे कामाची जुळणी केली तर उपलब्ध साहित्यातून जास्तीत जास्त उत्पादन कसे मिळवता येईल हे पाहावे लागले, त्याबद्दल वाद घालावे लागले, काम पुरे करण्यासाठी धडकपाळचा योजाव्या लागल्या, कारखान्यात रात्री हजर राहावे लागले आणि निकडीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले.

*त्या वर्षी माझ्या जीवनक्रमाने एक वेगळीच दिशा घेतली.* मला लाल सैन्यात भरती व्हावे लागले.

मला मिळालेला सैन्यभरतीचा आदेश घेऊन मी मिलिटरी रजिस्ट्रेशन अँड एनलिस्टमेंट ऑफिसमध्ये (लष्कर नोंदणी व भरती कचेरीत) हजर झालो. तेथे मला आमचा थोडयाच दिवसांपूर्वी विद्यार्थी असलेला अर्कडी कुटसेंको भेटला. आम्ही दोघांनीही मिळवलेल्या शैक्षणिक पात्रतेमुळे आम्हा दोघांना चिटा येथील टँक शिक्षण केंद्रात पाठवण्यात आले होते. त्या टँकशिक्षणकेंद्राला त्या काळी ट्रान्सबैकल आर्मड् फोर्सेस अँकेडमी म्हणत असत. सैन्यात भरती झाल्याने मला पुन्हा एकदा कारखान्याचा, माझ्या मित्रांचा आणि माझ्या कुटुंबाचा निरोप घेऊन दूरच्या प्रवासाला निघावे लागले.

'आपण शिपाईगडी व्हायचे ठरवले आहेत का?' कुटसेंकोने विचारले.

'काही सांगता येत नाही.' मी म्हणालो, 'पण मिळालेले शिक्षण केव्हा तरी उपयोगी पडेल.'

## चार : लष्करी प्रशिक्षण

आमचे सैन्यदल घेऊन जाणारी गाडी चाळीस दिवस आणि चाळीस रात्री पूर्वदिशेकडे धावत होती. आम्ही मॉस्कोला जाऊन, मग पुढचा प्रवास करणार होतो तेव्हा लालचौक व क्रेमलिन राजवाडा पाहावा आणि लेनिनच्या स्मृतिमंदिरात जाऊन त्यांना आदरांजली वाहावी असे माझ्या मनात फार होते. *चिटाला जाताना नाही;* पण परत येताना मी या गोष्टी केल्या.

आपल्या आयुष्याचा एक खंड सोडून, दुसऱ्या नव्या आयुष्यक्रमास सुरुवात करताना माणसाला नेहमीच वाईट वाटत असते, तसेच मलाही वाटले; पण त्याहीबरोबर एका नव्या व अज्ञात आयुष्यक्रमाला सुरुवात होतेय याचा *आनंदही वाटत होता. थोडेसे काव्यमय* शब्द वापरायचे म्हटल्यास, आमच्यापुढे सुदूर दृश्ये एकामागून एक उलगडत येणार असे वाटत होते.

बहुधा माझ्या स्वभावाचे एक वैशिष्टय म्हणावे लागेल. जेथे जेथे मी काही काम केले आहे ती ती ठिकाणे मला अजूनपर्यंत आवडतात आणि ती मला माझ्या घरांसारखी वाटतात. खूप दूरवर *पसरलेल्या* गव्हाच्या शेतांतून दिसणारी– समुद्रात छोटीशी बेटे दिसावी तशी दिसणारी– सफेत व हिरव्या रंगांनी नटलेली युक्रेनमधली खेडेगावे मला आवडतात. साधीसुधी वाटणारी पण चित्त वेधून घेणारी बायलोरशियातील निसर्गशोभा आणि मोल्डावियातल्या बागातून बेफाम फुललेला फुलोरा आणि कझाखस्तानातल्या वसंतऋतूत ट्युलीप आणि पॉपी फुलांचा गालिचा पांघरलेल्या असीम स्टेप्स्– या साऱ्या गोष्टी मला मोहवतात व सुखावतात. प्रवासातल्या त्या चाळीस दिवसांत सारा रशिया मी डोळ्यांखाली घातला आणि आपला देश किती विस्तीर्ण आहे याचा अचंबा करीत राहिलो.

चिटापासून जवळच आणि पेस्त्रांकास्टेशनाला लागून असलेल्या लष्करी छावणीत आम्ही चाळीस दिवसांनंतर आलो. काळपट, धुरकट *रंगाच्या लांबच लांब बराकीत आमच्या राहाण्याची व्यवस्था* केली होती. या बराकी पूर्वी केव्हा तरी जपानी लोकांनी बांधल्या होत्या. बराकीभोवतालची जमीन मात्र पिवळट होती आणि त्या पार्श्वभूमीवर काळपट-धुरकट बराकी पटकन दिसून यायच्या. छावणीच्या मध्यभागी कवाईत करण्याचे मैदान होते आणि छावणीभोवती उंचसखल कडे होते. पाण्याची पिंपे भरलेली गाडी कशीबशी ओढत नेणारा उंट बराकीजवळ पाहिल्याचे मला आठवते. बराकींना लागणारे पाणी फार दुरून आणावे लागत होते आणि स्नानगृहात (यात सैनिकांना अग्रक्रम मिळायचा) माणशी दोन भांडी एवढेच पाणी मिळायचे.

छावणीत आल्यावर आम्हाला आमचा गणवेष देण्यात आला आणि आमची निरनिराळ्या तुकड्यांत विभागणी झाली. मला टँक-बटालियनच्या नंबर एकच्या कंपनीत घालण्यात आले आणि माझे सैनिकी शिक्षण सुरू झाले.

'उठा! उठा! बंदुकीची गोळी सुटते तसे पटकन बाहेर आले पाहिजे!' सकाळी ओरडा व्हायचा.

हवेचे तपमान चढलेले असो की हवा थंड असो, पाऊस पडत असो की वारा सुटलेला असो, कमरेपर्यंतचे कपडे काढून धावत धावत आम्हाला सकाळच्या व्यायाम-कवाइतीला हजर राहावे लागे. सकाळचा व्यायाम झाल्यानंतर आम्हाला न्याहारी मिळे आणि त्यानंतर सैनिकी नियमांची माहिती व कवाईत यात किती तरी तास जायचे. आम्हाला सैनिकी शिक्षण देण्याचे काम सार्जंट मेजर फॉलिलियेव हे करीत असत. ते कडक, काटेकोर पद्धतीने आम्हाला धारेवर धरत असत.

'ही काही एखादी विद्यादानसंस्था नाही. इथे तुम्हाला डोके वापरायला शिकायचे आहे. सावधान!' अशी ते आमच्या कवाइतीची सुरुवात करीत.

कवाइतीच्या वेळी शिस्तबद्ध रीतीने वाटचाल करताना, आम्ही ठेक्यात गात असू. त्या वेळी आमचे आवडते गाणे असायचे, '*त्यांना वाटले आमचा पराभव करू... पराभव करू...* आणि ते आम्ही अगदी मोठ्याने ओरडून दणदणीत आवाजात गात असू आणि हात मागे-पुढे जोराने हलवत, शिट्ट्या फुंकत त्याला साथ देत असू. सैनिकाच्या जीवनात मी पटकन रुळलो.

नुकताच काही वर्षांपूर्वी सायबेरियाला व दूर पूर्वेच्या देशांना गेलो *असता मी पेस्त्रांका गावाला भेट दिली. तेथे अजूनही लष्करी*

## ग्रंथाली वाचक–चळवळीची ताजी प्रकाशने


□ **वाघ आणि माणूस** ले. रमेश देसाई

व्याघ्रकुटुंबाची कहाणी सांगता-सांगता माणसाच्या निसर्ग-प्रेमास घातलेली हाक.

**मूल्य ४० रुपये ■ पृष्ठे २३०**

□ **देवांसि जिवे मारिले** ले. लक्ष्मण लोंढे व चिंतामणी देशमुख

भविष्याचा वेध घेणारी ग्रंथालीची पहिलीच विज्ञान-कादंबरी अज्ञानाच्या शोधात चाललेला एक वेगळाच मानवी प्रयत्न.

**मूल्य २४ रुपये ■ पृष्ठे १८७**

□ **मानवाचा पुत्र येशू**

येशू ख्रिस्ताची ' हिंदू ' मनाला पटलेली ओळख ' असे ' ख्रिस्तचरित्र मराठीत नाहीच, इंग्रजीतही शोधावेच लागेल.

–एक अभिप्राय.

**मूल्य १० रुपये ■ पृष्ठे ८२**

□ **उपरा** ले. लक्ष्मण माने

साहित्यअकादमीचे पारितोषिक लाभलेल्या पुस्तकाची तिसरी आवृत्ती. शब्दटीपा आणि लेखकाच्या प्रस्तावनेसह.

**मूल्य २० रुपये ■ पृष्ठे १५७**

याशिवाय, बलुतं, क्लोरोफार्म, सिंहासन आदि गाजलेली पुस्तके.

संपर्क साधा : **ग्रंथाली,** ३४/९०२ नेहरूनगर, कुर्ला, मुंबई–४०० ०२४

ग्रंथाली चळवळीच्या वाचक-सदस्यांचे पत्ते ठीक नसल्यामुळे पत्रे, रुचीचे अंक परत येत असतात. आपण सभासद असाल तर पिनकोडसहित योग्य पत्त्यानिशी लिहा. ' ग्रंथाली 'ची नवी-जुनी पुस्तके सभासदांना जवळजवळ निम्म्या किंमतीत मिळतात. पन्नास पैशाच्या टपालहशिलासह लिहा. व्यक्तिगत ग्राहक वाढविण्याच्या हेतूने सुरू झालेल्या या चळवळीचे वाचक-सभासदत्व संस्थांना उपलब्ध नाही. पुस्तकांची यादी व किंमती यासाठी त्यांनी लिहावे.


प्रशिक्षणकद्र असले तरी तेथली वसाहत मला एकदम बदललेली दिसली. लष्करी शौर्यकृत्यांची माहिती देणारे तेथे एक संग्रहालय आहे. त्या संग्रहालयात असलेल्या फोटोंमध्ये त्या काळच्या टँक-सैनिकाचे शिरस्त्राण डोक्यावर चढवून उभा असलेला माझा फोटो आहे. महायुद्धाचे व त्याशी संबंधित निरनिराळ्या वस्तूंचे फोटो तेथे आहेत. मलायाक्षेमल्या किंवा भूमीचा अल्पसा भाग ज्यांनी प्राण-पणाने लढवला आणि शत्रूला रोखले त्याविषयीची कागदपत्रे मोठ्या आस्थेवाईकपणे गोळा करून येथे ठेवण्यात आली आहेत. नंतर तेथे असलेल्या तरुण सैनिकांनी ते राहात असलेली घरे पाहाण्यासाठी मला आमंत्रण दिले. त्या आमंत्रणाचा स्वीकार करून मी ती घरे पाहिली. आमच्या वेळच्या त्या जुन्या बराकी आणि ही नवीन घरे यात काहीच साम्य नव्हते. आधुनिक पद्धतीने बांधलेल्या या सैनिकी घरांना भरपूर उजेड देणाऱ्या मोठ्या खिडक्या होत्या, उत्तम बिछायती असणाऱ्या खाटा होत्या आणि घरांची जमीन अगदी स्वच्छ होती; पण आमच्या काळी राहाण्याची सोय इतकी चांगली नव्हती आणि ताडपत्रींनी झाकलेल्या खंदकात आम्ही आमचे टँक उभे करत होतो.

लष्करी नोकरी नीट करायची ही एकच गोष्ट आमच्या डोळ्यां-समोर होती. लष्करात नेहमी असते त्यासारखे आमच्या केंद्रात खेळांना खूप महत्त्व होते. वारंवार वेगवेगळे व्यायामप्रकार, व्हॉलीबॉल आणि हिवाळ्यात बर्फावरून घसरत खूप लांबवर जाणे हे आमचे नित्याचे खेळ होते. एकटाच बर्फावरून घसरत साधारण तीस किंवा चाळीस किलोमीटर दूर असलेल्या रेल्वेजंक्शनजवळच्या आमच्या प्रमुख केंद्राच्या ठिकाणी जाऊन, आमच्या कामाचे अहवाल तेथे दिल्याचे मला आठवते.

आम्ही टँकदलातले सैनिक असलो तरी आम्हाला दूरवर पायी मजल मारता आली पाहिजे असे आम्हाला पुन्हा पुन्हा सांगण्यात येत असे. आमचे जाडजूड व लांब कोट गुंडाळून, पाठीवर घेऊन आणि बूट नीट व्यवस्थित चढवून कवाइतीच्या शिस्तीने दूरवर जाण्याचा आम्हाला हुकूम मिळे. त्या वेळी आम्हाला खूपच लांब लांब मजला मारायला लावले. सुरुवातीला आमच्या पायांना फोड आले. पायांभोवती पट्ट्या कशा व्यवस्थित गुंडाळायच्या हे नीट समजत नसे; पण आम्ही या सर्वातून गेलो. वसंतऋतूत एक दिवस मुद्दाम लांबवर मजल मारताना, डोंगरावरून वाहात आलेली व दुथडी वाहाणारी एक नदी आम्हाला दिसली. खूप दूरवर जाऊन, आमच्या छावणीकडे आम्ही परतत होतो, शिस्तीने लयबद्ध चालत होतो, चालताना गाणे म्हणत होतो आणि सारे काही ठीक आहे असे वाटत होते. तेवढ्यात ती दुथडी वाहाणारी नदी आम्हाला आडवी आली. ' का थांबलात ?' आमच्या मुख्याधिकाऱ्याने दरडावून विचारले. आम्ही काहीही बोललो नाही. आम्हाला पाण्यावरून चालता येणार नाही हे त्यांना कळत नव्हते का ? शिवाय गार वारा सुटला होता. वसंतऋतू सुरू झाला की हवेत फरक होऊन ती उबदार झाली हा प्रकार त्या प्रदेशात आम्ही कधी अनुभवला नव्हता. मग मुख्या-धिकाऱ्याने आपल्या अंगावरचा ट्युनिक काढून, त्यात आपले हत्यार गुंडाळले व ती गुंडाळी डोक्यावर धरली. लगेच त्यांनी हुकूम सोडला ' माझ्यापाठोपाठ चला !' नदीचे पाणी बर्फासारखे थंड होते. ती

नदी ओलांडेपर्यंत आम्ही थंडीने कुडकुडत होतो आणि दातावर दात थडथडत होते. नदी ओलांडल्याबरोबर दुसरा हुकूम झाला. 'धावायला सुरुवात ! पुढे चला !' आम्ही त्यातूनही पार पडलो.

*आमच्याकडून करवून घेतलेल्या* मेहनतीमुळे आमची इच्छाशक्ती आणि चारित्र्य यांना आकार आला आणि सोव्हिएट सैनिकाला शोभेल असे चारित्र्य आमच्या ठायी आले. त्यानंतर मन रमावे असा लष्करी शिक्षणाचा भाग आला. सैन्यरचनेच्या हालचाली, आम्हाला मिळायच्या शस्त्रासंबंधीची माहिती आणि टँक चालवायला शिकणे. त्या वेळी आम्ही T–26 आणि BT5 टँक चालवायला शिकलो. आताच्या टँकशी त्यांची तुलना करता, ते फारसे शक्तिशाली टँक नव्हते; पण आम्हाला ते टँक एक भयंकर उपयुक्त युद्धसाहित्य वाटत होते. टँक एका जागी उभे करून किंवा चालत असताना, टँकमधून हलत्या लक्ष्यावर टँकच्या तोफेचा भडिमार करायला आम्ही शिकलो. आमच्या नेमबाजीबद्दल बटालियनकमांडर कॉप्टसॉव यांनी आम्हाला उत्तम प्रशस्तिपत्रक दिले तेव्हा अभिमान वाटावा अशी आम्ही प्रगती केली असे आम्हाला वाटू लागले.

*दयाळू अंतःकरणाच्या पण जरासुद्धा चुकारपणा चालू न देणाऱ्या* त्या कमांडरची आठवण अजूनही आनंददायी वाटते. आम्ही मित्र होतो असे म्हणता येणार नाही. ते माझ्या बटालियनचे प्रमुख अधिकारी होते आणि मी साधा कॅडेट होतो; पण तरीही त्यांचा माझ्याबद्दल अनुकूल ग्रह होता आणि माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना होती. संध्याकाळी आम्ही लष्करी नोकरी आणि युद्धाची संभाव्यता याबद्दल बोलत असू. नंतर यादवी युद्धात खालखिन–गोलच्या लढाईत व्हॅसिली अलेक्सेयेविच कॉप्टसॉव यांनी भाग घेतला. त्या युद्धातल्या कामगिरीबद्दल त्यांना शौर्यकृत्याबद्दलचो सोव्हिएट युनियनचा वीरपुरुष ही पदवी मिळाली. महायुद्ध सुरू होईपर्यंत ते जनरलच्या हुद्द्यापर्यंत पोचले होते. जनरल म्हणून त्यांनी महायुद्धात भाग घेतला आणि मातृभूमीसाठी प्राणार्पण केले. ते मला माहीत झालेले पहिले लष्करी अधिकारी होत. लोकांच्या बोलण्यात असलेल्या प्रथाताप्रमाणे ते बोटांच्या नखाग्रापर्यंत संपूर्ण सैनिक होते ! अबोल, जबर इच्छाशक्तीचे, दिसायला नेहमी तरतरीत व चलाख आणि आनंदी वृत्तीचे असूनही आपल्या कामात दक्ष ही त्यांची वैशिष्टचे सांगता येतील. मला ते शिक्षक होते, तसेच खरोखरीच्या लष्करी प्रमुखाचा आदर्श होते. सोव्हियट सैनिकांना प्रशिक्षण देण्यामध्ये त्यांनी आपले आयुष्य खर्च केले आणि आपल्या मातृभूमीच्या संरक्षणासाठी क्षणार्धात धावून येण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण केली.

मला पुढे दिलेली घटना आठवते. आमचा सैन्यविभाग जेथे राहात असे, त्याजवळ विर्टिका नावाची एक नदी होती. त्या नदीच्या तीरावर रमतगमत फिरायला आम्हाला फार आवडायचे. त्या नदीचे पाणी इतके स्वच्छ होते की, काही ठिकाणी नदीचा तळ अगदी स्पष्ट दिसत असे. एक दिवस कॉप्टसॉव म्हणाले, 'येथे आलेले तुम्ही सारेजण अभियंते आहात. मी विचारतो त्या प्रश्नाचे उत्तर शोधून काढा. 'सपाट जमिनीवरून तुम्ही टँक नेता, मध्ये अडथळा आला तर त्याला टाळून किंवा त्यावर मात करून तुम्ही पुढे जाता, डोंगर चढून वर गेल्यानंतर तो तिरका करून उभा करता; पण नदीच्या तळावरून टँक कसा घेऊन जायचा याचा तुम्ही कोणी विचार केलेला नाही– केलाय का ?'

आम्ही तो प्रश्न सोडवायला घेतला, आकडेमोड करायला सुरुवात केली आणि टँक नदीच्या तळावरून न्यायला काय केले पाहिजे याचा विचार केला आणि सरतेशेवटी त्या प्रश्नाचे उत्तर आम्ही शोधून काढले.

अशा तऱ्हेच्या प्रशिक्षणाला तुम्ही काय म्हणाल ? धारिष्ट्याचे प्रशिक्षण म्हणाल का ? कवाइतीच्या मैदानावर किंवा नेमबाजीचा अभ्यास चालू असताना जे प्रश्न टँकसैनिकांना प्रशिक्षण चालू असताना सोडवावे लागतात, त्याहून किती तरी जास्त अवघड प्रश्न लढाईच्या धुमश्चक्रीत त्यांना सोडवावे लागतात. त्यासाठी त्यांची तयारी करून घेण्यासाठी आमचे बटालियनकमांडर आम्हाला अशा तऱ्हेचे प्रश्न सोडवायला सांगतात, असा आम्ही त्यांच्या प्रश्नांचा अर्थ लावत होतो. नक्की त्यासाठीच कॉप्टसॉव आमची तयारी करून घेत होते. आमच्यापैकी पुष्कळांना त्यांना मिळालेल्या शिक्षणाबद्दल कृतज्ञ राहण्याची वेळ आली. आमच्या बटालियनमधील टँकसैनिकांनी महायुद्धात, उत्तम प्रशिक्षण घेतलेले कमांडर म्हणून नाव कमावले. सुवारोव यांचे शब्द या वेळी आठवतात : 'कठीण व प्रदीर्घ शिक्षण दिले तर युद्ध करणे सोपे जाते.' तरीसुद्धा युद्ध करणे कधीच सोपे नाही अशी माझी धारणा आहे.

पेस्त्रांकाला असताना मला बदली मिळून मी प्लॅटूनकमांडर झालो. ही बढती म्हणजे लष्करी अधिकाऱ्यांची माझ्या कार्यक्षमतेबद्दल खात्री झाली असून, या बढतीने त्यांना माझ्याबद्दल वाटणारा विश्वास त्यांनी अशा तऱ्हेने प्रगट केला आहे व हा माझा एक सन्मान आहे असे मी मानले.

त्यानंतर एका टँककंपनीचा मी राजकीय शिक्षक झालो. माझे दिवस विविध प्रकारचो, वेगवेगळी कामे उरकण्यात भराभर जात होते. लष्करसेवा, माझ्या लष्करी तुकडीसाठी बातमीपत्र तयार करणे, राजकीय घडामोडींवर सैनिकांपुढे वक्तव्य करणे, शैक्षणिक कार्य आणि त्याशिवाय प्लॅटूनमधल्या सैनिकांबरोबर बातचीत व गप्पाटप्पा या साऱ्या गोष्टी मला कराव्या लागत होत्या. माणसे कशीही असली तरी शेवटी माणसेच असतात. त्यांना काळज्या असतात, कसला तरी कोठून तरी उपद्रव होत असतो आणि आनंद वाटावा अशा काही घटनाही त्यांच्या वाट्याला येत असतात. मी कितीही कामात गुंतलो असलो तरी वेळात वेळ काढून घरी पत्र पाठवत असे. एकदा तर माझा फोटोग्राफ मी घरी पाठवला. मी बराकीच्या पायऱ्यांवर उभा असताना कोप्टॉव तेथे आले. आम्हा दोघांना एकत्र पाहून कोणी तरी आमचा स्नॅपशॉट घेतला. तो फार उत्तम स्नॅपशॉट होता असे नंतर दिसून आले. मी तो घरी पाठवायचे ठरवले. केवळ पत्रावर माझ्या कुटुंबियांनी संतुष्ट राहाण्यापेक्षा, त्यांना मी कसा

**युद्ध करणे कधीच सोपे नाही अशी माझी धारणा आहे.**

दिसतोय हे पाहायला मिळाले तर फार बरे होईल असा माझ्या डोक्यात विचार आला.

## पाच : युद्धकाळातल्या आठवणी

या साऱ्या गोष्टींना आता खूप वर्षे झाली आहेत. माझे सारे प्रवास, निरनिराळ्या पदांवर माझी झालेली नियुक्ती, निरनिराळ्या लोकांशी झालेल्या गाठीभेटी आणि माझ्यावर सोपवण्यात आलेली विविध कामे यामुळे माझा किती तरी फायदा झाला हे मला आता समजून आले आहे.

अभियंत्याची पदवी मिळवण्यासाठी मी प्रबंध लिहिला, तेव्हा भविष्यकाळात बेचिराख झालेला झापोरझाय–पोलादकारखाना पुन्हा नव्याने बांधून काढायचे काम करावे लागेल, त्या प्रांतात संरक्षणासाठी उभारलेले उद्योगधंदे चालवायचे काम अंगावर घ्यावे लागेल आणि त्याही पुढे जाऊन साऱ्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने सुरू केलेले उद्योगधंदे मला चालवावे लागतील असे मला कधीसुद्धा वाटले नाही. भूविकास-सर्वेक्षक म्हणून मी जेव्हा काम करत होतो तेव्हा मला व माझ्या सहकाऱ्यांना कधीही न नांगरलेली लाखो एकर ओसाड भूमी शेतीखाली आणण्याचे काम करावे लागेल असेही वाटले नाही. टॅंकदलात लष्करी शिक्षण घेत होतो तेव्हा ते शिक्षण अत्यंत खडतर महायुद्धात किती उपयुक्त ठरेल याची मला जरासुद्धा कल्पना नव्हती. माझ्या हातून झालेली ही सर्व कामे अधिक जनतेशी सतत संपर्क यामधून अनुभव, कौशल्य आणि ज्ञान यांचे असे काही मजेदार होईल हेही मला कधी वाटले नाही. मी केलेले सर्व कार्य पक्षासाठी कार्य एवढया दोनच शब्दांत वर्णन करता येईल. इतक्या वर्षांनंतर प्रौढत्वाला आल्यानंतर मला आता समजून येतंय की इतर हजारो कार्यकर्त्यांसारखे मला बुद्धिपुरस्सर भविष्यकालीन कार्यासाठी तयार करण्यात येत होते. माझी ती तयारी करवून घेण्याचे काम कम्युनिस्ट पक्षाने केला. मला त्या पक्षाने घडवले.

लष्करी सेवेची मुदत संपल्यावर मी गावी परतलो. गावी आल्यावर मला ड्नेप्रोझरझिन्स्कनगर सोव्हियटच्या कार्यकारी समितीचा उपाध्यक्ष निवडण्यात आले त्या वेळी समितीचे अध्यक्ष होते अफनासी इलियच ट्रोफिमॉव ते खूप वर्षे पक्षाचे सभासद होते, रशियाच्या बाल्टिक समुद्रातील आरमारात खलाशी म्हणून त्यांनी काम केले होते, ऑक्टोबरक्रांतीत भाग घेतला होता आणि त्यानंतर आमच्या कारखान्यात साधे कामकरी म्हणून भरती झाले होते. त्यांचे शिक्षण फारसे झाले नसल्याने, कार्यकारी समितीवर आलेल्या नव्या सभासदाला म्हणजे मला अभियंत्याचे शिक्षण मिळाले हे समजल्यावर त्यांना फार बरे वाटले. नागरी घरबांधणी आणि जनतेला उपयोगी पडावी या दृष्टीने सुखसोयींची निर्मिती यावर कार्यकारी समितीच्या वतीने देखरेख ठेवायचे काम मी करावे असे त्यांनी मला लगेच सांगितले.

सोव्हियटच्या कामाची गुंतागुंत व जटिलता लक्षात घेऊन मला सोव्हियटचे कार्य चालू ठेवण्यासाठी खूप झटावे लागले. सोव्हियट कार्याचे विविध पैलू ध्यानात ठेवून आणि लोकांच्या अडचणींचे निवारण करण्याकडे त्या कार्याचा कल आहे हे लक्षात घेऊन मला सोव्हियट कार्यपद्धतीचा खोलवर विचार करावा लागला. माझ्याकडे सोपवलेले काम मला नवीन नव्हते. तशा तऱ्हेचे काम मी विसर्ट जिल्ह्यात केले होते; पण तरीही हे काम करताना मला खूप नवीन गोष्टी शिकता आल्या. १९६० मध्ये मला यु. एस. एस. आर. च्या वरिष्ठ सोव्हियटच्या प्रेसिडियमचा अध्यक्ष म्हणून निवडले. त्या वेळी मला नगर सोव्हियटमध्ये मिळालेला अनुभव फार उपयोगी पडला आणि अजूनही उपयोगी पडत आहे. शिवाय सोव्हियट रशियाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचा आणि त्या पक्षाचा मला जनरल सेक्रेटरी निवडून, जनतेने माझी अत्यंत माननीय पण तितक्याच जबाबदारीच्या अधिकारपदावर नेमणूक केली आहे. त्यामुळे मला सतत कार्यमग्न राहावे लागते.

माझे स्वतः वैयक्तिक अनुभव लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींचे अधिकार वाढवण्यासाठी, स्थानिक सोव्हियटचे कार्यक्षेत्र वाढवण्यासाठी, त्यांच्या अधिकारमर्यादा वाढवण्यासाठी आणि रशियाच्या सर्व विभागांतील शासनसंस्थांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी मी अगदी सुरुवातीपासून योग्य प्रकारचे कायदेकानू सुचवून, त्यांना मान्यता मिळवण्याकडे लक्ष पुरवले.

कामेनस्कोये गावाचा माझ्या डोळ्यांदेखत कायापालट होऊन त्याचे ड्नेप्रोझरझिन्स्कनगरात रूपांतर झाले. त्या गावास कराव्या लागणाऱ्या कार्याची मला अजूनही आठवण आहे आणि त्या आठवणींनी माझे मन भरून येते. तो काळ आमच्या देशाच्या जीवनात अत्यंत मनोवेधक व धकाधकीचा होता. आपल्या तीन सहकारी संशोधकांना बरोबर घेऊन, पपानिन उत्तरध्रुवाला जाऊन पोचला. त्या विजयी मोहिमेचे आम्ही तोंड भरून कौतुक करीत होतो. चकलॉव या वैमानिकाने उत्तरध्रुवप्रदेशात उड्डाणे केली. ती उड्डाणे कशी काय यशस्वी होतात याकडे आम्ही डोळे लावून बसलो होतो. मॅग्नेटोगॉर्स्क लोखंड व पोलादकारखाना, कुझनेट्स्क उद्योगसमूह आणि देशात इतरत्र चालू असलेले रचनात्मक कार्य यांची उत्तरोत्तर होणारी प्रगती पाहून आम्ही आनंदून जात होतो.

त्याच काळात ड्निपर कारखान्याची वाढ होत गेली. मी तेथे असतानाच त्यांनी आठवी झोतभट्टी सुरू केली होती. तिसरी उघडया तोंडाची भट्टी सुरू केली होती आणि सिंटरिंग प्रक्रिया घडविणारे यंत्र सुरू केले होते. पोलाद–फाउंड्रीतील कामगार याकोव चेकॉवस्की याने केलेल्या स्टॅखानोव्हाइट उच्चांकास साऱ्या राष्ट्राने मान्यता दिली होती. अवजड कारखानदारीचे खाते संभाळणारे पीपल्स कॉमिसार सर्गो ओर्जोनिकिड्झे यांनी चेकॉवस्कीच्या अनुभवाचा फायदा साऱ्या फौड्रींनी घ्यावा असे आवाहन केले होते.

लोखंड व पोलाद-कारखान्याच्या वाढीबरोबर शहराची वाढ झाली किंवा त्या शहरात जे नवीन कारखाने उघडले गेले, त्यामुळे शहराची वाढ झाली असे म्हणता येईल. शहराची वाढ झाल्याने ट्रिट्झनोये आणि रोमांकोवो या गावाचा समावेश वाढलेल्या शहरात करावा लागला. त्यामुळे किती तरी प्रश्न आमच्यापुढे उभे राहिले. शहरात पुरेशा शाळा नव्हत्या, पॉलिक्लिनिक नव्हती, किंडरगार्टन

शाळा नव्हत्या आणि पुरेशी घरेही नव्हती. पाणीपुरवठा, साफसफाईची व्यवस्था आणि वाहतूकव्यवस्था यांच्यात सुधारणा करणे जरूर होते. या सर्व गोष्टींचा मला कार्यकारी समितीत विचार करावा लागला. आपापल्या कारखान्याभोवती लहान लहान उपनगरे बांधायची असे म्हणणाऱ्या कारखान्यांच्या संचालकांबरोबर आम्हाला वादविवाद करून त्यांना आमचे म्हणणे पटवून द्यावे लागले. संकुचित मनोवृत्तीबरोबर झगडा देऊन आमची शक्ती आणि उपलब्ध अर्थनिधी यांचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल हे पाहावे लागले. आमच्या अंगीकृत कार्यात आम्हाला थोडेसेच यश प्राप्त झाल्यावरसुद्धा आमच्या किती तरी गरजा भागवता आल्या याची मला चांगली स्पष्ट आठवण आहे.

भारी कारखानदारीकडे लक्ष पुरवणाऱ्या पीपल्स कॉमिसारिॲटकडून पैसे मिळवण्याचे कार्य केल्यावर आम्हाला बागळी व लेनिनचौक यांना जोडणारी ट्रामलाइन टाकता आली आणि ज्या दिवशी शहराच्या या टोकापासून, त्यापलीकडच्या टोकापर्यंत लाल रंगाच्या ट्राम धावू लागल्या त्या दिवसाला उत्सवाचे स्वरूप आले. सध्या ज्या इमारतीला यंग पायोनियर्सपॅलेस म्हणतात, ती भव्य इमारत आम्ही बासष्ट दिवसांत बांधून काढली. यंग कम्युनिस्ट लीगच्या सभासदांनी स्टेडियम बांधून काढला आणि शहरात चार–चार मजली इमारती दिसू लागल्या. या नव्या इमारतींना बाल्कनी होत्या व हवा खुलेपणाने खेळण्यासाठी मोठमोठ्या खिडक्या होत्या. सध्या ज्या प्रमाणावर घरबांधणी चालू आहे त्या मानाने त्या वेळची बांधणी थोडकीशीच असली तरी शेकडो कुटुंबांना आपल्या नव्या घरात राहायला मिळाले. रस्ते चांगले डामरी केले, बागा लावल्या, दुकानातून विक्रीसाठी भरपूर माल ठेवलेला दिसू लागला, लोकांना चांगले कपडे वापरायला मिळाले व जीवनमान सुधारले. या साऱ्या गोष्टींमुळे ड्नेप्रोझर्झिन्स्कमधील माझे काम माझ्या चांगले आठवणीत राहिले आहे.

ड्नेप्रोझर्झिन्स्कनगर सोव्हियटमध्ये मी एक वर्षाहून अधिक काळ काम केले. त्यानंतर पक्षाचे कार्य माझ्याकडे सोपवण्यात आले. युक्रेनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या ड्नेप्रोपेट्रोवस्क रिजनल कमिटीचा मला प्रचार–चिटणीस बनवण्यात आले. त्याआधी त्या समितीच्या एका विभागाचे कार्य माझ्याकडे सोपवण्यात आले होते. रिजनल कमिटीचे विविध प्रकारचे व गुंतागुंतीचे काम मी माझ्या Rebirth किंवा पुनर्जन्म या पुस्तकात तपशिलात जाऊन वर्णन केले आहे. सेम्यॉन बोरीसोविच झाडिओंचेंको हे आमचे प्रथम चिटणीस होते. ते अनुभवी, समंजस आणि निर्णयाला पक्के होते. त्यामुळे त्यांच्यापासून खूपच शिकण्यासारखे होते. आमच्या दोघांची चांगली मैत्री जमली व कामकाज सुरळीतपणे होऊ लागले. यानंतर पक्षकार्याचा एक महत्त्वाचा विभाग माझ्याकडे सोपवण्यात आला. पक्षाची विचारप्रणाली हे माझे कार्यक्षेत्र झाले. माझ्याकडे सोपवण्यात आलेली कामे झपाट्याने वाढली. प्रत्येक गोष्ट मोठ्या प्रमाणावर करणे भाग पडले आणि मला या शहरातून त्या शहरात आणि या गावातून त्या गावात सारखे जावे–यावे लागले व शेकडो लोकांच्या भेटीगाठी घ्याव्या लागल्या.

विचारप्रणालीविषयक कार्य नेहमीच महत्त्वाचे आहे असे कम्युनिस्ट पक्ष मानत आला आहे व अजूनही तसे तो मानतो. पक्षकार्याचे मुख्यतः तीन भाग पडतात – विचारप्रणाली, राजकारण आणि संघटनकार्य. पक्षकार्य विविध प्रकारचे आहे व ते करण्यासाठी समाजात घडून येणाऱ्या प्रक्रियांचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण करावे लागते आणि समाजात घडून येणाऱ्या प्रक्रियांमुळे उद्भवलेल्या अडचणींचे निराकरण करावे लागते. राज्यपातळीवर व सामाजिक स्वरूपाचे कार्य करीत असता, एखाद्या विविक्त विभागात चुकूनसुद्धा विचारप्रणालीविषयक कार्याकडे दुर्लक्ष करणे किंवा विचारप्रणालीतील चुका चालवून घेणे धोकादायक ठरते. सुरुवातीला विचारप्रणालीतील चुका तंत्रविषयक चुकांइतक्या चटकन लक्षात येत नाहीत. एखाद्या यंत्राची किंवा यंत्राच्या भागाची रचना सदोष असल्यास, ते यंत्र अपेक्षित क्षमतेने काम करणार नाही किंवा कदाचित ते मुळीसुद्धा काम देणार नाही, ही गोष्ट तुमच्या चटकन लक्षात येते आणि झालेल्या चुकीमुळे किती नुकसान झाले व होत आहे याचे गणित चटकन मांडता येते; पण विचारप्रणालीतील चूक कानाला गोड लागणाऱ्या शब्दजंजाळात दडून जाते व लक्षात येत नाही. विचारप्रणालीतील चूक वेळीच न सुधारल्यास, तिचा परिणाम उशीरा पण सरतेशेवटी दिसून येतोच आणि त्यामुळे खूप नुकसान झालेले असते व होत असते. आधुनिक जगात कोठेही निवांत नाही. सर्व काही ठाकठीक आहे असे आपण आपले समाधान करून घेत असतो, त्या वेळी विचारप्रणालीचे शत्रू तिच्या नाशासाठी प्रयत्नशील असतात. म्हणून लेनिननी आम्हाला शिकवले आहे त्याप्रमाणे 'समाजवादी विचारप्रणालीला क्षुद्र समजणे व तिच्यापासून थोडेसेही दूर जाणे म्हणजे सरंजामशाही विचारप्रणालीला पुष्टी देण्यासारखे आहे.'

ज्या काळासंबंधाने मी माझ्या आठवणी सांगत आहे, त्या काळात ही गोष्ट मला फार प्रखरतेने जाणवली. पश्चिमेकडे दुसरे महायुद्ध सुरू झाले होते व ते क्रमाक्रमाने आमच्या सीमेकडे सरकत होते. आमच्या व फॅसिस्ट विचारप्रणालीतील झगडा अगदी कडेच्या टोकाला जाऊन, त्याचे पर्यवसान युद्धात झाले होते. त्यामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत पक्षाची जनतेबरोबरची बांधिलकी जास्त दृढ करण्याची आणि पक्षसभासदांना मूलभूत विचारप्रणाली आणि राजकीय शिक्षण यांचे जास्त काळजीपूर्वक शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली होती. जास्त कार्यक्षम व आक्रमक प्रचारकार्य हाती घेऊन, विरुद्ध विचारप्रणालीला वेळीच उत्तर देण्याची, सोव्हियट जनतेत असलेली राजकीय जागृकता वाढवण्याची आणि समाजवादी देशभक्ती व श्रमजीवीवर्गाचे आंतरराष्ट्रीयत्व यांच्या बाबतीत शिक्षण देण्याची आणि समाजवादाच्या आदर्शाबद्दल निष्ठा वाढवण्याची जरूर होती.

**पक्षाची विचारप्रणाली हे माझे कार्यक्षेत्र झाले, कामे झपाट्याने वाढली !**

प्रत्येक समाजवादी पुढाऱ्याला वरील गोष्टी करण्याबद्दल आवड पाहिजे व त्या अनुभवातून त्याने जायला पाहिजे. आपल्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीने सद्य:परिस्थितीमध्ये आपल्यापुढे काय ध्येय ठेवले आहे व कोणते हेतु साध्य करण्यासाठी ती धडपडत आहे हे पक्षातल्या नेत्यांनी जनतेला नेहमी समजावून सांगितले पाहिजे. हे काम तसे बघायला सोपे वाटते; पण ते केले पाहिजे. हे कार्य करायचे म्हणजे वेगवेगळ्या श्रोतृवर्गापुढे बोलायला पाहिजे आणि निरनिराळ्या लोकांना भेटले पाहिजे. हे कार्य करण्याची जरुरी ड्नेप्रोपेट्रोवस्क प्रदेशात असताना मला प्रथमत: पटली. या मुद्द्यावर मला काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. या विषयावरची मते फार पूर्वीच माझ्या मनात मूळ धरू लागली.

पक्षाचे भावनेक आवाहन हे पक्षाचे एक प्रभावी हत्यार राहिले आहे. म्हणून या भावनेक आवाहनाचा जरा जास्त गंभीरपणे विचार केला पाहिजे.

सोव्हिएट जनतेने पक्षाच्या धोरणांना मान्यता दिली आहे आणि ती नेहमीच पक्षाच्या पाठीशी आहे. तरीसुद्धा आम्ही विचारप्रणाली-विषयक कार्याकडे खूप लक्ष पुरवले आहे. या कार्यात सत्य हेच प्रमुख साधन ठरते. अंगीकृत कार्यात मिळालेले यश व अपयश अगदी प्रामाणिकपणे व प्रांजलपणे लोकांपुढे मांडले पाहिजे. मनमोकळेपणाने, काहीही आडपडदा न ठेवलेले लोक समजू शकतात. समाजवादाचे सामर्थ्य जनतेच्या सावधानतेत आहे असे लेनिन नेहमी म्हणत असत.

काहीही ध्येय समोर न ठेवता केलेले प्रचारकार्य फुकट जाते. ज्यांच्यामध्ये प्रचार करायचा, त्यांचे हित जर त्या प्रचारकार्याने होत नसेल, परिस्थितीची गरज भागत नसेल, तर अशा प्रचारकार्याचा काहीही उपयोग नाही. विचारलेल्या अवघड प्रश्नांची उत्तरे द्यायला वक्ता कचरू लागला, काचकूच करू लागला, टाळाटाळ करू लागला, तर त्याच्या वक्तव्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. वक्ता व्यासपीठावरून घुटमळत-चाचरत काही तरी बोलला, तर त्याच्याबद्दल अविश्वास निर्माण होतो. शिवाय अशा वक्त्यामुळे चाललेल्या वक्तव्याकडे लक्ष न देण्याची श्रोतृवर्गाला सवय होते. या क्षेत्रात उपचारवादाला स्थान नाही. वक्त्याचा दृष्टिकोन सर्जनशील असायला पाहिजे. सरंजामशाही वृत्तीचे राजकारणी चटपटित व्याख्यानबाजी करण्यात हुषार असतात; पण व्याख्यात्याच्या चटपटितपणावर किंवा भावनांचा मोठा आविष्कार करण्यावर किंवा वक्त्याच्या चढ्या आवाजावर अंगिकारलेल्या कार्याचे यश अवलंबून नसते हे मला ठासून सांगावेसे वाटते. बहुतेकांना माहीत आहे की, लेनिनचा आवाज फारसा मोठा नव्हता; पण ते काय बोलत ते प्रत्येकजण ऐकत असे. श्रोतृवर्गातला प्रत्येकजणच नाही, तर साऱ्या देशात आणि देशोदेशी त्यांचा आवाज जायचा. ते काय बोलतात याकडे त्यांचे लक्ष असायचे म्हणून त्यांना त्यांचे बोलणे ऐकू जायचे. जनतेला आपुलकी वाटावी अशा नवीन कल्पना व विचार त्यांच्या भाषणात असायचे व आपल्या कल्पना उचलून धरण्यासाठी त्यांच्याजवळ खोडून काढता येणार नाही अशा तऱ्हेचा युक्तिवाद असायचा, म्हणून लोक त्यांची भाषणे ऐकायचे. शिवाय ते तर्कशुद्ध बोलत. वैज्ञानिक दृष्टिकोनाला पटतील असे निष्कर्ष काढत आणि काय करायचे आहे ते स्पष्ट व वैशिष्ट्यपूर्ण रीतीने मांडत म्हणून लोक त्यांची भाषणे ऐकायला तयार होत.

ड्नेप्रोपेट्रोवस्कमधील महायुद्धपूर्व वर्षांचा विचार करता, ती वर्षे निरनिराळ्या योजना अंमलात आणण्यात खर्च झाली असे वाटते. वरवर पाहाता सारे काही व्यवस्थित होते व देशात समाधानाचे व शांततेचे वातावरण होते. सिनेमागृहांतून व्होल्गा, माझी व्होल्गा आणि उज्ज्वल पथ यांसारख्या हास्यरसप्रधान फिल्म दाखवण्यात येत होत्या. गावातील आणि शहरातील जीवन नेहमीप्रमाणे संथ चालू होते, शेतामधून पिके कापणीसाठी तयार होत होती; पण आम्हा सर्वांना युद्ध सुरू होण्याची भीती वाटत होती. १९४० मध्ये ड्नेप्रोपेट्रोवस्क प्रादेशिक समितीकडे कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीकडून एक महत्त्वाचे कार्य सोपवण्यात आले. त्या प्रदेशातल्या काही कारखान्यांनी युद्धोपयोगी साहित्य निर्माण करावे असा आदेश होता. संरक्षक उद्योगधंद्यांकडे लक्ष देण्यासाठी प्रादेशिक समितीने एक वेगळा चिटणीस नेमावा असे मॉस्कोहून आलेल्या गुप्त संदेशात म्हटले होते. या संदेशाचा विचार करण्यासाठी झाडिओचेंको यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक समितीची एक बैठक घेण्यात आली. समितीकडे सोपवण्यात आलेल्या कार्याचे विशेष महत्त्व व मध्यवर्ती समितीचा राजकीय कक्ष हे कार्य किती महत्त्वाचे समजतो हे ध्यानात घेऊन या चिटणिसाच्या जागेकरता तंत्रज्ञान व धातुकाम यात निष्णात असलेला माणूस निवडला पाहिजे व शिवाय तो माणूस उत्तम प्रकारचा संघटक आणि लोकांशी मिळून–मिसळून काम करणारा पाहिजे असे झाडिओचेंकोचे म्हणणे पडले. जवळजवळ याच शब्दांत त्यांनी आपले म्हणणे मांडले आणि त्या जागेवर मला नियुक्त करावे असे त्यांनी सुचविले त्यांची सूचना मान्य होऊन, सर्वानुमताने माझी त्या जागेवर नेमणूक झाली.

युद्धाचे संभाव्य संकट आम्ही विचारात घेतले होते का आणि त्या संकटाला तोंड देण्यासाठी आम्ही तयारी करत होतो का? आम्ही या दोन्ही गोष्टी केल्या यात शंका नाही. युद्ध सुरू होण्याची भीती आमच्या सर्वांच्या मनात होती व दुसरीकडे युद्धाची संभाव्यता सारखी वाढत होती. फॅसिझम् हा आमचा मुख्य शत्रू होता.

देशाला धातूंची आत्यंतिक गरज होती. १९४० च्या जून महिन्यात सोव्हिएट रशियाच्या पीपल्स कॉमिसारच्या कौन्सिलने आणि पक्षाच्या मध्यवर्ती समितीने धातुविषयक कार्यासंबंधी निर्णय घेतला. 'लोखंड, पोलाद व इतर धातूंचे उत्पादन करण्यासाठी तयार केलेल्या योजना तडीस नेण्यासाठी करावयाची कार्यवाही,' असे त्या निर्णयाचे लांबलचक शीर्षक होते. कारखान्यांच्या लोखंड व पोलाद यांची निर्मिती करण्याच्या क्षमतेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल हे ठरवण्यासाठी देशभर एक स्पर्धा आयोजण्यात आली. त्या स्पर्धेत माझ्या गावाने स्पृहणीय यश संपादन केले. शांततेच्या काळात रोजच्या वापरात असलेल्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांनी आता युद्धोपयोगी सामानाचे उत्पादन करायला सुरुवात केली. आटर्चोम कारखान्याने विमानांचे निरनिराळे भाग निर्माण करायला सुरुवात केली. कॉमिन्टर्न कारखान्याने उखळी तोफा तयार करायला सुरुवात केली तर ड्निपर कारखान्यात तोफ-

गोळे तयार होऊ लागले.

रिजनल कमिटीच्या (स्थानिक समितीच्या) कचेरीत ठिकठिकाणी चालू असलेल्या कामांचे अहवाल येत होते आणि त्यातले काही अहवाल वाचल्यावर मला आनंद झाल्याशिवाय राहिला नाही. शेकडो कारखाने चालू ठेवण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली होती तरी माझ्या घरच्या कारखान्यातून आलेल्या बातमीपत्रांनी मला विशेष आनंद झाला हे नाकारण्यात अर्थ नाही. 'सोव्हिएट युनियनमधील सर्वांत उत्तम धातुकाम-कारखाना' असे प्रशस्तिपत्र १९४१ मध्ये ड्निपर कारखान्याला मिळाले आणि त्याबरोबर धातुकाम-परिषदेच्या मध्यवर्ती समितीने व लोहविषयीच्या धातुकामाची जबाबदारी उचलणाऱ्या सेनारसद–विभागाने त्यास 'रेड चॅलेंज बॅनर' चा बहुमान बहाल केला.

आपल्या लहानपणच्या, घरच्या, रस्त्याच्या, गावाच्या किंवा शहराच्या आठवणीतून आपल्या मातृभूमीविषयक प्रेमाला सुरुवात होते. याबरोबर आपल्या मनामध्ये याहूनही तीव्रतर भावना आपल्या सर्व मातृभूमीबद्दल असते. त्यामुळे मातृभूमीवर संकट कोसळले व ती अवघड परिस्थितीत सापडली आहे हे पाहिल्यावर ती मातृभूमी आपल्याला अगदी जवळची वाटू लागते.

माझ्या देशाचा खूप मोठा विस्तार माझ्या डोळ्यांनी पाहण्याचे, माझ्या जोडीच्या किती तरी नागरिकांशी ओळख करण्याचे भाग्य मला लाभले. ज्या देशात राहाण्याचे भाग्य आम्हाला लाभले, ज्या भूमीचा वारसा आम्हाला आमच्या वाडवडिलांपासून मिळाला आणि जी भूमी जास्त समृद्ध करून आमच्या मुलाबाळांच्या हाती आम्ही सोपवणार आहोत त्या भूमीला शोभणाऱ्या आमच्या जनतेच्या योजना, स्वप्ने आणि विचार आहेत हे मला माहीत आहे.

आमच्या पंचवार्षिक योजना सफल करून आम्ही जे उज्ज्वल यश संपादन केले त्याने माझे हे वरील विधान सिद्ध केले आहे.

पण युद्ध सुरू झाल्यानंतर आमच्या जनतेच्या जीवनात अत्यंत दुःखमय व कटु वाटणारा काळ आला आणि त्याच काळात आमच्या श्रद्धेतून आम्हाला स्फूर्ती मिळाली व आम्ही शौर्यकृत्ये करून दाखवली. आमच्या देशभक्तीची परीक्षा घेणारे महान युद्ध सुरू झाले. समाजवादाच्या मार्गाने आम्ही जे काही संपादन केले, जे काही रचनात्मक कार्य केले त्या सर्वांचे संरक्षण करण्याची आणि आपल्या प्रिय मातृभूमीसाठी निर्भयतेने लढा देण्याची वेळ आली आणि लाखो सोव्हियट अधिकाऱ्यांच्या, सैनिकांच्या आणि जनतेच्या जोडीने मी युद्धाचा खडतर मार्ग युद्ध सुरू झाल्याच्या पहिल्या दिवसापासून तो थेट विजयाची उज्ज्वल प्रभात उगवेपर्यंत चालून गेलो !


पण ती एक वेगळीच कथा आहे !

**समाप्त**

---


शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या म्हणजे बंगाली साहित्य संस्कृतीतलं एक अढळपद. बंकिमचंद्रांकडून त्यांनी कथानकप्रधान कादंबरीचा वारसा घेतला पण त्यांच्या हाती आल्यावर कादंबरी ही मूलतः माणसांची, त्यांच्या अंतरंगाची त्यांच्या मूल्यांची कथा झाली.

पात्रांच्या मनोवस्था विविध प्रकारे सूचित करणे, त्या सूचनेद्वारे मागचे-पुढचे प्रसंग एकमेकांशी जोडणे, आणि जाता-जाता सहज त्या व्यक्तींच्या जीवनमूल्यांवर काही भाष्य सूचीत करणे, ही शरच्चंद्रांची खास वैशिष्ट्यं घेऊन येणारी त्यांची कादंबरी वाचकाला ओढून घेते, बांधून ठेवते.



चरित्रहीन, विप्रदास, श्रीकांत, गृहदाह, शेषप्रश्न यासारख्या शरच्चंद्रांच्या काही वैशिष्ट्यपूर्ण निवडक कादंबऱ्या आणि त्यांची कला व मूल्यं यावर प्रकाश टाकणारी लेखमाला–

**'माणूस' पुढील अंकापासून...**

# शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या

**लेखक–प्रा. बा. वि. पोतदार**

**पुढील अंकात लेखांक एक : शरच्चंद्रांची कला व मूल्ये**


---

# चळवळीकडून स्थिरतेकडे

## पहिले अ. भा. दलित नाट्यसंमेलन, पुणे

इथल्या पर्वतांवर, टेकड्यांवर मी प्रेम केले. इथल्या नाल्यांना, नद्यांना, गंगेला मी पवित्र मानले. झाडांचे, पाखरांचे, फुलपाखरांचे रंग डोळ्यांत साठविले. . . .
तरीही . . ही मातीं माझ्याशी बेईमान का झाली ? या गंगेने दगा का दिला ?
. . . हे सर्व माझेच आहे. तरीं हे माझे का नाही, कोण येतो आमच्या प्रेमाच्या आड ? नक्कीच तो दलाल आहे !

¤

संजय संगवई

हे संमेलन काही वेगळेच होते. आतापर्यंतची इतर सर्व संमेलने एक प्रकारच्या जबरदस्तीने 'पार पाडल्यासारखी' होती. पुण्याचे पहिले अ. भा. दलित नाट्यसंमेलन याला अपवाद होते. दिल्ली–रतलामबरोबरच तळेगाव ढमढेऱ्याहून माणसं आली होती. सर्वचजण तरुणाईच्या आतबाहेरील. अध्यक्ष भि. शि. ऊर्फ आबा शिंदे हेच काय ते बुजुर्ग !

कोणताही भपका नाही, नियोजित कार्यक्रम बिनबोभाटपणे पार पडले आहेत, गावोगावीचे ग्रुप्स मिसळत आहेत, नाटकांना दाद दिली जात आहे अशी दृश्ये दिसत होती. त्यात पुण्यातलेच पत्रकार तत्सम 'उच्च' मंडळी अलग पडल्यासारखी होती. जातीनुसार गट होतात हे दिसतच होते.

आबा शिंदे तर अध्यक्ष नाहीतच असे वाटण्याइतपत मिसळत. कोणाशीही बोलायला तयार, कुठेही येणार ! कारण संमेलनाचे प्रयोजनच वेगळे आहे ! उत्सवमूर्ती नव्हे तर चळवळीतील मी कार्यकर्ता आहे अशा भावनेने सर्वजण वागत होते.

प्रत्येक मेळाव्याला किंवा संमेलनाला असतो तसा निरर्थक कार्यक्रम, धुसफुस, कार्यक्रमातील बदल वगैरे भाग इथेही होताच. स्वागतसमितीने २०० प्रतिनिधींची अपेक्षा केली होती. प्रत्यक्षात ४३५ जण आले ! पण व्यवस्थेत फारशी कसर नव्हती. आलेली माणसंसुद्धा एका जाणिवेने आली होती. स्थानिक वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींखेरीज इतर वृत्तपत्रांचे प्रतिनिधी नियमित येत नसत. त्यामुळे पत्रकारांनाही आपल्याला स्पेशल ट्रीटमेंट दिली नाही म्हणून कुरकुर करण्यास वाव नव्हता !

हे संमेलन वेगळे असावेच का ? वेगळी चूल हवीच का ? याचा पुढे विकास कसा होत जाणार ? हे प्रश्न या संमेलनातील चर्चांमधून सुटले नाहीत. तशी कुणाचीच अपेक्षा नव्हती. हे काही तरी 'आपलं', 'वेगळं' घडतंय, याचंच जास्त अप्रूप होतं. पहिल्यांदा प्रतिनिधींखेरीज इतर दलित प्रेक्षकवर्ग कमी होता. मात्र नंतर ही संख्या वाढली. लहान पोरं, बाया–बापड्या आवर्जून नाटकं पाहत.

प्रत्येक संमेलनात असतो त्याप्रमाणे ५० टक्के भाग इतर पसाराच, तो इथेही होता. काही बाबतीत मात्र या संमेलनात चांगली चर्चा, घडामोड झाली.

उद्घाटनाच्या वेळी जळगाव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष शंकरराव खरातही हजर होते. तेन व ाट्यसंमेलनाध्यक्ष शिंदे हे एकाच झोपडपट्टीतले होते. या वेळी सर्वांत प्रभावी ठरले ते मात्र शंकरराव खरातांचे ऐनवेळचे भाषण. शंकरराव फारच मोकळेपणाने बोलले. या देशातील कला ही मूलतः आजच्या दलितांचीच आहे. नंतर आलेल्यांनी ती उचलली या टेक्सास गायकवाड यांच्या सूत्राला धरून त्यांचा रोख होता. मात्र शंकररावांनी वादग्रस्त व माहीत नसलेल्या इतिहासात अनधिकाराने जाण्याचा मोह आवरला. त्यांनी आधुनिक युगाचेच संदर्भ देऊन आजचे मध्यमवर्गीय नाट्यसंगीत हे पारंपारिक (म्हणजे दलित) कलेचा वारसा घेऊन आले हे सांगितले.

मात्र या मूळ कलाकारांना, मूळ कलेला 'रिकग्निशन' नाही. या देशाची परंपराच अशी आहे की, मूळच्या मालकाला भिकाऱ्यासारखे वागवले जाते. मात्र त्याच्याकडची चीजवस्तू घेणाऱ्याला मात्र प्रतिष्ठा मिळते. कनातीतल्या तमाशावाल्यांची राहण्याची, प्रवासाची स्थिती दयनीय, बालगंधर्व रंगमंदिरात लोकनाट्य सादर करणाऱ्यांना मात्र दौरे काढण्यासाठी आरामगाड्या असतात.

शंकररावांनी अजून एक मुद्दा सांगितला. तो म्हणजे दलित रंगभूमी ही एतद्देशीय आहे. मध्यमवर्गीय मराठी नाटकांनी युरोपियनांची नक्कल केली. मूळ लेखकाचे नाव न छापता भाषांतरे उतरविली असे ते म्हणाले.

### 'पुरुष', कलात्मकता, फॉर्म

संमेलनाध्यक्ष भि. शि. शिंदे हे एक संयत व सर्व बाजूंचा विचार करणारे साहित्यिक आहेत. मात्र शेवटी स्वतःची एक बाजू–भूमिका मांडावीच लागते. ती त्यांनी समर्थपणे आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडलीसुद्धा.

गेल्या तीन–चार वर्षांपासून मराठी साहित्यविश्वात बांधिलकी–विरोधी लाट आली आहे. (अर्थात् केवळ पुरोगामी लेबलांसाठी आसुसलेली 'अनुभवी' नसलेली बांधिलकीवाली मंडळींनाही तेजीचे दिवस आहेतच. ) मात्र रायपूर–आंबेजोगाई येथील साहित्यसंमेलनात बांधिलकीला एक प्रकारे बदनामच करण्यात आले. त्याला उत्तर जळगावच्या साहित्यसंमेलनात शंकररावांनी दिले. मात्र त्याहूनही नेमके उत्तर भि. शि. शिंदे यांनी दिले आहे. कलावंतांनी प्रचाराचे

झेंडे नाचवायचे नसतात, ( माडगूळकर : अंबेजोगाई) हे त्यांनी मान्य केले. मात्र असे करताना कलावंतामधली व्यक्तीही विचारात घ्यावी लागते. व्यक्ती आपल्या समाजातूनच येते. व्यक्तीच्या आविष्कारात त्या समाजाचे चित्रही येणार. कलाविष्काराला बाध न येता साहित्यामध्ये अशी बांधिलकी (प्रचार) आला तर त्याला शिक्का मारून मोकळे का व्हावे ? शेवटी कलावंत व प्रचारक यांच्यामधील सीमारेषा फार अस्पष्ट आहे, असा एकंदर त्यांच्या भाषणाचा सूर.

*श्री. शिंदे यांनी मांडलेले इतर काही मुद्दे* असे– ( सवर्ण ) मध्यमवर्गीय अनुभव, जाणिवा वेगळ्या असल्याने त्यांना दलित साहित्य (व रंगभूमीचे) मूल्यमापन करता येत नाही. त्यासाठी वेगळ्या दलितसमीक्षेची गरज आहे. दलित रंगभूमीच्या व्यावहारिक समस्या, आर्थिक, व्यवस्थापकीय, स्त्री–भूमिकांबद्दलच्या अडचणी.

या वेळी '*मध्यमवर्गीय*' रंगभूमीवरील काही नाटकांवर गंभीर आक्षेप घेतले गेले. एरवी या आक्षेपांची पलायनवादी म्हणून वासलात लावली असती. मात्र खरात व शिंदे यांनी पुरेशा गंभीरपणे आपले मुद्दे मांडले म्हणून त्यांची दखल संबंधितांना घ्यावीच लागेल. 'पुरुष' 'कन्यादान' 'झुंज' (त्यापूर्वी 'सूर्यास्त') या नाटकांमध्ये दलित युवकांचे चित्र हे विकृत रंगविले गेले आहे असे त्यांचे म्हणणे. *वस्तुत: या बहुतेक नाटकांतून सवर्ण मध्यमवर्गीय मनाला* सूक्ष्म आनंद देईल याच प्रकारचे दलितांचे चित्रण आहे. ( सवर्णांना असाच सूक्ष्म आनंद देणारे दलित चित्रण 'त्रिशंकू' सारख्या कादंबऱ्यांतूनही येते.) अशा प्रकारचे चित्रण *त्या* लेखकांच्या मते वास्तव असते.

*याबाबत* दोन गोष्टी लक्षात घ्याव्यात. दलित युवकाचे असे चित्रण विकृतच असते का ? ते वास्तवाला धरून नाही का ? दुसरे, असे चित्रण करणे इष्ट आहे का ? जयवंत दळवी यांच्या एकंदर लिखाणाची घाटणी पाहिली तर प्रत्येकाच्या 'ट्रॅजिक' मनोवस्थेवर भेदकपणे ( स्टार्क ) लिहिणे ही त्यांची पद्धत आहे. *त्यात मग* दलितांबरोबर इतर (स्त्री, पुरुष, कारकून, साहेब, वृद्ध इ. ) अशा अनेक 'जाती' मोडतात. मात्र भि. शि. शिंदे यांनी हा प्रकार म्हणजे सवर्ण मनाचा प्रतिक्रियावाद होय असे सांगितले. दलित माणूस सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात थोडा-बहुत पुढे सरकत असतानाच त्याच्याविरुद्धची ही सूक्ष्म रीतीची प्रतिक्रिया असल्याचे त्यांचे मत आहे. याबाबत अजूनही खोलात जाण्यास वाव आहे.

दुसरे म्हणजे दलितांचे अशा तऱ्हेने (वास्तव का असेना) चित्रण करणे इष्ट आहे काय ? खरातांच्या म्हणण्यानुसार हे सडक्या व कुजक्या मनाचे लक्षण आहे. दलितांचा त्याग, चळवळीतील उदात्तता *यांच्यावर* झोत हवा, हे *म्हणणे* खरेच आहे. आता कुठे ग्रामीण भागातील दलित थोडाफार आत्मविश्वासाने पुढे येऊ लागला. एवढ्यातच त्याच्यासमोर स्वत:ची अशी प्रतिमा (खरी–खोटी) उभी करून त्याचा *तेजोभंग* करणे किंवा त्याची मनोवृत्ती खच्ची करणे कितपत योग्य आहे ? केवळ साहित्यिक निकष लावून या वेळी भागत नाही. त्याच वेळी लेखनस्वातंत्र्य सोडून एक मुद्दा महत्त्वाचा वाटतो. आतापासूनच दलित युवकाला पुढच्या शक्य धोक्यापासून (म्हणजे 'झुंज', 'कन्यादान' 'त्रिशंकू') सावध करण्यासाठी हे वास्तव चित्रण आवश्यक नाही का ? या चित्रणास आक्षेप घेणे म्हणजे एक प्रकारचा पलायनवाद होत तर नाही ? आतापासूनच टीकेबाबत, किंवा तथाकथित विकृत चित्रणाबाबत हळवे का व्हावे ? साहित्यात सर्वत्र आबादी-आबाद, देशातील *गुण्यागोविंदाची एकता, भव्य-दिव्य* परंपरा यांचेच चित्रण असावे अशा सरकारी आग्रहासारखाच शंकररावांचा आग्रह ठरण्याची शक्यता आहे.


या प्रश्नावर एका परिसंवादात रावसाहेब कसबे यांचे निरीक्षण फार छान होते. या नाटकांमध्ये दलित तरुणांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न असे काही नाही. स्त्रिया या शूद्रातिशूद्रांपेक्षा जास्त क्रांतिकारी असतात हे दाखवण्याचा या नाटकांमध्ये प्रयत्न आहे. मात्र यासंबंधी सदर नाटककारांनी मानसशास्त्र, समाजशास्त्र यांचा काहीच अभ्यास केला नाही. वरवर जे दिसते तेवढे *गोळा करून* चटकदारपणे मांडले. *त्यांनी* आपल्या विधानाची गंभीरपणे मांडणी कुठेच केली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

संमेलनात सात परिसंवाद झाले. मात्र खऱ्या अर्थाने उद्बोधक ठरला तो दुसऱ्या दिवशी संध्याकाळचा परिसंवाद–'दलित रंगभूमीकडून अपेक्षा.' यातही सुरेश मेश्राम, भालचंद्र फडके व रावसाहेब कसबे यांनी बाजी मारली. भालचंद्र फडके यांनी दलित रंगभूमीवर ( किंबहुना साहित्यावरच ) आक्रस्ताळेपणाचा आरोप केला जातो याची नोंद घेत हा आरोप फोल ठरविण्यासाठी काय करता येईल त्याची एक झलक दाखविली.

दलित रंगभूमीने अन्यायाचे नुसते भान देऊ *नये तर त्यामागील तर्कशास्त्र* उभे करावे. आपल्या परिस्थितीचे 'ज्ञान' घडवून त्यातून विचार व कृतीकडे नेले पाहिजे. आपल्या विधानांना तात्त्विक अधिष्ठान दिले पाहिजे. नुसते डॉ. आंबेडकरांचे नाव घेऊन चालणार नाही. कारण ज्यांच्याशी लढायचे त्यांच्याकडे आधुनिक तर्कशास्त्र, तत्त्वज्ञानाच्या पद्धती आहेत. आपणही आता त्या पातळीवरून लढायचे. डॉ. फडके यांनी मोठ्या खुबीने हे सांगितले. दलित रंगभूमीने नुसते आव्हान देण्याऐवजी (समाजबदलाचे) आव्हान स्वीकारले पाहिजे. परंपरागत मराठी रंगभूमीवरची भांडणे येथे आणू नका असे ते म्हणाले.

रावसाहेब कसबे तर याहून फटकळ बोलले. दलित साहित्यावरील टीकाकारांच्या दुटप्पी पद्धतीची खिल्ली उडविण्याबरोबरच त्यांनी दलितांनासुद्धा तोच-तोपणा टाळावा. आपले नेहमीचे 'रडगाणे' आता फार झाले. त्यालाही कलाकृती म्हणत नाहीत, आता कलात्मक व्हा असा सल्ला दिला !

आणि याच कलात्मकतेची कसब्यांनी अशी व्याख्या दिली की, त्यानुसार अपवाद वगळता सर्व मराठी साहित्य हलकेच ठरावे. ते म्हणाले 'स्वत:च्या अनुभवांशी तटस्थपणे प्रामाणिकपणे संवाद साधून ते व्यक्त करणे, व्यापक ( पूर्ण व्यवस्था व परस्परसंबंध यांचा) विचार, आपल्या विषयाचा खोलवर अभ्यास आणि स्वत:ला प्रश्न विचारणे, स्वत:शी संघर्ष करणे, विषयाला निरनिराळ्या दृष्टीतून आकळणे, स्वत:च्या व ( स्व-जातीच्या ) कोषातून बाहेर पडणे यातून कलात्मक साहित्य-निर्मिती होते. या निकषावर सर्व मराठी नाटके फालतू व कलात्मक पातळीवर न जाणारी आहेत..



# भि. शि. शिंदे

**पहिले दलित नाट्यसंमेलन हे कुठल्या अर्थाने यशस्वी झाले असे म्हणता येईल ?**

**आबा :** तसं पाहिलं तर सर्वच अर्थानं पहिले नाट्यसंमेलन हे यशस्वी ठरले आहे. आमच्या अपेक्षेपेक्षा थोडा अधिकच प्रतिसाद आम्हाला मिळाला याचं समाधान वाटतं, आनंद वाटतो. यातून सर्वाधिक चांगली गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे सर्वत्र विखुरलेली अनेक कलावंतमंडळी, नाट्यमंडळ्या या एकत्र आल्या. त्यांचा समन्वय साधण्याचा ( कोऑर्डिनेशन ) उद्देश या संमेलनाने साधला आहे.

**दलित रंगभूमीची सुरुवात केव्हा झाली असे आपण मानता ? आज तिचे स्वरूप काय आहे ?**

**आबा :** लोककलेच्या स्वरूपाकडे पाहता ती कला फार जुनी आहे. आंबेडकरी जलसा हा रंगभूमीच्या सुरुवातीची नांदी ठरत असला तरी ' रंगभूमी ' म्हणून जो विचार समोर आला तो औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालयाची स्थापना झाली. त्यातून विद्यार्थी शिकू सवरू लागले. एका निकडीतून रंगभूमीचा विचार आकार घेऊ लागला.

**ही झाली सुरुवात; परंतु स्वरूपाचं काय ?**

**आबा :** ' युगयात्रा ' या म. भि. चिटणिसांच्या नाटकाद्वारे रंगभूमी आकारू लागली तरी खरी चळवळ म्हणून तिने वेग घेतला तो नामांतर दंगलीनंतरच. हे माध्यम अधिक प्रभावी ठरू शकेल असे वाटल्याने अनेकांनी ठिकठिकाणी छोटे छोटे ' ग्रुप्स ' तयार केले. नामांतर दंगलीतील अत्याचार अधिक प्रभावीपणे व्यक्त होतील अशातूनच ' रंगभूमी 'ने वेग घेतला. कथा, कविता ही माध्यमे अपुरी वाटू लागल्याने आज ' रंगभूमी 'च्या वापराला चालना मिळालेली आहे.

**दलित रंगभूमी ही फक्त एका जातीपुरतीच मर्यादित वर्तुळात अडकल्याचा आक्षेप घेतला जातो तो कितपत खरा आहे ?**

**आबा :** हा आक्षेप तसा पूर्णतः चुकीचा आहे. माझंच उदाहरण देतो. माझ्या ' आयोग ' या नाटकातून दुष्काळी कामावरील मजुरांच्या पिळवणुकीचे चित्रण आहे. त्या पिळवणुकी-विरोधात संघटित होतात. ते मजूर सर्व जाती–जमातींचे असतात. दलित–दलितेतर एकत्र आले आहेत म्हणजेच कक्षा रुंदावल्या आहेत. महारवाड्याची सीमा दलित रंगभूमीने केव्हाच ओलांडली आहे. ' काळोखाच्या गर्भात ' ' आम्ही देशाचे मारेकरी ' झालंच तर औरंगाबादच्या प्रकाश शिरसाटचे ' स्वातंत्र्य कच्च्या गाढवींचं नाव ' ' आम्ही एकात्मतेचे...' वगैरे नाटके सीमारेषा ओलांडल्याचे द्योतक नाहीत का ? निश्चितच कक्षा रुंदावल्या आहेतच.

**दलित रंगभूमीची नेमकी व्याख्या तुम्ही काय करू पाहता ? त्याचा ' फॉर्म ' वगैरेचे काय ?**

**आबा :** सुरुवातीला पूर्ण व्याख्या करणे तसे अवघडच आहे. अभ्यास चालू आहे, ' फॉर्म 'चा शोध घेणे चालू आहे. मुख्य वाटचाल चालू आहे आणि वाटचालीतूनच परिपूर्णता येण्याची प्रक्रिया सुरू आहे. आज लक्षणं तर लक्षात घेता येणे शक्य झाले आहे. अर्थात प्रबोधन आणि परिवर्तनाची चळवळ म्हणूनच हे माध्यम आकार घेणार आहे. तशी चळवळ पूर्वीपासूनची आहे. आता तिला मूर्त रूप येण्याची प्रक्रिया घडते आहे.

**दलित रंगभूमी पूर्णत्वास कधीपर्यंत जाऊ शकेल असे वाटते ?**

**आबा :** वस्तुतः साहित्याबरोबरच नाट्य-चळवळीचीही प्रक्रिया सुरू होती; पण ' रंगभूमी ' माध्यम म्हणून आवश्यक तेवढे महत्त्व दिले गेले नसल्याने आजची स्थिती होण्यास मधली दहा वर्षे लागली. आता या प्रक्रियेने वेग घेतला आहे. त्यामुळे ही परिपूर्णता येण्यासाठी आता अधिक काळ थांबावे लागणार नाही.

**' रंगभूमी 'च्या विकासासाठी निश्चित योजना आखल्या आहेत का ?**

**आबा :** पहिल्या संमेलनाने सर्व दलित नाट्यगट आणि कलावंतांना एकत्र येता आले आहे. आमच्याकडे निश्चित स्वरूपाच्या कल्पना आहेत. त्या अंमलात आणण्यासाठी मी स्वतः टेक्सास गायकवाड इत्यादी मंडळी कार्यरत आहोत. लोककलांना प्रोत्साहन देण्यासाठी ' रंगभूमी 'च्या अभ्यासार्थ पिंपरी-चिंचवड येथे नाट्यगृह व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक व संशोधनकेंद्र उभारण्यात येत आहे. तेथे एक वसतिगृहही बांधण्यात येईल. शिवाय ग्रंथालय अशी योजना आहे. दलित रंगभूमी पुणे ही संस्था टेकसाससह शिल्पा मुंब्रीसकर, अनंत मुंब्रीसकर इत्यादी यासाठी प्रयत्नशील आहेत. याशिवाय ' थिएटर 'कडे सर्वसामान्य लोक येऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची योजना आहे. ' मोबाईल थिएटर ' ही कल्पना साकार होऊ घातली आहे.

फोर्ड फौंडेशनने तीन लाखांचे अनुदानही मान्य केले आहे. या मार्गाने ग्रामीण भागातून, वस्त्यावस्त्यांतून ' रंगभूमी ' लोकांपर्यंत पोहोचेल. शिवाय त्या त्या भागात ' नटसंच ' संघटित केले जाणार आहेत.

मुलाखत : प्रकाश देशमुख
भीमराव जाधव

त्यांच्यामागे अभ्यास नाही. संपूर्ण व्यवस्थेचा संदर्भ नाही. निधडेपणाने स्वत:लाच प्रश्न विचारणे नाही. दलित साहित्याने 'आपलाची वाद आपणासी ' या भूमिकेतून चालले पाहिजे. '

कसब्यांचा दुसरा मुद्दा तितकाच उद्बोधक आहे. साहित्यिक किंवा सांस्कृतिक चळवळ रंगपटावर असतानाच बाहेर समांतर व पूरक अशी सामाजिक चळवळ असावी, तरच ते साहित्य क्रांतीला प्रेरणा देऊ शकते. दलित साहित्याविषयी अशी स्थिती आढळत नाही, असे ते म्हणाले.

जातीयवाद सर्व एकच. सवर्ण जातीयवादाबरोबर दलित जातीयवादाशी लढावे लागेल. नुसते डॉ. आंबेडकरांचे नामस्मरण नको. नाहीतर पारंपारिक रंगभूमीवाले गणपतीपूजा करतात, तुम्ही बाबासाहेबांची, एवढाच फरक राहील. दलितांचा प्रश्न त्यांच्या एकट्याचा मानणे हा फॅसिझम होईल. तो. दलित-सवर्ण आंतरसंबंधांचा ( एकूण व्यवस्थेचा, सिस्टीमचा ) प्रश्न आहे असे श्री. कसबे म्हणाले.


लोककला व दलित रंगभूमीसंबंधीचा परिसंवादही रंगला. प्रा. रुस्तुम अचलखांब यांनी आपल्या यासंबंधीच्या व्यासंगाचे प्रत्यंतर दिले. भाऊ फक्कडसारखे महार जातीतले श्रेष्ठ शाहीर आज उपेक्षित आहेत, तर त्यांच्याकडून पराभूत झालेले ब्राह्मण शाहीर पठ्ठे बापूराव यांचे साहित्य विद्यापीठीय अभ्यासाला आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली शाहीर पाटसकर यांनी दलित रंगभूमीने कलापथकांचा वापर करावा असे सुचविले. दलित रंगभूमीने लोककलांचा वापर अधिकाधिक करावा, दलित व ग्रामीण लोकांच्या जवळ जावे असे म्हणणारा व दलित रंगभूमीने आता 'स्टेज प्ले', बंदिस्त नाट्यगृहात जावे असे दोन प्रवाह यापुढे दलित रंगभूमीवर येतील असे दिसते. लोककलांच्या समर्थकांचे ( प्रा. अचलखांब, शाहीर पाटसकर ) रंगभूमीवर अभिनय, नृत्य, नाट्य, संगीत, कवन, इतर तंत्रे यांचा संयुक्त परिणाम साधावा हा मुद्दा होता. त्यांचा बंदिस्त नाटकांना विरोध नव्हता, मात्र कम्युनिकेशन (संपर्क) दृष्टीने लोककला अधिक प्रभावी ठरते असे त्यांचे म्हणणे होते. प्रा. अविनाश डोळस, प्रा. दत्ता भगत, द. मो. नारनवरे यांनी मात्र प्रभावीपणे आशय व्यक्त करणारे कोणतेही तंत्र वापरावे, तसेच स्वत:चे असे नवे तंत्र विकसित करावे असे सांगितले.

पथनाट्यासंबंधी मात्र अध्यक्ष बाबा शिंदेपासून ते प्रा. अचलखांब यांनी नाराजी व्यक्त केली. पथनाट्ये तत्कालिक, परिणाम न साधणारी, विषयाचे गांभीर्य कमी करणारी असतात असे सर्वांचे मत होते. पथनाट्यविषयक परिसंवादातदेखील राणा भीमदेवी आवेशच जादा होता.

या वेळी डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केलेली एक सूचना महत्त्वाची वाटली. 'दलित रंगभूमी व समीक्षा' या परिसंवादात बोलताना त्यांनी दलित रंगभूमीचे प्रयोजनच वेगळे असल्याने त्याची समीक्षाही वेगळी करणे अगदी उचित आहे असे सांगितले. मात्र येत्या दहा-वीस वर्षांत या रंगभूमीला व्यावसायिक होणे अपरिहार्य आहे. व्यावसायिक झाल्याने कलावंत, लेखन, दिग्दर्शन यात अधिकाधिक चुरस व 'क्रिस्टलायझेशन' होत राहील, रंगभूमीला एक स्थिर स्वरूप प्राप्त होईल असे त्यांनी सुचविले. दलित-अदलित रंगभूमी असा फरक पुसत जाऊन शेवटी चांगली-वाईट रंगभूमी असाच निकर्ष राहील असे त्यांनी सांगितले. सुरेशचंद्र पाध्ये यांनी अभिनय व वास्तव यात जास्ती संबंध जुळावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

आशय, तंत्र व पुढील मार्ग या दृष्टीने डॉ. फडके, रावसाहेब कसबे, डॉ. देशपांडे, भि. शि. शिंदे यासारख्यांनी दलित-रंगभूमीच्या चळवळीला काही स्पष्ट सूचना केलेल्या आहेत. ही नाणसे केवळ स्तुतिपाठक नाहीत, तर चांगले डोळस मित्र आहेत. त्यांनी केलेल्या सूचना खरोखरच विचार करण्यासारख्या आहेत.

या वेळी 'दलित रंगभूमी व स्त्री' असा-मुद्दा परिसंवाद झाला. 'दलित रंगभूमी व बालनाट्य' हा परिसंवाद झाला; परंतु विषयांचा तोचतोपणा, विचारात नाविन्याचा



## 'रंगभूमीवरून मनोरंजनही व्हावेच'

**—रुस्तुम अचलखांब**

दलित रंगभूमीने लोककलांचा वेगळ्या प्रकारे वापर करावा. प्रबोधनाबरोबरच रंजन हे आवश्यक आहे, त्याशिवाय रंगभूमीला अर्थ नाही असे मत औरंगाबादचे नाट्यशास्त्राचे प्राध्यापक रुस्तुम अचलखांब यांनी मांडले. अचलखांब हे मराठवाड्यातील महारसमाजातून पुढे आलेले. लोकनाट्य हा त्यांचा संशोधनाचा विषय.

लोककला, कलावंत यावर त्यांचे गेली पाच–सहा वर्षे अखंड संशोधन चालू आहे. त्यातही तमाशा-फॉर्म आणि त्यातील कलावंत हा त्यांच्या आवडीचा विषय. जुन्या लावण्या, चाली मिळविण्यासाठी त्यांनी फार दगदग केली. अत्यंत वृद्ध असलेल्या तमासगिरांची भेट घेऊन, आठवणी चाळवून त्यांच्या मुलाखती भाऊ फक्कडसारख्या प्रतिभावंतांच्या लावण्या त्यांच्या मूळ चाली व इतर गीते यांच्या १५० कॅसेट्स त्यांच्याकडे आहेत.

अचलखांब यांनी औरंगाबादला 'दलित नाट्य अकादमी' स्थापन केली. त्यामार्फत परिसंवाद, नाटके, अण्णाभाऊ स्मृतिदिन हे कार्यक्रम होतात. त्यांचा आवाज छान आहे. 'संगीत मनमोहना' हा तमाशा ते एकट्याने तीन तास सादर करतात. 'कैफियत' हे नाटक त्यांचेच.

त्यांचे 'गावकी' आत्मकथन नुकतेच प्रसिद्ध झाले. यामध्ये इतर आत्मकथनाप्रमाणे दलितांची लाचारी दाखविलेली नसून तो प्रत्यक्ष कृती करतो असे चित्रण आहे असे ते म्हणतात. ◻

अभाव ही परिसंवादाची वैशिष्टये होती. नेमके पुढे काय करायचे, त्याचे काय मार्ग आहेत, वेगळया वाटा कोणत्या, त्यासंबंधी चिंतन अपेक्षित होते. वरील गोष्टींचा अभाव असल्याने अनेक भाषणांत डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू, म. फुले, अण्णाभाऊ साठे यांचे नामस्मरणच व्हायचे.प्रत्येकजण त्यांच्या कार्याचा आढावाच घ्यायला उभा राही व मूळ विषय हरवून बसत असे.

अशा परिसंवादांतून मग आपसातली दुही, (रिपब्लिकन !) कम्युनिस्टांवर टीका, दलितांचे भीषण जीवन कसे होते (व आहे) यासंबंधीच चर्चा होई ! अर्थात कोणत्याही संमेलनात असा 'उत्साह'च अधिक असतो हे गृहीतच धरायला हवे.

## नाटके

हे परिसंवाद होत असतानाच टिळक स्मारक मंदिर रंगभूमीवर चांगली नाटके झाली. एकंदर १९ नाटके झाली. सर्व कार्यक्रमच एवढा भरगच्च होता की, एकाच वेळी वर नाटके चालू होती व खाली परिसंवाद. त्यामुळे श्रोत्यांची (दुहेरी निष्ठा !) व वक्त्यांची फार (श्रोतेनविण !) पंचाईत होती. आंबेडकरी जलसा या वेळी दाखवला. यात तमाशाचाच 'फॉर्म' ठेवलेला असतो. मात्र गण-गौळण वगळून बतावणी व वग तेवढा असतो. त्याचा विषयही अर्थात वेगळाच ! 'काय रं' हे अरुणकुमार इंगळे यांनी लिहिलेले प्रज्ञा रंगमंच, सोलापूरने सादर केलेले हे नाटक तंत्र, आशय या दृष्टीने फार समर्थ होते. अन्यायाचा सामना करण्याबरोबरच आपसात एकी बाळगावी हे सूत्र या व अनेक नाटकांत होते. 'आम्ही' (पँथर थिएटर्स नागपूर) 'स्त्री–१९८०' (संकेत थिएटर्स नागपूर) या दोन एकांकिका तर पुण्याच्या कोणत्याही पुरुषोत्तम करंडकवाल्यांना लाजवतील. 'आम्ही'-मधल्या रेल्वेकामगारांचा अभिनय, शब्द-फेक, सहजता वाखाणण्यासारखी होती. काळोखाच्या गर्भातच प्रयोग नेटका झाला. (इतर नाटकांसाठी चौकट पाहणे.) दलित नाटक आता 'स्टेजप्ले' वर स्थिरावू लागल्याची ही चिन्हे होती. यामधून अनेक निष्कर्ष, संभाव्यता वर्तविता येतील; पण ते वेगळेच काम होईल.

संमेलनातील सर्व नाटके पाहताना सतत जाणवणारी गोष्ट म्हणजे ही नाटके मुख्यत: दलित प्रेक्षकांसाठी होती. कारण त्यात मानसिक विवेचनाचा भाग जास्त होता. १९ नाटकांपैकी दोन–तृतीयांश नाटके ही ढोबळ कथानक असलेली, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नामस्मरण असलेली, उठता–बसता 'या देशात'... सारखे संवाद, मध्येच एकदम ढसाळ–सुर्वे स्टाइलच्या कवितांचा उद्रेक करणारी होती. या बहुतेक नाटकांत ब्राह्मण किंवा कुळवंत मराठा (पाटील, भटजी व तत्सम) अन्याय करतो, महारवाड्यातील लोक असहाय असतात. मग शहरात शिकलेला, सब्बा–पँट असा मुलगा येतो. 'परंपरेच्या वारसदारांनो'... वगैरे करीत तो सर्वांना एक करतो वगैरे असे चित्रण आढळते. आजपर्यंत मध्यमवर्गीय ढोबळ (कालेलकर, कोल्हटकर) नाटकात गडी, खेडूत यांचा वापर करून विनोदनिर्मितीचा प्रयत्न होत असे. ढोबळ दलित नाटकांमध्येसुद्धा सवर्णांची टिंगल होते. अशा वेळी सर्व प्रेक्षक जोरदार टाळ्या व मनापासून दाद देत असत. आतापर्यंत कोंडल्या गेलेल्या मानसिक विवेचनाचीच (कथार्सिस) ही परिणती होती. प्रत्येक समाजातील गटाला हे कथार्सिस आवश्यक असते. दलित नाटके ती भूमिका बजावत आहेत.

मात्र दलित रंगभूमीवरील पात्रे, त्यांची विचार करण्याची पद्धत, संवाद हे सगळे पांढरपेशा पद्धतीचे होते. बहुतेक नाटके शिक्षित अशा 'दलित ब्राह्मण' स्तरातील लेखकांची. त्यामुळे त्यातील संवाद प्रतीकांचा वापर (आणि कविता) या फार अवघड व गुंतागुंतीचे (क्लम्झी) होते. या रंगभूमीचा 'टार्गेट ऑडियन्स' कोणता त्यावर पुढची वाटचाल अवलंबून आहे.

थिएटरबाहेरही अनेक भली–बुरी नाटके चालू होती. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच पुण्याच्या 'दलित रंगभूमी'तून वेगळ्या पडलेल्या एका गटाने या आयोजक–संस्थेवर व त्याचे प्रमुख टेक्सास गायकवाड यांच्यावर आरोप करणारी पत्रके बाहेर डकविली होती. अप्रामाणिकता, पैशाचा गोंधळ, फायदे उपटणे असे अनेक आरोप त्यात होते. 'एक प्रेक्षक' या नावाचे हे पत्रक होते. तो 'प्रेक्षक' कोण हे अनेक 'जुने जाणिते' ओळखून होते. म्हणजे मध्यमवर्गीय रंगभूमीचा वाण इथेही लागला तर ! चळवळीची जेव्हा संस्था–संघटना–मठ अशी परिणती होत जाते तेव्हा या गोष्टी अपरिहार्यच असतात ! चळवळीचे केव्हा तरी संस्थेत स्थिर होणे अटळ आणि आवश्यकही असते.

नागपूर, औरंगाबादच्या ग्रुप्सचा तर दलित

---

## बाहेरचे पाहुणे

या संमेलनासाठी दिल्लीहून सविता सिंग व रजनी स्वराज या दलित थिएटरशी संबंधित महिला आल्या होत्या. सविता सिंग यांनी स्वत: एक 'दलित स्त्री अत्याचार विरोधी समिती' स्थापन केली आहे. दिल्लीतील 'सहेली', 'जनवादी महिला' सारख्या संघटना हुंडा या एकाच प्रश्नावर वाजवीपेक्षा जास्त भर देतात. त्यांना प्रसिद्धीही भरपूर मिळते. मात्र त्या दलित खालच्या स्तरातील स्त्रियांच्या प्रश्नाकडे मुळीच लक्ष देत नाहीत अशी त्यांची तक्रार होती. दलित रंगभूमीने पथनाट्याचा वापर आपल्या समाजाच्या प्रबोधनासाठी तर स्टेज प्लेचा वापर आपल्या समस्या इतर समाजाला सांगण्यासाठी करावा असे त्यांचे म्हणणे आहे.

रतलामच्या 'जनवादी नाट्यमंच'नेही आपला ठसा उमटवला. 'कॉर्नर प्ले'साठी आमच्याकडे लोकांचा प्रतिसाद चांगला असतो. अनेक ठिकाणी बोलावून कार्यक्रम केले जातात. मध्यप्रदेशात असे अनेक ग्रुप्स आहेत असे त्यांचे म्हणणे होते. 'स्त्री–१९८०' सादर करणाऱ्या संकेत थिएटर्सची तक्षशिला गायकवाड हिने दलित स्त्री रंगभूमीचा उगम नागपुरातच झाला. १९८० पासून 'स्त्री' चे प्रयोग होत आहेत. हा १५० वा प्रयोग ! असे ती म्हणाली. आमच्याकडे स्त्री कलावंत मिळण्यास फार अडचणी येतात. घरच्यांचा विरोध व समाजाचा दृष्टिकोन हे आड येतात असे तिचे म्हणणे. ◻

रंगभूमी आमच्याकडचीच असा सूर होता. सोलापूरवाल्यांनी आपले आपसातले गट आहेत असे जाणवून दिले.

मात्र अशा प्रसंगाहूनही किती तरी पटींनी जास्त परस्परसंबंध, ओळखी, मैत्री वाढत होत्या. जयपूर, दिल्ली, रतलाम, नागपूर, सोलापूर, नगर, औरंगाबादकडची तरुण मुलं-मुली गप्पा मारत, गाणी म्हणत, थट्टा-विनोदाने गडागडा हसत होते, एकत्र जेवत. सगळे प्रतिनिधी जिथे उतरले, ते सानेगुरुजी विद्यालयाचे वातावरण जिवंत असायचे. औरंगाबाद, सोलापूर, नागपूरची माणसं परस्परांना अधिक जवळ! एखादा प्रकाश शिरसाट आपल्या कंपूत तुळजाभवानीचं पोड गात भाऊ पंचभाईला 'एक रुपया' मागायचा! अशी सगळी धमाल येत होती. मध्यप्रदेशचे जनवादी मंचवाले मस्तपणे मिसळत होते.

याहीपेक्षा जाणवत होता संमेलनातील कसदारपणा. मराठी साहित्यसंमेलने, नाट्यसंमेलने आता शिळी व विटकी झाली आहेत. त्यांची काव्यसंमेलने, परिसंवाद, नाटके बघणं म्हणजे बिनबांधिलकीवाल्यांनासुद्धा जांभया येतात! तर उपचार मात्र राहिला आहे तो!

त्या पार्श्वभूमीवर काही तरी आशय, विषय व त्याच्याकडे जायची दिशा असलेले हे संमेलन कसदार वाटणे साहजिक होते. येथल्या परिसंवादातून काही तरी नवे मुद्दे, नवी सूत्रे निघण्याची शक्यता होती, नवा वैचारिक आकृतीबंध मांडण्यासाठी योग्य अशी ही चळवळ होती. पुढे काय करायचे याची उत्सुकता असायची.

एखादा पक्ष संघटना, संस्था यात जसे असते तसेच या संमेलनात हुकुमी जयजयकार टाळ्या, हुकुमी वाक्ये, फेक्रेस व राणा भीमदेवी वाक्ये, थोडीफार असहिष्णुता होतीच. वक्त्यांपैकी अनेकजण काय बोलायचे आहे ते विसरून डॉ. आंबेडकर, गौतमबुद्ध, म. फुले, शाहूमहाराज यांचेच धार्मिक पद्धतीप्रमाणे नामस्मरण करीत. नाटकांमध्येही दृक्-श्राव्य परिणामापेक्षा निबंध, कविता असाच प्रकार जास्त होता. अर्थात 'काय रं', 'स्त्री-१९८०', 'आम्ही' 'कैफियत', 'म्युल्याटो' असे हे अपवाद होतेच.

चार दिवस हे संमेलन झाले. महाराष्ट्रात विखुरलेले रंगभूमीचे अनेक गट एकत्र आले. मात्र त्यांनी काही सामूहिकपणे एखादी दिशा ठरविली काय, निर्णय घेतला काय हे काही जाणवले नाही. नुसते एकत्र यायचे तर मराठी साहित्य (नाट्य) संमेलने आहेतच की!

शेवटी, हे संमेलन पुण्यातच घेण्यामागे सनातन्यांविरुद्धची खुन्नस असेल हे कळू शकते. मात्र अशी संमेलने जिथे ग्रामीण, दलित समाज आहे त्या वस्त्यांत व गावांत भरवावीत. कारण सदाशिवपेठेतील या संमेलनाला सदाशिवपेठी किंवा डे. जिमखानावाले तर फारसे फिरकत नाहीत अन् नाना-गंज-मंगळवार पेठ, हडपसर वगैरे भागातील दलितांना तो भाग अंतर व संस्कृती यांच्या दृष्टीने दूर वाटतो. त्यात पुणे हे सांस्कृतिकदृष्ट्या आता सॅच्युरेट झाले. गेंड्याची कातडी झाली आहे. कोणत्याही गोष्टीची इथे टरच उडवितात. यापुढे संमेलन घ्यायचे तर ते ग्रामीण भागात किंवा औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, नांदेड, लातूर अशासारख्या चैतन्यशील व नवीन घडामोडींबद्दल उत्सुकता व समजदारी असणाऱ्या गावात भरवावे ही अपेक्षा. □

रंगभमी

# पहिले दलित नाट्यसंमेलन

वि. भा. देशपांडे

'दलित रंगभमी, पुणे' ही नाट्यसंस्था स्थापन होऊन चार वर्षे झाली. एवढ्या अवधीत या संस्थेने अनेक नाट्यप्रयोग करून स्वतःचे अस्तित्व सिद्ध केलेले आहे. त्या आधारे त्यांनी आपल्या कार्याचे क्षेत्र अधिक विस्तारीत करण्याचा फार मोठा असा कार्यक्रम संपन्न केला, तो म्हणजे अखिल भारतीय स्तरावर एक नाट्यसंमेलन आयोजित केले. हे संमेलन दिनांक २४ ते २७ फेब्रुवारी ८४ या चार दिवसांत टिळक स्मारक मंदिरात संपन्न झाले.

कोणत्याही नाट्यसंमेलनाचे सर्वसाधारण स्वरूप असते तसेच याही ठिकाणी होते; पण त्यात काही बाबतीत वेगळेपणही होते. ते असे की, अनेक गावांहून जे दलित रंगभूमीचे कलाकार संमेलनासाठी आले त्यांनी येताना आपल्या संस्थेचे एखादे छोटे-मोठे नाटक बरोबर आणले होते. त्यामुळे संमेलनाला जे ४००-५०० प्रतिनिधी आले होते त्यांमध्ये बहुसंख्य कलाकार होते. उद्याची दलित रंगभूमी घडवणाऱ्या कलाकारांची संख्या मोठी होती.

उद्घाटनाचे आणि समारोपाचे अध्यक्षीय भाषण, विविध विषयांवरचे चर्चा-परिसंवाद आणि नाट्यप्रयोगांचे दर्शन असे त्रिस्तरीय स्वरूप होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात भि. शि. शिंदे यांनी दलित रंगभूमीच्या निर्मितीची, व्याप्तीची, प्रयोजनांची आणि विद्यमान कार्याची सुस्पष्टपणाने कल्पना देऊन आपले विचार व्यक्त केले. कोणत्याही प्रकाराने मंत्री किंवा तत्सम बड्या कोणाला न बोलवता जीजीबाई गायकवाड यांना बोलावून उद्घाटन अतिशय शानदारपणे केले. या संमेलनात निरनिराळ्या विषयांवर चर्चा-परिसंवाद झाले. त्यामध्ये स्त्रियांच्या समस्या, समीक्षा, रंगभूमीकडून अपेक्षा, रंगभूमी आणि लोककला, पथनाट्ये, बालरंगभूमी इत्यादी विषय होते. अर्थात या सर्व विषयांना दलित रंगभूमी हे मध्यवर्ती सूत्र होते. ते गृहीत धरूनच सर्व चर्चा-भाषणे अपेक्षित होती. तशीच ती झाली. नावे जाहीर होऊन त्यातली काही माणसे ऐनवेळी न येणे हे इथेही घडलेच. तरीही त्यामुळे परिसंवाद अडून राहिले नाहीत.

परिसंवादाच्या बरोबरीनेच अनेक नाट्यप्रयोग पेश केले गेले. त्यामध्ये आंबेडकरी जलसा, काळोखाच्या गर्भात, पिसाळलेली भुते, सूडाचा खेळ, काय रं, शहर, इनामदार, आकांत, जळवा, झाडाझडती, पोतराज, स्त्री १९८० इत्यादी एकांकिका-नाटके पेश झाली. 'झाडाझडती' या नाटकाच्या निमित्ताने दलित लेखिकेने लिहिलेले पहिलेच नाटक पेश झाले ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. या नाटकाची लेखिका आहे शिल्पा मुंब्रीस्कर!

ही सगळी नाटके सलगपणे एकट्याला पाहणे अशक्यच होते. संयोजनात एक भाग अडचणीचा झाला तो म्हणजे ज्या वेळेला

नाट्यप्रयोग रंगमंदिरात चालू असायचा त्याच वेळी चर्चा-परिसंवादही दुसऱ्या सभागृहात सुरू व्हायचा. त्यामुळे यातले नेमके काय करावे असा संभ्रम पडायचा. हा घोटाळा संयोजकांच्याही ध्यानी होता; पण चार दिवसांत एवढे कार्यक्रम बसवायचे आणि मागणी करणाऱ्या संघांना किंवा व्यक्तींना नाराज करायचे नाही या धोरणामुळे असे घडले असावे. कदाचित हे संमेलन पहिल्यांदाच भरत असल्याने असे घडले असावे !

संमेलन यथास्थित पार पडले; पण आता यापुढेच अधिक जबाबदारी येणार आहे. या संमेलनाच्या निमित्ताने विविध गावांचे जे प्रतिनिधी आले होते त्यांचे एकत्रीकरण, विचारांची-संहितांची देवाण-घेवाण आणि रंगभूमीविषयक प्रश्नांना चालना देणे हे महत्त्वाचे कार्य आता अपेक्षित आहे. पुण्याच्या दलित रंगभूमी या संस्थेने झेप तर मोठी घेतली आहे. आता भावी कार्याची अपेक्षापूर्ती व्हायला हवी. ती तयारी आत्ताच्या कार्याहून अधिक आव्हानात्मक आहे.

□

## के. नारायण काळे स्मृतीदिन

के. नारायण काळे यांना जाऊन आता दहा वर्षे झाली. त्यांची स्मृती विविध कार्यक्रमांच्या रूपाने पुण्याची महाराष्ट्रीय कलोपासक ही नाट्यसंस्था सातत्याने करीत आहे. याही वर्षी हा स्मृतीदिन २६ फेब्रुवारीला टिळक स्मारक मंदिराच्या सेमिनार हॉलमध्ये साजरा झाला.

या वर्षीच्या कार्यक्रमाची योजना थोडी वेगळी होती. चित्रपट, रंगभूमी, दूरदर्शन आणि आकाशवाणी ह्या चार माध्यमांबद्दल चर्चा होती. यामध्ये सतीश बहादूर (चित्रपट), सतीश आळेकर (रंगभूमी), ल. गो. भागवत (दूरदर्शन आणि आकाशवाणी) हे वक्ते बोलले. दूरदर्शन माध्यमावर विश्वास मेहेंदळे बोलणार होते; पण ते न आल्यामुळे भागवतांना दूरदर्शन माध्यमावर बोलण्याची विनंती करण्यात आली.

या चर्चासत्राची योजना करताना अपेक्षा अशी होती की, यातल्या प्रत्येक माध्यमाची स्वतंत्र ताकद, मर्यादा, एकमेकांचा परस्परांवर होणारा परिणाम कशा स्वरूपाचा आहे आदी मुद्यांवर सविस्तर बोलणे व्हावे. तसेच वक्त्यांनी आपली मते व्यक्त करावीत. ही चर्चा गांभीर्याने आणि निश्चित स्वरूपात व्हावी अशी अपेक्षा असल्याने ही चर्चा फक्त निमंत्रितांसाठीच होती. संयोजनात जी अपेक्षा होती त्यातला संपूर्ण भाग जरी नाही तरी बऱ्याच अंशाने ही चर्चा लाभदायक ठरली.

या चर्चेच्या निमित्ताने अनेक महत्त्वाचे मुद्दे पुढे आले. चित्रपट ही 'पॅकेज' होणारी गोष्ट आहे, त्यातली कामगिरी आणि कलात्मता, रंगभूमीच्या संदर्भात अर्थव्यवहाराचा प्रश्न, रंगभूमी-नाटक यांच्या संबंधात शब्द साहित्याचा अंतर्भाव किती प्रमाणात असतो, दूरदर्शन--आकाशवाणीसारखी माध्यमे आपकी कलात्मक जाणीव कितपत वाढवतात इत्यादी अनेक मुद्दे चर्चेला आले.

चर्चेत अरविंद मंगरूळकर, अ. के. भागवत आनंद लागू, मीना चंदावरकर, वि. भा. देशपांडे, श्याम जोशी, राम बापट, भालचंद्र फडके, दुर्गा दीक्षित आदींनी भाग घेतला. चर्चेचा समारोप भास्कर चंदावरकर यांनी केला. या चर्चेत प्रा. राम बापट यांनी अतिशय महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करून चर्चेची पातळी उंचावली. तोच सूर पकडून चंदावरकरांनी तितक्याच समर्पक रीतीने समारोपाचे भाषण केले.

के. नारायण काळे यांच्यासारख्या सव्यसाची कलासमीक्षकाला अशाच पद्धतीने आदरांजली वाहणे उचित होते. अर्थात अशा प्रकारच्या चर्चा एका सत्रात संपत नसतात, हे कोणालाही ध्यानात येईल. त्यासाठी प्रत्येक माध्यमासाठी स्वतंत्रपणाने एक किंवा दोन सत्रे हवीत. तरीही टिपण लिहिणे, ते चक्रमुद्रित करून चर्चेपूर्वी उपलब्ध करून देणे, प्रश्नकर्त्यांना चर्चेची पूर्व तयारी करण्यास वेळ देणे वगैरे गोष्टी व्हायला हव्यात. यातला प्रत्यक्ष अनुभव असा की, संयोजकांच्या मनात हे सारे घडावे असे असते. त्यासाठी त्यांनी योग्य तो अवधी दिलेलाही असतो; पण आपल्याकडे (काही सन्मान्य अपवाद वगळता) बहुजनांना या शिस्तीची सवय नसल्याने या चर्चासत्रांना अपेक्षित असे रेखीव रूप येत नाही. हे आवर्जून सांगण्याचे कारण असे की, जे लोक एकूणच कला व्यवहाराकडे अधिक गांभीर्याने पाहतात त्यांना फड जिंकणाऱ्या व्याख्यानांपेक्षा अशीच आटोपशीर चर्चासत्रे उपयोगी पडणार आहेत. ती अधिकाधिक चांगली कशी होतील ते पाहायला हवे. निदान आपल्यापुरते तरी व्यवस्थितपण राखायला हवे ! □


" विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी, सरकारने किंवा खाजगी संस्थांनी, घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. हा संदेश या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे. "

डॉ. स. ह. देशपांडे
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

**श्रीग्रामायन**

श्री. ग. माजगावकर
राजहंस प्रकाशन, पुणे
मूल्य : पंचवीस रुपये

# नाट्यपंढरी



## ☐ गडकरी गेले !

राम गणेश गडकरी म्हणजे नाट्य-काव्य-विनोदाचा त्रिवेणी संगम ! कै. बापूसाहेब माटे यांनी म्हटलंय की, 'गडकरी म्हणजे घरंदाज खानदान स्त्रीची नखशिखांत दागिन्यांनी भरलेली ट्रंक' या साहित्यसागरात हवा तो 'अलंकार' हाती लागतो. १९१८ मधल्या एकवीस–बावीस सप्टेंबरची गोष्ट. गडकरी आजारी होते; पण काही जरुरीच्या कामानिमित्त त्यांना मुंबईला जाणे भाग पडले. गडकरी पुण्याहून मुंबईला गेले, त्याच दिवशी मुंबईच्या 'इंदुप्रकाश'चा बातमीदार, गडकऱ्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी त्यांच्या घरी गेला. (१३६ कसबा, पुणे) गडकरीमास्तरांच्या जिन्याचे दार बंद होते, म्हणून त्याने तळमजल्यातल्या मारवाड्याच्या दुकानात चौकशी केली. तो म्हणाला, 'ते गेले !' बातमीदारच तो, त्याला वाटले 'गेले' म्हणजे वारले ! गडकऱ्यांच्या मृत्यूची बातमी त्याने ताबडतोब मुंबईला पाठवून दिली. लगेच 'इंदुप्रकाश' च्या २५ सप्टेंबरच्या अंकात ती छापून आली. 'शोचनीय मृत्यू.' 'मनोरंजन' वगैरे मासिकांतून आपल्या दिव्य प्रतिभापूर्ण काव्यातून ललकाऱ्या मारणारे महाराष्ट्रातील नामांकित कविचंडोल आणि प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव वगैरे उत्कृष्ट नाटकांनी महाराष्ट्र उन्नत करणारे, नाट्यकवि गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी, यांना पुणे येथे इन्फ्लूएंझा तापाने देवाज्ञा झाल्याची शोककारक बातमी आली आहे. त्यांनी महाराष्ट्र–सारस्वतात पटकावलेली जागा भरून येणे फार दुरापास्त दिसते. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो यापलीकडे मर्त्य मानवांनी काय म्हणावे ?

ही बातमी खोटी आहे हे लक्षात येताच 'इंदुप्रकाश' ने 'मृत्यू चूक' या मथळ्याखाली, या बातमीची दुरुस्ती केली, तेव्हा अनेकांनी गडकऱ्यांना पत्रे पाठवून आपला आनंद व्यक्त केला.

'अशुभ वार्तेने आयुष्य वाढते हा लौकिक समज आपल्या बाबतीत खरा ठरो' अशी इच्छा तात्यासाहेब कोल्हटकरांनी व्यक्त केली तर 'आपला मृत्युलेख आपणच वाचण्याचा मान पितामह दादाभाई नौरोजींनंतर आपणास मिळाला' याबद्दल महाडचे सुप्रसिद्ध साहित्यिक गोविंद गोपाळ टिपणीस यांनी गडकऱ्यांचे अभिनंदन केले.

हा झाला गडकऱ्यांच्या मरणाचा विनोद; पण पुढे तीन–चार महिन्यात मास्तर खरोखरच गेले ! (२३ जानेवारी १९१९).

## ☐ शूरा मी वंदिले !

डॉ. वसंतराव देशपांडे नेहमी म्हणत की, 'आमचे गुरुजी (मा. दीनानाथ) म्हणजे एक (FLASH) नुसता बिजलीचा चमचमाट होता. असे काही गातील की मी मी म्हणणाऱ्या बुजुर्गांनी तोंडात बोटं घालावी.' तसं म्हटलं तर वसंतरावांच्या बाबतीत तेच होतं. एरव्ही वसंतरावांना नाक मुरडणाऱ्यांची त्यांच्या मैफलीत मान डोलत असे. म्हणूनच त्यांना खऱ्या अर्थाने मा. दीनानाथांचे वारसदार म्हणत. त्यांनी नुसते, 'शूरा मी वंदिले', 'सुकतात की जगि या', 'शतजन्म शोधिताना' सुरू केले की लोक लगेच दाद देऊन म्हणत 'हे दीनानाथ !' मात्र ती नक्कल नव्हती. 'डिट्टो दीनानाथही' नव्हते. ते होते अस्सल दीनानाथ–दर्शन !

माणसाचा एक विशिष्ट पिंड असतो. मा. दीनानाथांना वेड होते पराक्रमाचे. त्यांचे नाते होते भव्यतेशी–दिव्यतेशी म्हणूनच त्यांची लतिका, शिवांगी, वीरांगना, तेजस्विनी, सुलोचना नि शेवटी त्यांचा धैर्यधर खूप गाजला ! त्यांच्या धैर्यधरात त्यांचे दिसणे नि गाणे, प्रेक्षकांना क्षणार्धात दिपवून टाकी. उगीच का, त्यांचे बालपणातले गाणे ऐकून बालगंधर्व म्हणाले होते की, या मुलाला, मंगेशीपासून मुंबईपर्यंत रुपये पसरून, (रुपयांच्या पायघड्या घालून) मी माझ्या कंपनीत आणला असता !' वासुदेवशास्त्री खरे तर, आपल्या 'उग्रमंगल' या नाटकातली त्यांची वीरांगनेची भूमिका पाहून चिंतामणराव कोल्हटकर म्हणाले, 'चिंतामणराव या नाटकानंतर आपल्या दिनाची दृष्ट' काढीत जा !'

स्वा. सावरकरांच्या 'संन्यस्तखड्ग' नाटकाची एक हृद्य आठवण चिंतामणरावांनी नोंदून ठेवली आहे.

'या नाटकातील परमोच्च बिंदू म्हणजे तिसऱ्या अंकातला समरप्रसंग... शाक्यांची शरणागती की, वल्लभसिंहाचा प्राणनाश असा अटीतटीचा प्रश्न पडला असता, पुरुषवेषातील वल्लभपत्नी सुलोचना (मा. दीनानाथ) जेव्हा 'शरण नाही रण–मारीत मारीत मरण !' म्हणून स्वमताचा त्वेषाने पुरस्कार करते, तेव्हा प्रेक्षकातून एक खडखडीत आवाज उठला 'हे–हे सांगणारा कोणी तरी पाहिजे' संबंध प्रेक्षागृहात टाळ्यांचा एकच कडकडाट उठला !' तो आवाज होता डॉ. ना. भा. खरे यांचा ! त्या काळच्या कट्टर अहिंसावाद्याचे ते सहजोद्गार होते. सावरकरांचे शब्द नि दीनानाथांचा अभिनय याला मिळालेली ती उत्स्फूर्त दाद होती.

असे हे मा. दीनानाथ मंगेशकर ! पण आज सभासंमेलनात बोलताना किंवा लिहिताना त्यांची ओळख करून दिली जाते, ती ते लता मंगेशकर यांचे वडील म्हणून हा कालमहिमा आहे. लताताई स्वरसम्राज्ञी आहेतच. ती सर्वच भावंडे संगीतक्षेत्रात मोठी आहेत. तरीही रंगभूमीवर आपल्या तेजाने बिजलीसारखे चमकून गेलेल्या, रंगभूमीच्या वाटचालीत आपल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा उमटविलेल्या दीनानाथांची ओळख–' ही मा. दीनानाथांची मुले' अशीच करून द्यायला हवी. मुलांनाही त्यातच धन्यता वाटते. 'आम्ही दीनानाथांची–आमच्या बाबांची मुले ! म्हणून आपल्या वडिलांच्या चरित्राला अर्पण–पत्रिका लिहिताना लताबाईंनी भावपूर्ण शब्दात लिहिले आहे 'बाबा, तुम्हाला आम्ही काय देणार ? कुबेराला का कुणी काही द्यायचे असते ? ही तुमचीच शब्दगाथा तुमच्या चरणी वाहात आहे !'

ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ.**
**आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता**
**कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

**तीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला**
**निसटलंच**
**पाहिजे!**

अनुवाद : श्रीकांत लागू

**वीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

एका बाजूने
रशियन रणगाडे
उपस्थित असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक**
**वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस**
**श्यामचे**
**काही राधाचे**

फिरोझ रानडे

**पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.